छोटा दिवाळी अंक/५० पैसे

# माणूस



पन्नास पैसे

शनिवार
१६ सप्टेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा
अंक : सोळा

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

# नांदी

पाऊस प्रसन्न झाला. मुख्यमंत्र्यांनी पेढे वाटले. 'माणूस'लाही वाटले जरा दिवाळी करावी म्हणून. वाचकांना बोनस द्यावा. म्हणून हा अंक. किंमत नेहमीची. पृष्ठसंख्या मात्र दुप्पट. विषयही थोडे वेगळे. दिवाळीला साजेसे. दिवाळी अंकाची ही जणू नांदीच !

अनेकांना वाटेल मुख्य, मोठा दिवाळी अंक निघणार की नाही ! निघणार तर ! ऑक्टोबर अखेर. थाटामाटात. भरपूर पानांचा आणि किंमतीचा.

तोपर्यंतचे दर आठवड्याचे माणूस अंकही आहेतच.

'माणूस'ने घोळ न घालता बोनस देऊन टाकला. वाचकांनी आता दिवाळी अंकाला उत्तम प्रतिसाद देऊन 'माणूस'ला बोनस द्यावा.

—संपादक

मुखपृष्ठ : स्नेहप्रभा प्रधान आणि डॉ. शिरोडकर

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

रवींद्र पिंगे



# सॉमरसेट मॉम श्रीरमण महर्षींच्या सहवासात

जन्माला येऊन मॉमने दोन गोष्टी अगदी मनसोक्त केल्या. सतत पाऊणशे वर्षे अविचल निष्ठेने त्याने लेखन केलं; सतत पाऊणशे वर्षे त्याने मन लागेल तशी यथेच्छ भ्रमंती केली. उभी पृथ्वी त्याने अनेकवार पायाखाली घातली. आणि मुलूख तरी कुठले धुंडाळले. लंडन, न्यूयॉर्क, पॅरीस असा ऐषआरामी थाट नाही. तो पॅसिफीक महासागरावरल्या आदिवासींच्या बेटात फिरला. चीनच्या भिंतीच्या पलीकडल्या डोंगराळ भागात गेला. मध्य अमेरीकेच्या गवताळ भागात राहिला. सैबिरीयाच्या बर्फाळ वाळवंटात गेला. अतिशय दुर्गम प्रदेशात त्याने वास्तव्य केलं. मात्र घरी असो वा प्रवासात असो, रोजचं चार तासाच एकटक लेखन त्याने कधी चुकवलं नाही. न्याहारी आटोपून तो सकाळी नऊ वाजता कागद पुढ्यात सरसावून मेजापाशी बसे. काही सुचो वा न सुचो, एक वाजेपर्यंत त्याची कडीकुलूपातली बैठक हलत नसे. त्याचे चहाते आश्चर्याने विचारीत, 'रोज चार तासांप्रमाणे पाऊणशे वर्षे तुम्ही लिहीत आलात; तुम्हाला कंटाळा कसा येत नाही ?' तो शांतपणे सांगे, 'ज्याचं पोट लेखनावर अवलंबून आहे त्याला अळंटळं करून कसं चालेल ? मला रोजचा घाणा ठरलेल्या वेळी घातलाच पाहिजे. रोजच्या रोज मला नवा मजकूर सुचतोच असं नाही. जसजसं लेखकाचं वय होत जातं, तस तसं त्याला नवं नवं स्फुरणं कमी कमी होत जातं. त्याची कल्पनाशक्ती आटते. अशावेळी मी माझी टिपणांची जुनी वही उघडतो. जुना संक्षिप्त मजकूर चाळतो. मग मनाला तरतरी येते. मी लिहू लागतो. कधी कधी काहीच सुचत नाही. अशावेळी कागदावर मी नुसत्या माझ्या सह्या गिरवीत बसतो. पण रोजची लेखनाची ठरलेली चार कल्लाकांची बैठक कधी मोडत नाही. ती चैन मला परवडण्यासारखी नाही. आणि आणखी एक लक्षात ठेवा. लेखकाने शांत चित्ताने रोजच्या रोज लिहीत असावं. शिष्ट टीकाकार, व्युत्पन्न पंडीत, सराईत संपादक वगैरे काय म्हणतात तिकडे ढुंकूनही लक्ष देऊ नये. आपल्या मनाचा कौल घेऊन आपण लिहित रहावं. जो टीकाकारांवर विसंबला तो आटोपलाच म्हणून समजा. मी तुम्हाला अशा पंचवीस लेखकांची नि त्यांच्या पुस्तकांची नावं सांगेन, की पन्नास वर्षापूर्वी टीकाकारांनी आणि पंडितांनी ती डोक्यावर घेतली होती. ते लेखक म्हणे युगप्रवर्तक वगैरे होते ! मी पैज मारतो की त्यातल्या दोन लेखकांचीही नावं तुम्हाला आज माहित नसतील. सांगा, कुठे गेले ते मान्यवर युगप्रवर्तक लेखक ? काय झालं त्यांचं ? काय झालं त्या टीकाकारांचं ? काय झालं त्यांना चिकटवलेल्या किताबांचं ? अरे, काळाच्या प्रवाहात ते कुठल्या कुठे भिरकावले गेले. मी मात्र सर्व लब्धप्रतिष्ठित टिकाकारांना पुरून उरलोय कारण त्यांच्या उपेक्षाबुद्धीला हिंग लावूनही न विचारता मी गेली पाऊणशे वर्षे सातत्याने, रोजच्या रोज लिहित

राहिलो आहे. युगप्रवर्तक वगैरे कुणीही नसतो. लेखकांचे फक्त दोन गट आहेत. चांगले वाचनीय लेखक आणि रटाळ लेखक. पैकी, पहिल्या गटात आपण असलो म्हणजे त्यात कृतार्थता मानावी. माझी खुर्ची दुय्यम दर्जाच्या चांगल्या वाचनीय लेखकांच्या रांगेत आहे. आणि मला त्यात समाधान आहे. पुढल्या पिढ्या माझं साहित्य वाचून तृप्त होतील, वगैरे भ्रम माझ्या डोक्यात नाहीत. ज्या काळात लेखक लिहित असतो त्या काळात त्याला उत्सुक वाचक मिळणं प्रधान महत्वाचं आहे. त्याबाबतीत मी सुदैवी आहे.

हे शहाणपण म्हणा किंवा हा टेंभा म्हणा, मॉम मिरवू शकला. कारण तो नवेनवे अनुभव वेचण्यासाठी पृथ्वीच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यात भटकत राहिला. जावा-सुमात्रा-सिंगापूर-हाँग-काँग-शांघाय-पेकींग हा पट्टा त्याला फार प्रिय होता. लहर लागली की टाईप रायटर घेऊन तो विषुववृत्ता-वरल्या उन्हाकडे निघालेल्या जहाजात बसे. तिथला सामान्य माणूस तो पाही. निरखी. त्या निरखण्याचा आपल्या ललित लेखनाकडे उपयोग करी.

एकदा त्याने आपला मोर्चा हिंदु-स्थानाकडे वळवला. सन १९३६. दुसरं महायुद्ध सुरू होण्याला बराच अवकाश होता. हिंदुस्थानात ब्रिटिशांचं रामराज्य नांदत होतं. आगाखान हा मॉमचा दोस्त. आगाखानाने लिहिलेल्या आत्म-वृत्ताला मॉमने प्रस्तावना दिली आहे. असे ते एकमेकांचे ऋणाईत. आगा-खानाचं ओळखपत्र खिशात ठेऊन मॉम आला हे सांगितलं की मुस्लीम संस्था-निकांनी त्याचं शाही इतमामाने स्वागत केलं हे आणखी वेगळं सांगण्याची गरजच नाही. हिंदुस्थानात सर्व सुखं त्याच्या पायापाशी आली. तो हैदराबादच्या निजामाचा पाहूणा होता. सर अकबर हैदरी वगैरे लाटमंडळी त्याच्या भेटीगाठी ठरवी. एकदा त्याने नबाबजाद्याला स्वच्छ सांगून टाकलं, की मी भारतात बनारस, ताजमहाल, अजिंठा, वेरूळ, मदुरा, कलकत्ता वगैरे पाहायला आलेलो नसून मी तत्त्वचिंतक, साधक, धर्मगुरू, साधुसंत आणि सिद्ध पुरुषांचं दर्शन घेण्यासाठी आलेलो आहे! यजमान थक्क झाले. मॉमला शिकारीचा खटा-टोप करायचा नव्हता. नाचगाण्यांचे जलशे करायचे नव्हते. नौकाविहारही करायचा नव्हता. त्याला फक्त देवळं-दर्गे पाहायचे होते. मठ पहायचे होते. जपताप करणारे योगी-संन्यासी पहायचे होते. कर्मठ आचरण करणाऱ्या धर्म-गुरूंना भेटायचं होतं. मुमुक्षूंना जाणून घ्यायचं होतं. साधुंना भेटायचं होतं.

सुदैवाने त्या वेळी एक साधुपुरुष जवळपासच राहात होता. मॉमची मि त्याची दृष्टभेट कशी झाली ते आता खुद्द मॉमच्याच शब्दात सांगतो.

' भटकत भटकत मी मद्रासला पोहो-चलो. माझ्या भ्रमंतीच्या उद्देशाबद्दल कुतूहल असलेली काही मंडळी तिथे मला भेटली. मी त्यांना पूज्य व्यक्तींना मला भेटावयाचं असल्याचं सांगितल्या-वर त्यांनी मला हिंदुस्थानात फार पूज्य

गणल्या गेलेल्या आणि भक्त फार मानीत असलेल्या एका स्वामींकडे न्यायचं ठरवलं. त्यांना ते महर्षी म्हणून संबोधत. उपदेशग्रहणासाठी, अनुग्रहासाठी आणि त्यांची वाणी ऐकण्यासाठी दूर दूरच्या भागातले भक्तगण महर्षींपाशी जात. स्वामी म्हणजे हिंदू धर्मगुरू. पण सर्वसाधारणपणे कुठल्याही संन्याशाला तेच उपपद जोडतात. मद्रासनजिक काही तासांच्या मोटारमार्गावर तिरुवनमलाई नावाचं एक ठिकाण आहे. तिथे अरुणाचल नावाच्या डोंगराच्या पायथ्यापाशी स्वामींचा आश्रम आहे. अरुणाचल डोंगर पवित्र मानतात. शिवाचं ते प्रतिक आहे. तिथे दरवर्षी प्रचंड जत्रा भरते. हजारो भक्तगण येतात.

मंडळींची सूचना मान्य करून एके दिवशी सकाळी आम्ही निघालो. रस्ता खाचखळग्यांनी भरलेला होता. धूळ तापली होती. प्रवास कंटाळवाणा झाला. आश्रम आला. महर्षींना आम्ही थोडयाच वेळाने भेटू शकू असं आम्हांला सांगण्यात आलं. फळांची एक करंडी स्वामींना भेट म्हणून मी आणली होती. गाडीत फराळाचं सामानही घेतलं होतं. ते मांडून मी आश्रमाच्या बाहेर फराळाला बसलो. इतक्यात एकाएकी मी बेशुद्ध पडलो. मंडळींनी मला तसंच उचलून झोपडीत नेलं आणि चौपाईवर ठेवलं. मी किती वेळ बेशुद्धीत होतो कल्पना नाही, पण अंमळशाने मी शुद्धीवर आलो. मात्र हालचाल करण्याइतकीही शक्ती माझ्यात उरली नव्हती. हा सगळा प्रकार महर्षींना सांगितला गेला आणि त्यांच्या भेटीसाठी ते ज्या सभागारात बसत असत तिथपर्यन्त येण्याची मला शक्तीच उरली नसल्याचंही त्यांना सांगितलं गेलं. तेव्हा दोन तीन शिष्य घेऊन खुद्द महर्षीच माझ्या समाचारासाठी मी ज्या झोपडीत पडलो होतो तिथे येऊन दाखल झाले.

इतर हिंदी माणसांसारखेच महर्षी मध्यम उंचीचे होते. रंग मधाळ होता. केस सफेत, पातळ कापलेले होते. आखूड दाढी होती. त्यांना भक्कमदेही म्हणण्यापेक्षा स्थूलदेहीच म्हणावं. जरी त्यांच्या अंगावर एकच मांजरपाटाचं वस्त्र होतं ते अतिशय स्वच्छ. निटनेटकं आणि धूत होतं. ते किंचितसे लंगडत. हातातल्या सोटयावर भार टाकीत ते मंदगतीने चालत. तोंड फार रूंद होतं. ओठ जाडजूड होते. आणि नेत्र रक्तासारखे लालबुंद होते. ते अगदी साधेसुधे वाटत. पण त्यातही एक शान होती. चर्या हसतमुख, उत्फुल्ल आणि मृदू. मला ते प्रकांड पंडित वाटले नाहीत. सुस्वभावी वृद्ध खेडूत असावेत असं वाटलं. आल्याबरोबर ते काहीतरी पुटपुटले. स्वागतपर शब्द असावेत. नतर मला जिथे ठेवलं होतं त्या चौपाईच्या बाजूलाच ते जमिनीवर बसले.

त्यांनी अतिशय प्रेमळ आणि आर्त नजरेने माझ्या चेहऱ्याकडे पाहिलं. पाहिलं काही मिनिटंच. मग नजर माझ्या खांद्याकडे वळवली. एका विशिष्ट कोनातून ती माझ्या खांद्यावर एकचित्ताने स्थीर केली. त्यांचा देहही एकदम स्थीर

झाला. फक्त मधून मधून एक पाय ते जमिनीवर ताल धरल्यासारखा हळूहळू आपटू लागले. त्या अविचल स्थितीत ते जवळ जवळ पंधरा मिनिटं होते. नंतर मंडळींनी मला सांगितलं की आपलं सारं चित्त माझ्यावर केंद्रित करून महर्षी ध्यानस्त झाले होते. ते ध्यानस्तपण विरल्यानंतर ते पुन्हा माझ्या चेहेऱ्याकडे पाहू लागले. आपल्याशी काही बोलायचं आहे काय, किंवा एखादा प्रश्न विचारायचा आहे काय असं त्यांनी मला विचारलं- मला शक्तीच उरली नसल्याचं नि बरं वाटत नसल्याचं मी सांगितलं. तेव्हा ते हसून उत्तरले, 'मौन हासुद्धा एक संवादच आहे. (Silence also is conversation) इतकं बोलून मान झुकवून ते पुन्हा ध्यानस्त झाले. माझ्या खांद्यावर त्यांची नजर पुन्हा स्थीर झाली. कुणाच्याही तोंडून शब्द फुटेना. झोपडीतल्या सर्वांच्या नजरा महर्षींवर खिळल्या होत्या. अशी पंधरा मिनिटं गेली. मग ते उठले. वंदन करून त्यांनी हसत हसत माझा निरोप घेतला आणि हातातल्या सोटयावर रेलत रेलत ते शांतपणे झोपडीतून बाहेर पडले.

स्वामींच्या मंत्रोच्चारणामुळे, की मला विश्रांती मिळाल्यामुळे, हे ही निश्चितपणे सांगू शकणार नाही, पण मला बरं वाटू लागलं हे मात्र खरंच. थोडयाच वेळात मी उठलो आणि महर्षी दिवसा जिथे बसत नि रात्री झोपत त्या सभागारात गेलो. ती जागा पन्नास फूट लांब आणि पंचवीस फूट रुंद होती. सभागार अजिबात शृंगारलेलं नव्हतं. सर्व बाजूंनी खिडक्या होत्या. पण छतामुळे प्रकाश मलूल वाटत होता. एका मंचकावर व्याघ्रांबर होतं. त्यावर स्वामी वसत. स्वामींच्या बैठकीसमोर उदबत्तीचं घर होतं. धुपाटणं होतं. अधून मधून शिष्य धूपदान करीत. उदबत्त्या लावीत. सुगंध दरवळे. आश्रमवासी आणि इतर भक्तगण स्वामींसमोर मांडया घालून बसत. काही पोथी वाचीत. काही ध्यानस्त बसत. मी गेल्यावर थोडयाच वेळात दोन नवखे हिंदू आले. त्यांनी स्वामींपुढे लोटांगण घालून नंतर आणलेली फळांची करंडी त्यांना भेटीदाखल दिली. स्वामींनी स्वीकार केला आणि शिष्याला मानेने खुणवून ती ठेवून घ्यायला सांगितलं. त्या दोघांची त्यांनी प्रेमळ आवाजात चौकशी केली आणि नंतर मानेनेच त्यांना निरोप दिला. त्यावर त्यांनी स्वामींसमोर पुन्हा एकदा लोटांगण घातलं आणि ते इतर भक्तगणांमध्ये जावून बसले. स्वामी क्षणात ध्यानस्त झाले. त्यांची समाधी लागली. तिथे हजर असलेल्या सर्वांच्या अंगातून एक शिरशीरी गेली. पराकोटीची निरव शांतता निर्माण झाली. काहीतरी वेगळाच प्रकार घडतो आहे, श्वास रोखून धरले जात आहेत, असं वाटलं. थोडया वेळानंतर मी तिथून अलगद पावलांनी बाहेर पडलो.

नंतर मला कळलं की माझ्या बेशुद्ध पडण्यामुळे बाहेरच्या जगात अन्वाच्या सव्या वावडया उठल्या होत्या. सबंध हिंदुस्थानात ती बातमी वाऱ्यावर पसरली. एका सिद्ध पुरुषाला आपण

भेटणार ह्या भावनेच्या असह्य ताणामुळे माझी शुद्ध हरपली असं काहीजण म्हणाले. तर काही मंडळी सांगतात की दृष्टभेट होण्याच्या आगोदरच स्वामींनी माझ्यावर मोहिनी टाकून मला साक्षात्काराचा क्षणिक झटका आणून दिला होता. हिंदूंनी जेव्हा मला त्यासंबंधी विचारलं तेव्हा मी हसून नुसते खांदे उडवले. खरी गोष्ट अशी आहे की मूर्च्छित पडण्याची ती काही माझी पहिली किंवा अखेरची वेळ नव्हती. डॉक्टर्सनी मला सांगितलेलं आहे की हृदयाजवळच्या एका पापुद्र्याचं वजन किंचितकाळ माझ्या हृदयाच्या एका झडपेवर पडतं आणि त्याचा परिणाम मला ग्लानी येण्यात होतो. नंतर ग्लानी जाते. मी बरा होतो. एखादे दिवशी हे वजन जरा थोडं जास्त पडेल नि माझी मूर्च्छा संपणारच नाही.'

मॉमने महर्षी रमणांच्या भेटीबद्दल फक्त एवढंच लिहिलं आहे. त्यांच्या संभाषणाबद्दल त्याने एका अवाक्षरानेही लिहिलेलं नाही. 'रेझर्स एज' ह्या त्याच्या तत्त्वचिंतनाला वाहिलेल्या कादंबरीत एका सिद्ध पुरुषाची व्यक्तिरेखा आणि त्याच्या मठाचे वर्णन येते. ते रमणमहर्षीवरूनच सुचलेले तुकडे आहेत हे वाचकांनी ओळखलं आहे. भारतीय अध्यात्मिक विचारांचा मागोवा मॉमने त्याच्यापरीने पुरेपूर घेतलेला आहे. तसाच त्याने रमणमहर्षींच्या जीवनाची आणि अद्वैत तत्त्वज्ञानाची ओळख पाश्चात्य जगाला 'The Saint' हा सुंदर आणि साधार लेख लिहून फार समर्थपणे करून दिली आहे. मॉमने रमणांची चरित्रधारा त्रोटकपणे सांगितली आहे ती अशी :–

रमणमहर्षींचं पूर्ण नाव वेंकटरमण सुंदरम् ऐय्यर. जन्म १८७९ सालचा. मदुरा शहरापासून तीस मैलावरलं एक उजाड खेडं हे त्यांचं जन्मगाव वडील गावठी वकील. अशिक्षित. उदार. आतिथ्यात सढळ. ह्या घराण्याला एका संन्याशाने शाप दिला होता की प्रत्येक पिढीत घरात एक तरी संन्याशी होईल. शाप खरा ठरला. ऐय्यरांच्या प्रत्येक पिढीत कुणी ना कुणी अविवाहित राहिला, संन्याशी झाला.

रमण एक सामान्य मुलगा. अभ्यासातही अगदी सुमार. सर्व लक्ष खेळण्याकडे. कुस्ती, बॉक्सींग, फूटबॉल, धावण्याची शर्यत वगैरे मैदानी खेळात प्रवीण.

एक दिवशी घरी पाहुणे आले. लहानग्या रमणने त्यांना विचारलं, 'भाऊ आपण कुठून आलात ?' पाहुणे म्हणाले, 'अरूणाचलाहून.'

अरुणाचल हा शब्द ऐकल्याबरोबर एका अबोध आनंदाने रमणचं अंग शहारून गेलं. रोमांच फुलले. तोपर्यंत अज्ञात असलेल्या त्या स्थळाशी ऋणानुबंध असल्याची ही पहिली दैवी खूण – जेव्हा रमण हा साधा शाळकरी पोर होता. परंतु तो परिणाम तत्कालीक होता. अरुणाचलाला रमण पूर्णपणे विसरला.

एकदा काकाने घरात संतांच्या चरित्राचं चोपडं आणलं. रमणच्या ते

# राजा शिवछत्रपती

व. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपये

प्रकाशक : महाराजा शिव छत्रपती प्रतिष्ठान
सातारा

एकमेव विक्रेते : राजहंस प्रकाशन

हातात पडलं. ते वाचून रमण भारावून गेला. पण पुन्हा ती तत्कालीक स्थिती ठरली. रमण खेळात रमून गेला. रमण बारा वर्षाचा असताना त्याचे वडील वारले. त्याची आई त्याला घेऊन मदुरेला आपल्या भावाकडे आली.

ह्यानंतर काही दिवसांनी म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी रमणच्या आयुष्यात एकाकी नवं पर्व सुरू झालं. त्याचा वृत्तांत खुद्द रमणमहर्षींनीच शिष्यांना असा सांगितला, 'मी मदुरेला कायमचा रामराम ठोकण्याच्या अलीकडे दिड महिन्यांची गोष्ट. तेव्हापासून माझं आयुष्य आमुलाग्र बदलून गेलं. माझ्या चुलत्यांच्या घरी मी माळ्यावर एकटाच बसलो होतो. प्रकृती ठाकठीक होती. पण अचानक मला मृत्यूच्या भीतीने ग्रासून टाकलं. मला वाटलं मी आता मरणार, अशी भिती मला का वाटली, ते मी आता सांगू शकत नाही. त्या वेळीही मला कारण कळलं नव्हतं. मला वाटलं की क्षणात मी मरणार. पण मी वैद्याकडे किंवा वडीलधाऱ्या माणसांकडे धावलो नाही. मला वाटलं की मृत्यूच्या भीतीचा हा प्रश्न माझा मलाच तत्काळ सोडवला पाहीजे. मृत्यूच्या भीतीमुळे मी आत्मकेंद्रीत झालो. मी मूकपणे माझं मलाच सांगितलं, 'अरे, मृत्यू तर आता येऊन ठाकलाच. मरणाचा अर्थ काय? मृत्यू कशाचा होणार आहे? फक्त हा देह मरेल.' तावडतोब मी शवासन घातलं. श्वास रोखून धरला. मी स्वत:लाच सांगितलं, 'पहा, हा देह आता मृतवत् पडला आहे. हे शव उचलून लोक त्याला मंत्राग्नी देतील. देहाची राख होईल. पण देह जरी नष्ट झाला तरी 'अहं' म्हणजेच आत्मा कधी नष्ट होईल? माझा देह आणि माझं आत्मतत्त्व भिन्न नाहीत काय? हा देह आता थंड निपचीत पडलेला आहे, परंतु माझी सर्व आत्मशक्ती आतून उचंबळून आलेली आहे. 'अहं' हा शब्द माझ्या रक्तपेशीतून निनादत आहे. तेव्हा, 'अहं' म्हणजेच आत्मा. तो जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त असतो. देह मर्त्य आहे. शरीर मरतं. आत्मा अमर आहे. मृत्यू त्याला स्पर्श करू शकत नाही. अहं म्हणजे अमर आत्मतत्त्व.'

तेव्हापासून रमण विरक्त झाले. त्यांचं खेळावरून, अभ्यासावरून, खाण्यापिण्यावरून चित्त उडालं. ते सारखे ध्यानस्त बसू लागले. घरात कटकटी सुरू झाल्या. परीक्षेत नापास झाले. भाऊ रागावून म्हणाला, 'अशी थेरं करणाराने घरात कशासाठी रहावं? दाही दिशा मोकळ्या आहेत की.' असले अनेक टोमणे रमणांनी आजवर पचवले होते. पण आज जागृती आली. तो शनिवारचा दिवस होता. २९ ऑगस्ट १८९६ ही तारीख होती. रमणांनी विचार केला की भाऊ म्हणतोय त्यात तथ्य आहे! आपण संसारात कशासाठी गुरफटून रहायचं? रमणांना अचानक अरुणाचल डोंगराची आठवण आली. जणू अरुणाचलाने रमणला हाक मारली. रमण गुपचूप घराबाहेर पडला. भावाने ते पाहिलं. भाऊ म्हणाला,

'जातो आहेस तर ते माझ्या खिशातले पाच रुपये घे नि परस्पर माझी फी भर पाहू.' रमणला ह्याही शकूनच वाटला! कारण अरूणाचलाला आगगाडीने जाण्यासाठी तीन रुपये पडत होते. रमणने त्या पाच रुपयातले तीन रुपये स्वतःसाठी प्रवासखर्च म्हणून घेतले व दोन रुपये ठेवून त्याने घर कायमचे सोडताना भावाला चिठी लिहीली, 'ज्याने मला जन्म दिला त्या जगन्नाथाच्या शोधात मी त्याच्याच आज्ञेवरून निघालो आहे. ही एका शुचिर्भूत पर्वाची सुरुवात आहे. म्हणून माझ्या जाण्याचा कुणी शोक करू नये. माझा शोध घेऊ नका; त्यासाठी नाहक पैसे खर्चू नका, तुझी फी भरली नाही. दोन रुपये शिल्लक उरले ते ठेवले आहेत.' ह्या चिठीखाली रमणांनी सही केली नाही. ह्याचं कारण त्या क्षणापासून ते स्वतःलो विविक्षीत व्यक्ती न मानता, चराचर व्यापून राहिलेल्या परमेश्वरी तत्त्वाचा अनामिक अंश त्रयस्थपणे मानू लागले. रमण स्वतःच्या देहाचा 'मी', 'माझं' असा उल्लेख न करता 'तो', 'त्याचं' असे अलिप्ततादर्शक उल्लेख करू लागले.

कमालीचे कष्ट सहन करून तरूणपण विरक्त रमण अरूणाचलावर पोहोचले. तिथे त्यांनी कसलीही तमा न बाळगता घोर तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येचा आश्चर्यजनक तपशील मॉमने लिहिला आहे. पाश्चात्य वाचकांना त्याचं कौतुक वाटेल. हिंदूंना ते सामान्य प्रकरण वाटेल कारण तपोनिष्ठाला यातना सहन कराव्याच लागतात, देह आळवावाच लागतो, नातेवाईक आणि हितचिंतक त्याला परावृत्त करण्यासाठी पराकाष्ठेचा प्रयत्न करतात पण त्यांच्याकडे कठोर मनाने पाठ फिरवावी लागते, ह्याचे लक्ष दाखले आपण पुराणकथांमधून ऐकलेले असतात. रमणांची आई त्यांना जंगलात भेटायला गेली. रमणांनी तिला ओळखही दिली नाही. इतके ते जगापासून मनाने अलिप्त झाले होते. ती पुढे तिथेच मुलाजवळ राहिली. रमणांनी तिला सांगितलं, 'फक्त तूच नव्हेस तर जगातल्या सर्व स्त्रीया माझ्या माता आहेत.' तिच्या मृत्यूनंतर रमणांच्या भक्तांनी तिथे वृंदावन बांधलं. गणेशशास्त्री, पलाईस्वामी नावाचे व्युत्पन्न भक्त त्यांना लाभले. ह्या गणेशशास्त्र्यांना रमणांनी झोपेत साक्षात्कार देऊन आपल्याकडं बोलावून घेतलं होतं. रमणांची साधना चमत्कारांनी बहरलेली आहे. त्यांनी कपडचांचा, केसांचा जानव्याचा, त्याग केला. फक्त एक लंगोटी लावीत. ते सतत ध्यानस्थ असत. त्यांना साप, विंचू डंख करीत, पण त्यांचं चित्त विचलीत होत नसे. समाधीसुखात ते तल्लीन असत. भिक मागून मिळेल त्या अन्नावर ते समाधान मानीत. पुढे पुढे त्यांची आई सर्व भक्तांसाठी शिधा रांधी. रमणांचा धाकटा भाऊही शिष्य झाला. त्यानेही संन्यास घेतला. आपल्या आईच्या वृंदावनाच्या दर्शनासाठी रमण रोज खप टाकीत. पुढे ते कायमचेच तिथे मुक्का-

माला आले. तिथे मुळात काहीच नव्हतं. मग भक्तांनी आश्रम बांधून दिला. पण रमण दान स्विकारीत नसत. आश्रमात एकदा चोर आले. भक्त भयभीत झाले. रमण भक्तांना म्हणाले, 'त्यांचं कर्म त्यांना करू दे. तुमचं कम तुम्ही करा. त्यांच्या कर्मात लुडबुडण्याच आपल्याला काहीही कारण नाही.' एवढं बोलून रमण शिष्यांना घेऊन आश्रमातून शांतपणे बाहेर पडले. चोरांनी आश्रम लुटला, पण काहीही मिळालं नाही म्हणून भक्तांना यथेच्छ बडवलं. त्यातच रमणांच्या मांडीवर मार बसला व ते तेव्हापासून लंगडू लागले. ह्या धक्काबुक्कीत एका भक्ताने पळून जाबून पोलीसाला बोलावून आणलं त्यावेळी रमण शांत स्वरात भक्तांना अध्यात्मिक प्रकरणाचा उलगडा करून देत बसलेले होते. रमणांना लोक त्यांची अद्वैतात पूर्णपणे रमलेली वृत्ती पाहून महर्षी म्हणू लागले. त्यांच्या आश्रमात अस्पृश्यांना विशेष उमळ्याची वागणूक मिळे. महर्षी त्यांच्यावर विशेष अनुग्रह करीत. स्वतः स्तोत्रं रचणं, दुसऱ्यांनी केलेली स्तोत्रं ऐकणं, पोथ्यांचे अर्थ उलगडून सांगणं, उपदेश करणं, पत्रावळी लावणं, अन्न शिजवणं, अशी अनेक कामं महर्षी स्वतः करीत. बहुधा ते मूकव्रतीच असत. तासंतास ते समाधिस्त असत. प्राणीजगतावर त्यांचा खास लोभ होता. कुत्र्यांना तर ते आश्रमाची अपत्यंच समजत. पक्षी त्यांच्या खांद्यावर बसत. त्यांच्या हातचं खात-पीत. माकडांचा आणि मधमाशांचाही महर्षींवर फार जीव होता. सर्प त्यांच्याजवळ येत. सर्व सृष्टीलाच जणू महर्षींनी अभयदान दिलं होतं.

महर्षी पहाटे तीनला उठत. नित्यकर्म उरकून पहाटेस ते मंचकावर ध्यानस्थ बसत. सहा वाजता भक्तांना त्यांचं दर्शनसुख लाभे. सात वाजता ते तांदळाची पेज पीत. महर्षी नंतर सभागारात येऊन व्याघ्रांबरावर बसत. लेखन करीत. त्यांनी खूप रचना करून ठेवली आहे. नंतर रसोड्यात भाजी चिरत. भांड्यांची घासपूस करीत. हातात धरायच्या काठ्यांना पुसून चकचकीत करणं हा त्यांचा एक छंदच होता. अकरा वाजता ते हलकी न्याहारी घेत. मग थोडी विश्रांती. तीनला पुन्हा हलका फराळ. नंतर दर्शनोत्सुक मंडळींची रांग लागे. तो विधी संपला की ध्यान. दिवेलागणीला जेवण. नऊ वाजता झोप. असं साधं, सरळ, शांत, शुचिर्भूत जीवन अखेरपर्यंत चाललं. महर्षी निर्मम होत चालले. लोक त्यांना भगवान म्हणू लागले. पण भगवान झाला तरी म्हातारपण त्याला थोडंच सोडणार होतं? देह तर विसावणारच होता. भगवान रमणमहर्षींच्या त्या अखेरच्या काळाचं मॉमने फार मनोज्ञ वर्णन केलेलं आहे. ते मॉमच्याच शब्दात मांडतो :—

'महर्षींचं पिकलं पान झालं. ते सत्तरीला टेकले. बराच काळ त्यांनी कोंदट गुहांमधून काढला होता. त्यामुळे संधीवाताचं दुखणं त्यांना जडलं होतं. त्यांची दृष्टी अधू होऊ लागली. अठ्ठे-

चाळीस सालाच्या अखेरीस त्यांच्या डाव्या खांद्यावर एक गाठ दिसली. गाठीच रूपांतर ठणकणाऱ्या फोडात झालं. ते गळू कापावं लागल. जखम भरून निघाली. पण थोडा वेळ उलटतो न उलटतो तोच दुसरी गाठ दिसू लागली. कॅन्सरचं निदान ठरलं. दुसरी शस्त्रक्रिया आवश्यक वाटू लागली. सर्जन म्हणाले, की महर्षींना वाचवावयाचा फक्त एकच मार्ग आहे—तो म्हणजे खांद्यापासूनच त्यांचा हात तोडण्याचा. महर्षींनी सक्त नकार दिला. मंद स्मित करीत ते म्हणाले, 'गडबडून जाण्याचं काहीच कारण नाही. देह हीच एक व्याधी आहे. तिचा नैसर्गिक शेवट होऊ दे. आपण देहाला छिन्नविछिन्न कशासाठी करायचं ?' त्यांची प्रकृती फार खालावली. रोग आटोक्यात यावा म्हणून लोकांनी जंग जंग पछाडले. मधूनच त्यांना गूणही आला. पण नंतर आणखी एक गळू टरारून आलं. आणखी एक शस्त्रक्रिया झाली. नंतर दंडाखाली आणखी एक गाठ आली. ती भरभर सुजली. तेव्हा मात्र डॉक्टरांनी हात टेकले. फक्त वेदना कमी करण्याचे औषधोपचार सुरू झाले. महर्षींनी भयानक वेदना सोसल्या. मात्र, वेदनांपासून ते अलीप्त झाले. ह्या सर्व दुखण्यात आपण जणू त्या गावचेच नव्हेत असे ते वागले. औषधोपचार करून घ्यायला त्यांनी संमती दिली ती केवळ शिष्यांना बरं वाटावं म्हणूनच. ते म्हणाले, 'विचारलंत तर आजवर जे सांगत आलो आहे तेच पुन्हा सांगेन, की


'माणूस'च्या दिवाळी अंकानिमित्त हार्दिक अभिनंदन.

## ज्योती मेटल वर्क्स

पुणे महानगरपालिका
व बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर्स
यांना
खडीचा पुरवठा करणारे
पुण्यातील
मोठे सप्लायर्स.

नं.–१०, ओस्वाल पार्क
शिवाजीनगर, पुणे – ५.

## मे. हिराचंद जेठमल आणि ब्रदर्स

विटांचे प्रमुख कारखानदार

नं.–१०, ओस्वाल पार्क
शिवाजीनगर पुणे – ५.

कसल्याही औषधोपचाराची ह्या देहाला गरज नाही. गोष्टी आपण होऊन घडतील तशा घडू द्यात.' आपल्या एका इमानी शिष्याला ते एकदा म्हणाले, 'आपले जेवण झाल्यानंतर ज्या केळीच्या पानावर आपण जेवलो ते खरकटं पान आपण तसंच ठेवतो काय?' दुसऱ्या एका वेळी ते त्याला म्हणाले होते, 'ठरल्या ठिकाणी बोजा नेऊन उतरवला की हेलकऱ्याला जसा आनंद होतो तसाच आनंद देहाच्या जंजाळातून सुटल्यावर ज्ञानी माणसाला होतो.'

ही जीवघेणी व्याधी दोन वर्ष टिकली. ह्या पर्वात त्यांना शक्य होतं तितका काळ त्यांनी आपली दैनंदिन कामं चोख उरकली. सूर्योदयापूर्वी एक तास ते स्नान आटपत. भेटायला येणाऱ्या भक्तांना ते नंतर दर्शन देत. त्यांच्या खालावलेल्या प्रकृतीची बातमी सर्व भारतभर पसरली. शेकडो भक्तगणांची रीघ लागली. त्यांचा एकाहत्तरावा वाढदिवस नेहमीप्रमाणे पूजाअर्चा होऊन साजरा झाला. भक्तांनी त्यांच्या सेवेसाठी म्हटलेली स्त्रोत्रं त्यांनी ऐकली. अरुणाचल मंदिराचा हत्ती दारात आला. महर्षींना त्याने प्रणिपात केला. जरासा थांबला. मग आपल्या सोंडेने महर्षींच्या पावलांना स्पर्श करून त्याने त्यांचा निरोप घेतला. महर्षी आता फार काळ जगत नाहीत हे उघड होतं. एकदा त्यांना छाती भरून आल्यासारखं वाटलं. डॉक्टर आले. परंतु महर्षींनी त्यांना परतून लावलं. महर्षी म्हणाले की आता थोड्याच अवधीत सर्व काही यथास्थित होईल; औषधपाण्याची गरज नाही. नंतर त्यांनी भक्तांना निरोप घ्यायला सांगितलं. त्यांना एकांतवास हवा होता. त्याच दिवशी संध्याकाळी दर्शनासाठी गर्दी करून बसलेल्या आपल्या भक्तांना त्यांनी गादीवरून पडल्या पडल्याच आपले अखेरचे आशीर्वाद सांगितले. सूर्यास्ताच्या सुमाराला त्यांनी आपल्याला ध्यान करण्याच्या पावित्र्यात बसविण्यास सांगितलं. तसं ते बसले. त्यांच्या समोरच्या खोलीत बसून भक्तगण महर्षींच्या अरूणाचलस्त्रोत्रं गावू लागले. त्यांच्या गालावरून आनंदाश्रू वाहू लागले. हृदयाची धडधड थंडावली. महर्षी एकांतात विलीन झाले. त्याच क्षणी, आकाशात एक धूमकेतू उगवला. क्षितिजावर चढत चढत तो नेमका अरुणाचलगिरीच्या माथ्यावर आला आणि अदृश्य झाला. लाखो लोकांनी तो चमत्कार पाहिला. एका महान आत्म्याच्या निर्वाणाशी त्यांनी त्याचा संबंध जोडला.'

□ □ □



स्नेहप्रभा प्रधान–एका बहु-
रंगी व्यक्तिमत्त्व. चित्रपट
आणि रंगभूमी या दोन क्षेत्रात
प्रामुख्याने त्या वावरल्या आणि
दोन्ही क्षेत्रात स्वतःचा असा
ठसा उमटवून गेल्या आज

# स्नेहप्रभा प्रधानांच्या आत्मचरित्रातील काही पाने

# स्नेहांकिता

वीस वर्षांनंतरही 'झुंझारराव' मधली त्यांची कमळजा आणि 'राणीचा बाग' मधली आंधळी उमा प्रेक्षकांच्या कौतुकाचा विषय बनू शकतात— यावरूनच त्यांच्या कलागुणांची आणि लोकप्रियतेची साक्ष पटते.

पण याहूनही फार वेगळं— निराळं, तुम्हा-आम्हाला फारसं परिचित नसलेलं असं एक विलक्षण जीवन त्यांनी

अनुभवलं. जगविख्यात स्त्री-रोगचिकित्सक पद्मभूषण डॉ. विठ्ठल शिरोडकर या जबरदस्त व्यक्तिमत्वाने त्यांचं हे अठरा वर्षांचं जीवन उजळून टाकलं.

स्नेहांकिता ही या जीवनाची भावपूर्ण कहाणी. ही सांगत असताना पूर्वायुष्यातील संस्कारांचा आणि अनुभवाचा आढावा घेणं क्रमप्राप्त होतं. म्हणूनच या कहाणीला आत्मचरित्राचं स्वरूप आलं आहे.

या आत्मचरित्रातील ही काही सुरुवातीची पाने....

अमुक एक घटना स्वतःच्या आयुष्यात कधीच घडणार नाही असे म्हणण्याचे धाडस, राव काय रंक काय, कुणीच कधी करू नये. जीवनाचा प्रवाह कोणत्या वेळी कोणत्या दिशेने वळेल हे फक्त त्या नियतीलाच माहीत. मानवाच्या शरीराची घडण नियंती ज्याप्रमाणे स्वहस्ते करते, त्याप्रमाणेच, त्याच्या जीवनाचा आकार, उकार, त्याची बरीवाईट वळणेही तीच ठरवते. उदरातील गर्भ काळा आहे का गोरा हे निदान नऊ महिन्याने तरी कळते पण स्वतःच्या जीवनाचे गूढ मात्र मानवाला शेवटची घटका भरत आली तरी कळत नाही.

मानव प्रवास सुरू करतो कुठे, त्याला जायचे असते कुठे आणि प्रत्यक्षात तो जातो कुठे! त्याने व्यक्तिस्वातंत्र्याच्या कितीही बढाया मारल्या, तरी जीवनाच्या रंगभूमीवर, सर्वोच्च दिग्दर्शकाच्या मर्जीबाहेर जाऊन, लहानसहान हालचाल करायचेही त्याला स्वातंत्र्य नसते. इतके असूनही तो जगायला धडपडतो! आणि मरताना तडफडतो! कारण त्याच्या कैदखान्याभोवती विधात्याने विविध वासनांचे

मंत्रमुग्ध करणारे क्रीडांगण आंथरून ठेवलेय्. मानवाला ती मोहक हिरवळ, ती रंगीबेरंगी फुले दिसतात पण त्यामुळे आच्छादित झालेली दुःखाची डबकी मात्र दिसत नाहीत ! त्या डबक्यात तो पडला तरी चित्रविचित्र मनोवेधक पोषाख करून आशा अनेक दिशांतून एकसारखी त्याला वर यायला खुणावते ! नव्हे आपला आधारही देते !

मानव पुन्हा उठतो. आशेच्या मागेमागे जिद्दीने पुन्हा प्रवास सुरू करतो. पुन्हा घसरतो ! पुन्हा धडपडतो! पुन्हा चाचपडत पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, आशेच्या ओठांच्या गोडव्याला भुलून ! आणि नियंता मात्र हा क्रूर खेळ पाहात पोट धरधरून हसतो !

त्याच्या जन्मापूर्वीच मानवाची असहाय्यता सुरू होते. त्याने केव्हा, कुठे जन्माला यायचे यावर मतदान देण्याचा त्याला जसा हक्क नसतो तसाच बरीवाईट परिस्थिती निवडायचाही त्याला हक्क नसतो.

कैद्यांना इकडून तिकडे नेताना कर्मचारी त्यांच्या डोळ्यांवर पट्टी जशी बांधतात तसेच एका अनामिक जगातून माणूस जन्माला येतो तो अंधावस्थेतच. पुढे कधीतरी ती पट्टी निघाल्यासारखे त्याला वाटते पण तो केवळ आभास असतो. तो ज्या वर्तमानक्षणात जगतो तेवढ्यापुरतेच त्याचे डोळे उघडे असतात पण पुढच्या क्षणाबद्दल तो संपूर्ण अज्ञानात असतो.

त्याला पैसा आणि कीर्ती मिळाली, की तो स्वतःची पाठ थोपटतो आणि म्हणतो, 'वा ! काय हुषारीने डाव खेळलोय मी !'' पण त्या बिचाऱ्याला माहीतच नसते, की सुखाचे दाखवायचे आणि खायचे दात निराळे असतात ! त्याला माहीत नसते, की दुःख, सुखाच्या उदरातच, जिभा चाटीत दबा धरून बसलेले असते !

ऐन रंगात मैफिल आली, की सुखाच्या उदरातून दुःख एकाएकी प्रगट होते. त्याच्या दर्शनाने मानवांचे पांढरे फटफटीत पडलेले चेहरे पाहून त्याला आसुरी आनंद मिळतो तर मानवाच्या विजयानंदाचा कैफ क्षणार्धात उतरतो.

जगात शाश्वत आहे ती फक्त अशाश्वती. बाकी सारी नातीगोती, कनक आणि कीर्ती तकलादू आहेत. झिजून झिजून नष्ट होणारी.

तारुण्याचा ताठरपणा कधी ना कधी कमरेतून वाकतो. सौंदर्याचा लुसलुशीतपणा वयाच्या सुरकुतलेल्या आवरणाखाली बेपत्ता होतो. सतत मनावर पडणारे अनुभवाचे कोरडे आत्मविश्वासाला तडा पाडतात. प्रियजनांचे चिर विरोग हास्याच्या कडा कायमच्या ओल्या करतात. 'मी, माझे, आमचे - असे' छाती फुगवून, मुठी आवळून म्हणणारा मानव एका भेसूर शक्तीपुढे आवळलेली मूठ आपोआपच ढिली करतो त्याच्या कीर्तीचा, सुखाचा, समृद्धीचा पोकळपणा त्याला एका क्षणातच' कळतो. वेसण घातलेल्या बैलाप्रमाणे साऱ्या आयुष्यभर विधी नेईल तिथे आपण जात होतो, आपले स्वातंत्र्य

मुलामा दिलेली केवळ गुलामगिरी होती, हे अटळ सत्य त्याला कळल्यामुळे त्याच्या डोळ्यांवरची पट्टी निसटून पडते, पण हाय ! तो जेव्हा खरा जागा होतो तेव्हाच त्याला कायमचे निद्राधीन व्हावे लागते.

अशीच नशिबाची वेसण घेऊन मी सुशिक्षित, सुसंस्कृत, सुविख्यात आई-वडिलांच्या पोटी जन्माला आले. जन्माला येताच माणूस नापसंतीने भोकाड पसरतो आणि दुर्दैवाने तेच त्याच्या आयुष्याच्या दोरीची पकड घट्ट करते. तो गुपचूप येत असता तर कदाचित आल्या पावलीच त्याला परत जाता आले असते.

माझ्या बाबतीत माझ्या आई-वडिलांच्या काय अपेक्षा होत्या ते मला माहीत नाही; पण मी मात्र जन्मापासूनच डॉक्टर होण्याचे वेड घेऊन आले होते. अजूनही कल्पनेतला तो स्टेथॉस्कोप माझ्या गळ्याभोवती लटकतो आहे. चित्रपटसृष्टीत गेल्या नंतरही वैद्यकीय शास्त्रातील कर्तबगार मंडळींशी सतत भेट आणि नव-नव्या वैद्यकीय शास्त्रांचे वाचन ह्या द्वारे सलगीचे संबंध जागवले आहेत. 'बरं नाही' असे नुसते कोणी म्हणताच त्याला उसने प्रश्न विचारून, त्यावरून त्याच्या आजाराचे स्वरूप ठरवून औषधांची नावेसुद्धा मी बहुधा अचुक सांगू शकते.

आई-वडील दोघंही राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन शिक्षणखात्यात पडलेली. तन-मन-धन सारे काही त्यांनी त्या ध्येयासाठी वाहिले. शाळेच्या आवारात हिंडणारी आईची इवलुशी पण पाणीदार मूर्ती पाहिली, की त्या वयातही अंतःकरण प्रेमाने भरून येई. वडिलांच्या बुद्धिमत्तेबद्दल तितकाच अभिमान वाटे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकले असते तर कदाचित् शैक्षणिक क्षेत्रातही कीर्ती मिळवली असती. त्या दिशेने गेले नसले तरी आई-वडिलांचे ते क्षेत्र आणि त्यात खऱ्या अर्थाने स्वतःला वाहणारी माणसे आजही मनाला चटका लावतात.

लहानपणी दुसरेही एक वेड होते ! रामायण, महाभारत या ग्रंथांचे. आम्ही मुरादाबादेत होतो. वाल्मिकीरामायण उचलता आले नाही तरी त्यातील पाने फार लवकर ओळखीची झाली. शब्दात नीटसे व्यक्त करता आले नाही तरी रामाने सीतेला फसवलेले मला आवडले नव्हते. घरापुढील बागेत जागोजागी रामाच्या नावाने चिठ्ठ्या लिहून ठेवीत असे मी. काय लिहीत होते ते मात्र आठवत नाही.

ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या वर्षापर्यंत माझी ध्येयाची गाडी येऊन पोहोचली. आणखी चार स्टेशने गाठली, की मालकीचा स्टेथॉस्कोप गळ्यात पडलाच समजा ! लहानपणी चुलीतल्या राखेच्या पुड्या करून घरातील पेशंटला देत होते. आता मात्र अगदी खरे रोगी बघण्याचे, तपासण्याचे आणि त्यांना औषधे देण्याचे दिवस जवळ जवळ येत होते. मेडिकलची पहिली परीक्षा दोन वर्षांनी होते. त्यावेळी करिक्युलममधे ॲनॅटमी, फिजिऑलॉजी हे दोनच विषय

होते. ॲनॅटमीसाठी प्रेताची चिरफाड करावी लागे. पण प्रत्यक्ष रोग्यांशी आमचा संबंध येत नसे. तरीही आमची स्वारी कॉलेजच्या वॉर्ड्स्भर फावल्या वेळी राउंड घेई. गरीब रोग्यांची आस्थेने चौकशी करी. त्यांची गाऱ्हाणी वॉर्ड सिस्टरच्या कानी घाली. त्यानेही काम झाले नाही तर वरील डॉक्टरपर्यंत पोहोचण्याच्या धमक्या देऊन काम साधून घेई.

वॉर्ड्स्मधून चक्कर मारणे हे नित्याचेच होते. त्याचबरोबर नामांकित डॉक्टर्सच्या शस्त्रक्रिया पहाणे हाही एक माझा विलक्षण आवडीचा विषय होता. डॉक्टर मुळगावकर, शांतीलाल मेहता, कूपर इत्यादी शल्यविशारदांचे शस्त्रनैपुण्य बघण्यात मी अगदी गुंग होई. एकदा डॉ. मुळगावकरांच्या ऑपरेशनच्या दिवशी मी काचेच्या भिंतीतून शस्त्रक्रिया बघण्यात रमले असताना त्यांनी बालकनीकडे बघितले आणि म्हटले, 'ही कोण आहे ?'

साहेब माझ्याबद्दल चौकशी करत होते हे माझ्या ध्यानीही नव्हते. शेवटी काही मुलांनी मला खुणावले. मी दचकून शुद्धीवर येत म्हटले, 'कोण सर, मी ?'

'हो हो तू–तू कोण आहेस ?'

'मी–मी स्टूडंट आहे या कॉलेजची!'

'तू–एवढीशी चिमुरडी पोर ? कुणी दिली तुला ॲडमिशन ?'

यावर सारी मुले हलकेच हसली. मुळगावकरसाहेब पुढे म्हणाले :

'पुष्कळदा येतेस तू ! फार रस दिसतो तुला.'

'हो सर.'

'बरं. मी विचारतो त्या प्रश्नाचं उत्तर दे पाहू.' आणि त्यांनी मला प्रश्न विचारला. तो काय होता हे मला आठवत नाही पण माझे उत्तर बरोबर होते हे नक्की आठवते. कारण त्यावर ते म्हणाले, 'गुड, व्हेरी गुड, यू विल मेक अ गुड डॉक्टर !'

'थँक यू सर' मी म्हटले. माझ्याकडे कौतुकाने बघणाऱ्या मुला-मुलींच्या नजरा चुकवीत मी नंतर पळ काढला.

याच–याच जे. जे. हॉस्पिटलमध्ये, ज्यांच्यामुळे आज मी हे पुस्तक लिहायला घेतले आहे ते, डॉ. व्ही. एन्. शिरोडकर-ही होते. किती विचित्र घटना म्हणावी हिला, की इतक्या सर्जन्सची कामे मी पाहिली, त्यामुळे त्यांच्याबरोबर दोन शब्दही बोलण्याची संधी मला मिळाली, पण डॉ. शिरोडकरांना मी त्यावेळी पाहिलेही नाही. त्यांचे मेव्हणे डॉक्टर वेलिणकरांना मात्र मी ओळखत होते. डॉ. वेलिणकरांना नाट्यकला इत्यादींची फार आवड होती.

म्हणूनच मी म्हटले, की माणूस डोळ्याला पट्टी बांधून आयुष्याचा प्रवास करीत असतो–विधीच्या संकेतानुसार– आणि म्हणूनच एकाच जागी असताना डॉकची आणि माझी साधी नजरभेटही झाली नाही. ज्या व्यवसायाचे मला वेड होते त्यात पडण्याचे माझ्या नशिबी नसावे ! आणि चित्रपट व्यवसायात अनेक वर्षे घालवल्यानंतर माझी आणि डॉकची भेट व्हावी–मैत्री व्हावी ती

कायमची !

१९३९ साली मी एका नव्याच दिशेने वाटचाल करू लागले. कॉलेजातील वक्तृत्व स्पर्धेत आणि संमेलनात मी प्रामुख्याने भाग घेत होते. त्यामुळे माझ्या विविध कलानैपुण्याबद्दल कर्णोपकर्णी बरीच प्रसिद्धी मिळाली होती मला. तेव्हापासूनच अनेक चित्रपटसंस्थांकडून मला बोलावणी येत होती.

बॉम्बे टॉकीज, मुरली मूव्हीटोन, रणजित सिनेटोन, हिंदुस्तान मूव्हीटोन इत्यादी कंपन्यांचे मालक हातात कॉन्ट्रॅक्ट घेऊन माझ्या मतपरिवर्तनाची वाट पहात होते. पण मला डॉक्टर व्हायचे होते. सिनेमात जाऊ का नको एवढाही मी कधी त्यावर विचार केला नाही.

कॉलेजात असताना एकदा आम्ही काही मुली सागर सिनेटोनमध्ये शूटिंग पहायला गेलो होतो. स्टुडियोच्या अफाट आवारात रंगरंगोटी करून, विविध रंगांचे झकपक पोषाख करून बरेच 'एक्स्ट्रा' गप्पा मारीत बसले होते. ते सारे पाहून आम्ही खरे म्हणजे नर्व्हसच झालो. 'आपण एकदा आत गेलो तर परत बाहेर पडू शकू ना!' हा विचार प्रत्येकीच्या मनात डोकावू लागला. पण वरवर तरी निर्भीडपणा दाखवून आम्ही मॅनेजरपर्यंत पोहोचलो. माझी कीर्ती तिथपर्यंत पोहोचली होती. त्यामुळे कंपनीचे मालक स्वत: श्री. चिमणभाई देसाईच आमच्या स्वागतार्थ पुढे आले. सुरेन्द्रकुमार, सवितादेवी या कलाकारांचे चित्रीकरण होते. चिमणभाई आम्हाला सेटवर घेऊन गेले, पण सवितादेवी आमच्या समोर काम करायला तयार होईना. म्हणून आम्ही ऑफिसमध्ये परत आलो. चिमणभाईंनी दिलगिरी प्रदर्शित केली, 'सविता व्हिजिटर्स समोर घाबरते' असं आम्हाला सांगून त्यांनी मला विचारले, 'तुम्ही का नाही काम करीत चित्रपटात? तुमच्या बहुगुणी व्यक्तिमत्त्वाबद्दल मी बरेच ऐकले आहे. येता का माझ्या कंपनीत? हजार, पंधराशे रुपये महिना देईन. तीन महिन्याचा करार करतो. तिसऱ्या वर्षी अडीच हजार मिळतील.'

पण माझ्या मनाची किंचितही चलबिचल झाली नाही. त्या जमान्यात अडीच हजार रुपये आज प्रमाणे कवडी किंमतीचे नव्हते तरीही.

सुरेन्द्रनाथ कॅमेऱ्यापुढे आल्यावर आम्हाला आत जायला मिळाले. त्याच्या गोड गाण्याने तो भरपूर प्रसिद्ध झाला होता. सुरेन्द्रनाथ आणि बिब्बो (हीही संगीत तज्ज्ञ) ही जोडी प्रेक्षकांची अती आवडीची झाली होती. जेनेट् मॅक्डोनाल्ड आणि मॉरिस शेव्हालिएप्रमाणे! शूटिंग संपल्यावर सुरेंद्रनी आम्हाला एक दोन गाणीही म्हणून दाखवली. मीही म्हटली. माझ्या आवाजावर सुरेन्द्र बेहद्द खूष झाला. 'चिमणभाई, या मुलीला आणाच रजतपटावर.' त्याने चिमणभाईला सांगितले.

'मी खूप सांगतो आहे पण त्या विचार देखील करायला तयार नाहीत. हे पहा मिस् प्रधान, कधी काळी विचार बदललाच तर आधी माझ्याकडे यायचे

वरं कां ?' त्यांनी प्रेमाने ताकीद दिली.

आम्ही बाहेर पडलो तेव्हा इतर मुलींनी एकदम मला घेरले, ' अग, हजार रुपये सुरवातीलाच देत आहेत ते. जा की. '

' आणि तिसऱ्या वर्षात अडीच हजार. '

' नको. मला नाही सिनेमात काम करायचं. मला डॉक्टर व्हायचंय. बॉम्बे टॉकीजलासुद्धा नकार दिला आहे मी '

माझे निग्रहाचे बोलणे ऐकून नियंता गालांतल्या गालात हसला असेल ! मी डॉक्टर होणार होते पण फक्त नवयुगच्या ' दिनरात ' चित्रपटात, हे मला काय माहीत ?

माझ्या आई-वडिलांना फक्त एकदाच भांडताना मी पाहिले. दोघेही विद्वान. उदात्त हेतूने जीवन जगणारे. त्यांच्या वयातील पंचवीस वर्षांचं अंतर सोडले तर सर्व दृष्टीने ती एकमेकांना अनुरूप अशीच होती. पण सावत्र भावंडांमुळे घरातील वातावरण दूषित झाले असावे असा माझा तर्क आहे. माझ्या मोठ्या वहिणीत आणि आईत वयाचे विशेष अंतर नव्हते. त्यामुळे तिला (वहिणीला) सावत्र आईबद्दल ईर्षा वाटत असावी. तिच्या आईच्या मृत्यूनंतर जरी वडिलांनी लग्न केले असले तरी एक तर आपल्या आईच्या जागी ही कोण आली आणि दुसरे म्हणजे आईच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल ईर्षा यामुळे या माझ्या वहिणीने माझ्या वडिलांचा चांगलाच कबजा घेतला होता. सारांश हा, की आई आणि वडील आपापल्या परीने गुणवान, ध्येयशील, कार्यशील, चारित्र्यवान असूनही त्यांचे एकत्र येणे सुखावह झाले नाही. माझ्यात आणि माझ्या सावत्र भाऊ-वहिणीत वयाचे बरेच अंतर आहे. तेव्हा मी सर्वच बाजूने एकाकी होते. माझ्या वयाच्या आसपासही घरात कुणी नव्हते. आईने माझ्या सावत्र भावंडांना लहानाचे मोठे करण्यात काहीही भेदभाव केला नाही. ती माझी जितकी काळजी घेत असे तितकीच त्यांचीही. पण त्याचे चीज झाले नाही. मुळातच अति भावनाशील असल्यामुळे मला घरातील विशिष्ट वातावरण जाचत असे. माझ्या वाट्याला वडील विशेष कधीच आले नाहीत, त्यामुळे इतर मुलांप्रमाणे मला खऱ्या अर्थाने सुख मिळाले नाही. म्हणूनच शेजारी-पाजारी राहणाऱ्या मुलांच्या वडिलांच्या सहवासात मला आनंद वाटे.

१९३६ च्या सुमारास एक अशी घटना घडली, की ज्यामुळे एकाच घरात राहणे आम्हाला असह्य वाटू लागले. त्यावेळी आम्ही कराचीत राहत होतो. तोपर्यंत मोठमोठ्या, ऐसपैस घरात राहणारे आम्ही ! लहानशा जागेत आमचे बिऱ्हाड हलवले. आजपर्यंत आयुष्यातील फक्त दोनच वर्षे अशी मला काढावी लागली. आईचे शिक्षणक्षेत्रातील कार्य चालूच होते. मी मेडिकल कॉलेजात जाऊ लागले, अर्थात् मुंबईत एका वसतिगृहात राहू लागले.

आणि नेमके याच सुमारास आईला

संधिवाताने पछाडले. माझी एक मावशी आणि मामा आईबरोबर राहत होते. त्या काळी संधिवातावर काहीच औषध नव्हते. अॅस्परीन्, मालिश आणि लाईट घेणे हेच उपाय प्रामुख्याने उपयोगात आणले जात होते. तसे पहायला गेले तर आजही संधिवाताचे कारण आणि त्यावर हमखास उपाय नाही.

आई बिछान्याला खिळलेली. तिच्या अंगावर तिच्या भावंडांची जबाबदारी आणि मेडिकल कॉलेजचा खर्च ! नियंत्याने स्वतःच्या हातातल्या लगामाला हिसके द्यायला सुरुवात केली. मी वैद्यकीय शिक्षणाला रामराम ठोकण्याची कल्पनादेखील आईला असह्य झाली असती. पण तिचे आजारपण आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या इतर समस्या 'आ' वासून समोर उभ्या होत्या. मी नुसता निश्चय करण्याचा अवकाश. एक नाही दहा चित्रपटनिर्माते माझी वाट पहात होते. 'काय करावे ?' हा एकच विचार मला रात्रंदिवस भेडसावू लागला. चार दिवसांची सुट्टी घेऊन मी आईला कराचीला भेटायला गेले. अॅम्ब्युलन्समधून तिला हॉस्पिटलात दाखल केली. तिच्या प्रकृतीची कसून तपासणी करवली. आजार संधिवाताचाच होता आणि ती केव्हा बरी होईल हे निश्चितपणे कुणीच सांगत नव्हते. त्याच भेटीत मी जवळजवळ निश्चय केला, की सिनेमात काम करायचे. उरलीसुरली अनिश्चितता ग्रँट मेडिकल कॉलेजचे अॅनॅटमीचे प्रोफेसर डॉ. दस्तूर यांनी दूर केली. मी सर्व परिस्थिती समजावून सांगितल्यावर ते मला आशिर्वाद देत म्हणाले, 'जरूर जा तुम्ही. मला तुमच्याबद्दल खात्री आहे. तुम्ही खूप यशस्वी व्हाल आणि तरीही आपले व्यक्तिमत्त्व उज्ज्वल ठेवाल.'

त्या दिवशी चिमणभाई देसाईकडे जाऊन मी सागर मूव्हीटोनच्या करारपत्रावर सही केली. मी सुरुवातीलाच म्हटले ना, की माणूस प्रवास सुरू करतो कुठे, त्याला जायचे असते कुठे आणि प्रत्यक्षात तो जातो कुठे !

करारनाम्यावर सही करून मी वसतीगृहात आले आणि खोलीचे दार बंद करून खूप रडले. लहानपणापासून उराशी बाळगलेले स्वप्न क्षणार्धात माझ्या हाताने मीच पुसले — नव्हे नियंत्याने पुसले. □

चित्रपटाच्या संबंधाने केलेल्या करारपत्रावर मी सही केली. चित्रपटात नियमित शूटिंग सुरू करण्यापूर्वी रंगरंगोटी करून टेस्टला मी कॅमेऱ्यापुढे उभी राहिले आणि हा हा म्हणता माझा चेहरा सुजला. अंगभर पित्त उठले. मिळेल त्या वस्तूवर अंग घासावेसे वाटावे अशी स्थिती झाली.

झट्दिशी मेक-अप् उतरवून मी प्रख्यात डॉक्टर फर्नॅन्डिसकडे धाव घेतली. त्यांनी चेहरा पाहताच सांगितले, की मला मेक-अप्चे वावडे आहे. उपाय ? मेक-अप् न करणे ! म्हणजे

करार मोडणे! चित्रपटसृष्टीला राम-राम ठोकणे!

चिमणभाईंनी मात्र चिकाटी सोडली नाही. 'काही दिवस थांबून पुन: आपण ट्रायल घेऊ' असे त्यानी प्रोत्साहन दिले.

दुसऱ्यांदा तोच प्रकार झाला पण जरा कमी प्रमाणात. फर्नॅन्डीस डॉक्टरांनी काही औषधे सुचवली ती घेत होतेच.

तिसऱ्यांदा टेस्ट झाली आणि फारसा त्रास न होता ती पार पडली. साऱ्यांचे जीव हलके झाले. पूर्वी स्वप्नांतही नसलेल्या एका नव्या वाटेवर नवीन जीवनाला मी १९३९ साली सुरुवात केली आणि ती १९५० पर्यंत चालू राहिली.

१९४९ साली मी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे होणाऱ्या 'झुंझारराव' (शेक्सपेअरची प्रसिद्ध शोकांतिका 'ऑथेल्लो' याचे रूपांतर) या नाटकातून माझी रंगभूमीवरील पहिली भूमिका केली. ॲलर्जीचा नाटकाच्या दोन दिवस आधी पुन: त्रास होऊ लागला. सूज, पित्तासारखे फोड, खाज सुटणे! सारे शरीर कसे लालबुंद टमाटोमारखे झाले होते. आममुलाचे वाटयावर वाटया सार प्यायले, इंजेक्शन्स घेतली! कुणी एखादा उपाय सुचवायचा अवकाश, की केलाच त्याचा प्रयोग! नाटकाच्या प्रयोगाच्या दिवशी सूज बरीच उतरली होती पण हातपाय आणि चेहरा बराच लालबुंद होता. पण त्यामुळे कमळजा अधिकच सुंदर दिसत होती. रंगभूमीवर प्रवेश करताच त्या उघडया मैदानावरील साडेमात हजार प्रेक्षकांनी एकमुखाने कौतुकाने एका सुरात 'आह!' म्हटले आणि कमळजेला—म्हणजे मला—दरबारात येताना घाबरलेली दिसण्यासाठी अभिनय करण्याची गरजच राहिली नाही. त्या 'आह' ने मन सुखावले असले तरी पाय मात्र कापू लागले होते.

'झुंझारराव' नाटकात काम करण्यापूर्वी मी शाळा, कॉलेजात साध्या एकांकिकेतही कधी काम केले नव्हते. नृत्य, संगीत, चुटके, नकलामधे विविध कार्यक्रम मी केले होते पण नाटकात भूमिका मात्र केली नव्हती.

त्यानंतर 'राणीचा बाग', 'भावबंधन', 'लग्नाची बेडी', 'संशयकल्लोळ' व 'मला काय माहीत' आणि 'सर्वस्वी तुझाच' ही मी लिहिलेली नाटके, रत्नाकर मतकरींचे 'वस्ताई' सुमतिदेवी धनवटे यांचे 'धुळीचे कण' आणि विद्याधर गोखल्यांनी 'विटनेस फॉर दी प्रॉसिक्यूशन' या अगाथा क्रिस्तीच्या नाटकाचे केलेले रूपांतर 'साक्षीदार,' इतक्या विविध नाटकांतून मी भूमिका केल्या.

या शिवाय गुजराती 'लग्ननी बेडी' आणि मारवाडी भाषेतील 'ढोला मेखण' यातही मी भूमिका केल्या होत्या.

सिनेमा काय, नाटक काय कालांतराने मला दोन्ही जगांचा वीट येऊ लागला होता. शिस्तीचा अभाव, आंतरिक डावपेच, हेवेदावे, कलाकाराचे हाल करून पै-पैसा वाचवण्याची कॉन्ट्रॅक्टवाल्यांची हीन वृत्ती, सिनेसृष्टी आणि रंगभूमीवरही वारंवार होणारी

शाच्या बाबतीतील फसवणूक (कंपनी-वाले आणि कॉन्ट्रॅक्टर्स दोन्हीकडून) या सर्वांची शिसारी आली होती मला.

१९५० साली 'बिरहाकी रात' हा माझा देव आनंद आणि नरगिसबरोबर चित्रित झालेला चित्रपट शेवटचा ठरला. शूटिंगच्या निमित्ताने, शूटिंग संपल्या-वरही काही मंडळींनी पंधरा वीस दिवस पाचगणीत जो धुमाकूळ घातला त्या-बद्दल कानावर आलेली बातमी इतकी धक्का देणारी होती, की क्षणभर वाटले चित्र पूर्ण न करताच निवृत्त व्हावे. तेव्हाच माझे मन कायमचे उतरले. नाटकाचे दौरे चालू होते; पण त्यातूनही राजकारण भरपूर होते. घरी माझ्या प्रकृतीकडे लक्ष देणारे कोणी नव्हते. सोबतीला राहणाऱ्या मावशी (बेबी-मावशी) आणि मामा दोघेही तसे असमर्थ. त्यात मामाही १९४८ साली गेले. बेबीमावशी असूननसून सारख्या होत्या आणि १९५० मध्ये त्या इतर ठिकाणी राहात होत्या.

दौऱ्याहून घरी आले, की नोकरा-चाकरांनी गैरहजरीत केलेला धुमाकूळ, चोहोबाजूंनी पडलेला ताण, नवयुगमध्ये आलेला अप्रिय अनुभव, यामुळे एके दिवशी कंटाळून मी ॲलर्जीसाठी माझ्या जवळ असलेल्या बाटलीतील साऱ्याच



स्नेहप्रभा प्रधान आणि शाहू मोडक । पहिली मंगळागौर या गाजलेल्या चित्रपटात

विनूला वाचा



स्पर्धकाचे नाव आणि पत्ता

माणूस साप्ताहिक । १६ सप्टेंबर १९७२ । किमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९




मला सुचणारी कल्पना : विनूच्या डाव्या हातात प्रेशर कुकर आहे. उजव्या हातात कुकरचं झाकण. कुकर रिकामा आहे. विनू स्वयंपाकघरात उभा आहे न् म्हणतोय्–

"अग एऽऽ! हा कुकर आहे; कुक नव्हे ! त्यात अन्न शिजत ठेवायचं काम ाच करायला हवं ! !"

स्पर्धा (अ) आणि (क) च्या उत्तरासाठी या पत्रकाला एक स्वतंत्र कागद जोडावा.

पण सखारामला एक माहीत होतं. चोर शहरात नवीन आहे न् त्याला रस्त्यांची फारशी माहिती नाही. चोराच्या ह्या अज्ञानामुळं व स्वतःला असलेल्या शहरातील रस्त्यांच्या संपूर्ण माहितीमुळं आपण चोरापेक्षा कमी वेगानं धावूनदेखील एका विशिष्ट जागेवर त्याला निश्चित पकडू अशी सखारामची खात्री होती.

चोराला विहीर, तुरुंग, कोर्ट व पोलीस कचेरीकडे जाणारे रस्ते मात्र चांगले माहीत होते. सखारामनं चोराला कसं पकडलं ते पान १ वरील रस्त्याच्या नकाशात त्याचा धावण्याचा मार्ग दाखवून व अगदी थोडक्यात सांगा. (जास्तीत जास्त १० वाक्ये)

---

## (ब) व्यक्ती आणि गफलती

शेजारील चित्रातल्या आठ व्यक्तिचित्रे रेखाटताना काही गफलती झाल्या आहेत. तर त्या आठ व्यक्ती कोण न् गफलत कोणती ओळखा.

| | व्यक्तिचं नाव | गफलत |
|---|---|---|
| १. | ________ | ________ |
| २. | ________ | ________ |
| ३. | ________ | ________ |
| ४. | ________ | ________ |
| ५. | ________ | ________ |
| ६. | ________ | ________ |
| ७. | ________ | ________ |
| ८. | ________ | ________ |

---


## (क) विनूला वाचा–

पृष्ठ क्रमांक ४ वर विनूचे चित्र आहे.

हा विनू. एका अवघड क्षणी !

हा अवघड क्षण कोणता अन् विनू काय म्हणतोय् हे तुम्ही तुमची कल्पना लढवून सांगा. चित्रात विनूचे हात रिकामे दाखवले आहेत. तुम्ही त्याच्या एका किंवा दोन्ही हातात, पायाखाली, अथवा इतर कोठेही कोणतीही गोष्ट कल्पू शकता. इतकेच नव्हे तर चित्र आडवे, उभे कसेही वापरू शकता.

रंगतरंग स्पर्धा — वसंत सरवटे — क्रमांक पाच




## (अ) सखाराम चोराला पकडतो

रात्रीची वेळ. नाईट ड्यूटीवरील सखाराम पोलीसने रस्ता क्रमांक १० वरील एका घरातून चोरी करून बाहेर पडलेल्या चोराला पाहिले. चोरानं सखारामला पाहताच बाणाच्या दिशेनं पळायला सुरुवात केली. अन् सखारामनं त्याच दिशेनं त्याचा पाठलाग करायला सुरुवात केली. चोर चपळ होता. तर आमचे सखारामपंत थोडे अंगानं आडवे होते, त्यामुळे चोरापेक्षा अधिक वेगानं धावून त्याला पकडणं आपल्याला अशक्य आहे हे त्याला माहीत होत.

गोळ्या ग्लासभर पाण्याने घशाखाली घातल्या. नोकरांनी (जुहूला) बाजूच्याच बंगल्यात राहणाऱ्या युरोपियन गृहस्थांना लगेच बोलावले. ते मला हॉस्पिटलमधे जवळजवळ बेशुद्धावस्थेतच घेऊन गेले आणि दुर्दैवाने मला पुनर्जीवन मिळाले. पुनर्जीवन मिळाले खरे, पण घरात, काळजी घ्यायला माझी हक्काची कोणीच माणसे नव्हती. अशक्तपणा पूर्ण भरून येण्यापूर्वी पुनः जीवनाच्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे लागले. त्यामुळे प्रकृतीची घडी एकदा जी विस्कळीत झाली ती कायमची.

मी घेतलेल्या गोळ्यांमुळे आलेल्या अशक्तपणामुळे माझ्या समस्या वाढल्या मात्र. खरं कारण माहीत नसल्यामुळे धंद्यातील स्वार्थसाधूंनी त्याचा भला मोठा बाऊ करून माझ्या 'नखरेलपणाची' (!) करायची तेवढी प्रसिद्धी केली. नखरेलपणा काय तर माझ्या दर्जाच्या कोणाही आर्टिस्टला मिळाव्यात तशा दोनचार सोयी ! दौऱ्यात विश्रांतीसाठी स्वतंत्र खोली ! साधे, बिनतिखटी शाकाहारी जेवण ! सकाळच्या नाश्त्याला अंडी, रात्रीला पुनः साधे बिनतिखटी शाकाहारी जेवण ! तेही प्रयोगापूर्वी. प्रयोग होत असताना मी क्वचितच चहाचा एखादा कप घेत असे.

प्रवासात असताना गावात भटकण्याची माझी सवय नव्हती. खोलीत वाचन करीत पडायचे. नाटकाच्या संवादाची उजळणी करायची, भूमिके-



राणीचा बाग

तील नवीन बारकावे धुंडाळायचे आणि ठरलेल्या वेळी माझा मेकअप् मीच करून थिएटरवर जायचे. अनेक ठिकाणी माझी व्याख्याने ठरायची किंवा गावात मायेची मंडळी असली तरच मी बाहेर पडत असे.

रंगभूमीवरील साऱ्या कारकीर्दीत माझ्या मेक-अप्साठी, किंवा धुलाईसाठी कपर्दीकही कधी खर्च आला नाही कुणाला. कपडेसुद्धा माझे स्वत:चेच असत.

आई असताना काश्मिरला एकदा, एकदा महाबळेश्वरला, एकदा माथेरानला आणि शूटिंगच्या कामासाठी एकदा पांचगणीला मी गेले. तेही १०-१५ दिवसांपेक्षा कधीच जास्त राहिले नाही. पांचगणीला तर फक्त चारच दिवस होते. आईच्या मृत्यूनंतर १९४७ साली दोन महिन्यासाठी मी इंग्लंडला गेले होते.

१९५० साली केलेल्या प्राणाहुतीच्या प्रयत्नामुळे माझी मन:स्थिती नेहमीच काहीशी 'उदास'च झाली होती. १९४६ साली माझ्या आईचा मृत्यू झाला. आणि खरंतर तिच्या मृत्यूनंतर मला कशातच रस राहिला नव्हता. रडत बसण्याचा माझा पिंड नाही पण मी अधिकाधिक घरकोंबडी बनले. महिनान् महिना कधी चित्रपट पाहिला नाही, बाहेर पडले नाही. कधी हवापाणी बदलण्यासाठी बाहेरगावी गेले नाही. मी, माझी मुकी मुले आणि पुस्तके यातच माझे मन गुंतवून दिवस मोजीत असे मी ! मात्र एकटेपणाची भीती माझ्या मनात घर करून बसली होती. त्यामुळे दौऱ्यावर सोबतीला कुणाची तरी नेहमी गरज वाटू लागली. त्यामुळे जे पैसे मिळायचे त्यात सदा आया नाहीतर सोबतीला येणाऱ्यांचा हिस्सा असायचा. त्यामुळेही मनावर सदैव दडपण आणि डोक्यात उद्वेग असायचा.

घरी आल्यावर वाटायचे आल्या पावली सापडेल त्या वाटेने परत जावे. फक्त माझ्या मूक प्राण्यांचे प्रेम मला अडवून ठेवी. व्यवसायासाठी बाहेर पडलेल्या स्त्रीच्या माथी दुप्पट जबाबदाऱ्या असतात. बाहेरच्या जगात पुरुषासारखे लढावे लागते आणि घरात संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. आमच्या बेबीमावशींनी साऱ्यात्र जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवली होती ! जणू काही दु:ख फक्त त्यांच्याच नशिबी आले होते ! जणू काही नवऱ्याच्या भ्रमरवृत्तीने दुखावलेल्या त्या एकमेव होत्या !

एकीकडे खर्च वाढला होता तर दुसरीकडे बेबीमावशी स्वर्गातून आपोआप पैसा बरसतो आहे अशा वृत्तीने वागायच्या ! दोन व्यक्तींच्या संसाराला वाण्याचे बिल दोनशे अडीचशे यायचे यावरूनच सारे लक्षात येईल. माझ्याकड मोजकीच माणसे आणि तीही साध्या वृत्तीची येत असत. त्यामुळे पार्टर्या, व्यसने, सिनेमा, रेसीस वगैरे कशातच पैसे उधळले जात नव्हते. पण खर्च मात्र वरचा आकडा धरून बसला होता. मी वेश्याव्यवसाय करून पैसा आणला असता तरी मला नाही वाटत, की माझ्या मावशीला त्याची खंत वाटली असती ! त्यांच्या उपयोगी पडावा म्हणून

त्या घरखर्चातून उद्यासाठी गुपचूप पैसा जमा करीत होत्या.

वाचणाऱ्यांचा गैरसमज होऊ नये म्हणून–सध्या माझ्या एकुलत्या एक मावशी आहेत त्यांच्याबद्दल हा मजकूर नाही हेही स्पष्ट केले पाहिजे. त्यांना आम्ही माईमावशी म्हणतो आणि त्या पुण्याला त्यांच्या मुलाकडे असतात. त्यांचे पूर्ण नाव अहिल्याबाई वाबळे.

कामानिमित्ताने आणि मुंबईत घर मिळत नव्हते म्हणून जुहूची जागा सोडल्यावर मधल्या काळात माझे बॉम्बे पूना शटिंग सारखे चालू होते.

१९५० मध्ये चित्रपटातून मी कायमचा संन्यास घेतला. सरस्वतीच्या आशीर्वादाने रंगभूमी माझ्या मदतीला धावली होती. तितक्यात फेमस पिक्चर्सचे मालक श्री. बाबूराव पै पुण्याला मुद्दाम माझ्या भेटीसाठी आले. त्यांनी त्यांच्या कन्सर्नमध्ये मला नोकरीचे आवाहन दिले. डॉक्युमेंट्रीज् आणि अॅटव्हर्टायझिंग फिल्म्स्चे (माहितीपट आणि जाहिरात-पट) खाते मी चालवावे अशी त्यांनी सूचना केली. पगार महिना हजार रुपये.

ज्ञान वाढण्यासाठी नवनव्या क्षेत्रात माझे कौशल्य पणाला लावण्यात मला विलक्षण आनंद मिळतो. मी कामावर रुजू झाले. त्यात मी समाधानकारक प्रगती दाखवली. एका संपूर्ण १७,१८, हजार फूट चित्रपटाचे एडिटिंग करुन दोन हजार फुटाचा चित्रपट तयार करुन दिला. हे झाले कामाबद्दल. पण पैशाबद्दल? चोहीकडे आला होत तोच–नव्हे, त्यापेक्षाही वाईट अनुभव!

या नोकरीत मला गुंतवायचा विधीचा अगदी निराळाच उद्देश होता हे मला नंतर कळले.

मुंबईत मी सोमवार ते शुक्रवारपर्यंत माधवाश्रमात राहायची. शनिवार, रविवारी पुण्याला माझ्या मुक्या बाळां-साठी परतायची. घर आणि त्यांना सांभाळायला निवृत्ती नावाचा एक फार गुणी हुषार मुलगा मला नाटकाच्या एका दौऱ्यात अहमदनगरला मिळाला होता. त्याच्यावर माझी फार माया जडली आणि होताही तो त्या योग्यतेचा.

शिवाय शिरोळे पार्कमधील माझ्या (भाड्याच्या) बंगल्याच्या अगदी समोर नकलाकार भोंडे यांचे शिक्षणक्षेत्रातून निवृत्त झालेले बंधू मामासाहेब भोंडे आणि त्यांच्या मृत पत्नीच्या भगिनी मावशीबाई राहात होती. मावशीबाईंनी मामासाहेबांच्या मातृहीन मुलामुलींना आईप्रमाणे सांभाळले. त्यांचे आणि माझे फार प्रेमाचे संबंध जमले. इतके की त्यांच्याकडे जरा गोडधोड केले तर मला टाकून ते ती मंडळी खायची नाहीत. त्यांचा मुलगा बाळ. पुढे त्याच्या पत्नीशीही माझी गट्टी जमली.

मामासाहेब भोंडे आणि मावशीबाई समोरच असलेल्या माझ्या घराकडे लक्ष ठेवीत. नोकर बरोबर काम करतो की नाही, कुत्र्यांना नीट सांभाळतो की नाही हे सारे दक्षतेने पहात. एके दिवशी त्यांची मला तार आली, की नोकर उनाडटप्पूपणा करू लागल्यामुळे कुत्र्यांचे

हाल होताहेत. यास्तव मी तावडतोब निघून यावे.

एके दिवशी व्होल्टाज्‌चे त्या काळातील पब्लिसिटी मॅनेजर श्री. तल्यारखान यांना आमच्या स्टुडिओच्या ॲडव्हर्‌टायझिंग फिल्म्स्‌ दाखवायाचे मी ठरवले होते. तार हाती मिळताच मी फार अस्वस्थ झाले. तल्यारखानला मी फोन केला आणि माझ्याऐवजी दुसरे कोणीतरी त्यांना त्या फिल्म्स्‌ दाखवतील अशी तरतूद केल्याचे सांगितले. फोन खाली ठेवायच्या आधी घराबद्दलची माझी अडचण मी त्यांना समजावून सांगितली. माझी त्यामुळे किती धावपळ होते आणि नुकसान होते याची त्यांना कल्पना दिली आणि सहज म्हटले, 'तुमच्या माहितीतला एखादा फ्लॅट आहे का रिकामा ?' पण, 'तत्त्वा 'मुळे मी पगडी देऊ शकणार नाही' असेही सांगितले.

पगडी आणि अवाढव्य भाडी याचा जमाना सुरू झाला असताना मी पगडी द्यावी न लागणाऱ्या घरमालकाची चौकशी करीत होते हे आकाशातील चंद्राची मागणी करण्यासारखेच होते ! पण तल्यारखानने जे उत्तर दिले ते ऐकून मी थक्क झाले आणि परमेश्वराच्या पाठिंब्याची मला पुनः एकदा प्रचिती आली.

तल्यारखान म्हणाले, 'मी क्लब रोडवरील एका बंगल्याच्या तळमजल्याच्या अर्ध्या हिश्श्यात राहातो आहे पण ती जागा मी आता सोडणार आहे. मालकाला सांगून ती मी तुम्हाला देऊ शकेन.'

'पगडी ?'

'पगडी नाही आणि भाडंही फक्त दोनशे रुपये आहे. साधारण ८५० स्क्वेअर फूट जागा आहे. फ्लॅटला तसा फारसा आकारउकार नाही पण–'

'तल्यारखानसाहेब, तुम्ही क्षण न दवडता कृपा करून त्या फ्लॅटचे नक्की करा. मी भाडं पाठवते.'

'छे, छे, आधी तुम्ही जागा पहा मग ठरवा.'

'जागा कशीही असली तरी मला पाहिजे. पुण्यातून माझा संसार मला मुंबईला हलवलाच पाहिजे.'

पण तल्यारखान 'जागा पहा' असा आग्रहच धरून बसले. मी त्यांच्या मर्जीप्रमाणे पेसिकाकांच्या बंगल्यावर गेले. तल्यारखानच्या नेपाळी पत्नीने मला जागा दाखवली. तशी जागा वाईट नव्हती पण आगगाडीच्या डब्याप्रमाणे एकाला एक लागून खोल्या होत्या. अडगळीच्या खोलीचे सैंपाकघरात रूपांतर केले होते. दिवाणखाना घरात शिरताच होता पण काही झाले तरी हे घर होते. त्यासाठी पगडी द्यायची नव्हती आणि भाडे फक्त दोनशे रुपये होते. मी लगेच हवाली रक्कम देऊन भाडे चिठ्ठी माझ्या नावावर करवून घेतली. तल्यारखानने ग्वाही दिल्यामुळे माझ्याबद्दल चौकशी न करता घरमालकांनी घर दिले.

फेमसमध्ये नोकरी लावून देण्यात परमेश्वराचा काय हेतू होता हे माझ्या लक्षात आले.

या घरात मी सात वर्षे राहिले. पण

सुरुवातीला फार गमतीदार अनुभव आला. मी राहायला आल्यावर आठवड्याभरात इकडून तिकडून मी सिनेमानटी आहे हे पेसिकाकांना कळले. मग मात्र त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. 'ही बया आता दारूचा गुत्ता बनवणार घराला! नाही त्या पुरुषांची तिच्या घरी ये-जा होणार! हसणे, खिदळणे आरडा ओरड, बेशिस्त आणि बेफाम वातावरणाने माझा शेजार असह्य होणार याची त्यांना खात्री वाटली. कारण चारच घरे सोडून एक नटी तिथे काही महिने राहायला आली होती. तिच्या फाजीलपणाने कंटाळून तिला कायद्याच्या आधाराने काढावी लागली होती. साहजिकपणेच मीही नटी असल्यामुळे माझाही असाच अनुभव येणार असे त्यांना ठाम वाटले. त्यामुळे त्यांच्या घरातील स्त्रियांशी मी बोलायला गेले, की त्या मला त्रोटक उत्तर देत आणि संपर्क टाळीत. तळमजल्याच्या राहिलेल्या अर्ध्या हिश्शात त्यांचा भाऊ, भावजय आणि तिची लहान मुलगी, शिवाय एक विधवा भावजय आणि बहिणीचा मुलगा इतकी मंडळी राहात होती. वरच्या मजल्यावर स्वत: घरमालक, त्यांच्या पत्नी, आई, दोन मुले, एक सून आणि काही महिन्यापूर्वीच जन्माला आलेली नात इतकी मंडळी होती. आणि तरीही मला वाळवंटात रहात असल्याप्रमाणे वाटायचे. माझा स्वभाव जात्याच मैत्री करण्याचा, घरोबा वाढवण्याचा, पण ही मंडळी तर इतकी तोडून वागत होती! मला घर द्यायला लावल्याबद्दल तल्यारखानना त्यांनी दोष दिला, पण त्यांनी त्यांची भीती अस्थानी आहे अशी ग्वाही घरमालकाला दिली. हातच्या काकणाला आरसा लागत नाही. महिन्यातच माझ्या राहाणीचा साधेपणा, शिस्तबद्ध आयुष्य, ज्ञानार्जनाची आवड, घरकामात लक्ष, खानदानी वागणूक याचा त्यांना प्रत्यय आला आणि ती सारी मंडळी स्वत:हूनच माझ्याशी संबंध वाढवू लागली. ते माझ्याशी तोडून वागले या बद्दल अधिक ओळख झाल्यावर त्यांनी क्षमा मागितली. त्यानंतर आमचे संबंध फारच घरोब्याचे झाले. सात वर्षांनी त्यांचे घर सोडून मी सध्याच्या पेडररोडवरील 'नीलकमल' मध्ये आले तेव्हा तर त्यांना खूप वाईट वाटले. माझे आजोबाच्या वयाचे श्री. पेसिकाका यांनी मला एनसायक्लोपीडीया (ग्रेशॅम)चे १२ जाडजूड ग्रंथ दिले. त्यांची किंमत किती असेल हे मी सांगायला नकोच. त्या शिवाय त्यांनी मला फार सुंदर पत्र लिहिले, 'तुमच्या इतका सद्गुणी, सद्वर्तनी, शिस्तप्रिय भाडेकरू आम्ही आजपर्यंत पाहिला नाही.'

त्यांना मी चांगली वाटले आणि मला ते. खरोखरच त्या मंडळींनी माझ्याशी फार प्रशंसनीय वर्तन केले. लहानापासून मोठ्यांपर्यंत माझी मैत्री होती. पेसिकाकांच्या आई जवळजवळ शंभरीला पोचल्यावर दिवंगत झाल्या. मिसेस पेसिकाका गेल्या तीन चार वर्षांपूर्वी वारल्या. आजही माझे पेसिकाकांच्या घरातील उरलेल्या मंडळींशी

उत्तम स्नेहसबंध आहेत हे सांगण्यात मला आनंद वाटतो.

श्री. मामासाहेब भोंडे यांच्या वडीलकीमुळे त्यांचा आणि मावशींचा सहवास मला जसा हवाहवासा वाटायचा त्या प्रमाणेच पेसिकाका आणि त्यांच्या साठीच्या आसपास असलेल्या पत्नीचा सहवासही मला प्यार होता. माझ्या स्वभावाचे हे वैशिष्टय फार महत्त्वाचे आहे. वडिलांच्या लाडकौतुकाला सावत्र भावडांमुळे मी मुकले गेल्यामुळे वडील मंडळींकडे माझा लहानपणापासून ओढा असतो. त्यांची सेवा करावी त्यांना मुलीच्या प्रेमाने सांभाळावे आणि त्यांच्याकडून वडिलांच्या मायेची उणीव भरली जावी ही भूक मला सदैव भासते. त्या मुळेच माझ्या मित्र-मैत्रिणींच्या, नातलगांच्या, वडीलधाऱ्या मंडळींनी माझ्या घराला पायधूळ झाडली तर मी मनस्वी सुखावते. डॉ. शिरोडकर मला प्यार झाले ते त्यामुळेच. मुलीत नेहमी मातृत्वाचा अंश नैसर्गिकपणेच असतो म्हणून मी कुणाची मुलगी बनले, की त्या बरोबर आईची मायाही देत असते हेही नोंद करावे.

या घराच्या समोरच राहाणारी धायमोड मंडळी नुकतीच माझ्या ओळखीची झाली आहेत. त्यांच्या आई घरात असल्या, की त्यांच्याशी बोलण्यात मला सुख वाटते. परवाच त्या सुनेबरोबर नील-कमलला भेट देऊन गेल्या. घराला अशावेळी आगळीच शोभा येते. मला वयाच्या वडीलकीचे महत्त्व वाटत नाही. पण व्हायलीनसारख्या वाद्याला वर्षामागे वर्षे लोटली की जसा अधिकाधिक गोडवा आणि गुंज येते तशीच वयाने स्थिरावलेली, आध्यात्मिक मूल्याने समृद्ध झालेली आणि स्वभावाने मायेचे मोहोळ झालेली वडील मंडळीच फक्त मला आवडतात. केवळ पांढऱ्या केसाने हुरळून मी त्यांच्या पायाला हात लावायला तयार होत नाही.

फेमसची नोकरी मी सोडली पण नाटकाचे दौरे चालू होते. प्रवासाचा जात्याच कंटाळा पण जन्मतःच पायाला भिंगरी लावून आल्याप्रमाणे मला सारखा प्रवास करावा लागत होता. अधूनमधून एकाएकी नर्व्हस वाटू लागायचे. त्यासाठी सोबतीला कधी आया, कधी नर्स कंपॅनियन तर कधी मित्रमंडळीपैकी कुणी अशी सोय करावी लागायची. पैसे देऊन ठेवलेल्या नोकरांची रीतच असते, की खायचे एकाचे आणि तोंड फाडून प्रशंसा करायची शेजाऱ्याची. त्यामुळे माझे आजारपण इतरांना चांगलाच करमणुकीचा आणि निंदेचा विषय झाला होता.

कधी मित्रांपैकी कुणाला बरोबर नेले म्हणजे तोंडावर नाही तरी मागे त्याबद्दल बाजारगप्पांना भरपूर वाव सापडायचा. वरे नर्व्हसनेसमुळे सोबत येणाऱ्याला माझ्याच खोलीत रहावे लागायचे. मग तर काय ' भुताच्या हातात दिले कोलीत आणि भूत लागले नाचायला ! '

कोकणच्या दौऱ्यावर माझ्यावर भलताच पेचप्रसंग आला. माझ्या सोबतीला माझ्या एका बंगाली मित्राला

मी घेतले होते. कारण नेहमीचे. नर्स आयांचे खर्च परवडण्यासारखे नव्हते. आम्ही टिकेट ऑफिसात आमची खरी नावे सांगितली. पण पति पत्नीशिवाय एकाच केबीनमधे राहण्याची परवानगी नव्हती. मी माझी समस्या समजावून सांगितली. पण अधिकाऱ्यांचा नाईलाज होता. सोबतीशिवाय जाणे शक्य नव्हते आणि आयत्या वेळी इतर कुणी मिळणेही शक्य नव्हते. आम्ही खरे सांगूनही कायद्याच्या डोळ्यात धूळ घालायला पति-पत्नी म्हणून आमची नावे नोंदली गेली. सारांश हा की कायद्याची बंधने मोडली तरी त्याच्यावर पांघरूण घालता आले पाहिजे. किती मूर्खपणा होता हा! मला प्रवासभर विलक्षण अवघडल्यासारखे वाटत होते. पण नाईलाज होता. ◻

मधल्या काळात नैराश्यवाद आणि उदासीनतेने इतके घेरले होते, की माझा बराच वेळ नर्सिंग होममध्ये जात असे. पुणे सोडल्यावर मी जुहूला गेले आणि त्या नंतर मुंबईत एका खाजगी हॉटेलात पेईंग गेस्ट म्हणून राहिले. या सुमारास डॉ. डोशी नावाच्या एका वृद्ध गृहस्थांशी माझी ओळख झाली. गृहस्थ वयाने पासष्ट तरी असावेत. कुटुंबवत्सल होते. दोन बायका पचवल्या होत्या. तिसरी तरुण होती. ते स्वतः तिचे वडील शोभत होते. रोज पूजा पाठ, ग्रंथपठण वगैरे व्हायचे. भावनातिरेकामुळे व्यवहारात थपडा खाण्यासाठीच आमचा जन्म झाल्यामुळे डॉ. डोशींच्या सांगण्यावरून मी जुहूच्या घरातून माझे पुण्याचे पाचदहा खोल्यांचे सामान, दहा हजाराची लायब्ररी, दागिन्याची पेटी आणि साड्या, अभ्रे, चादरी, पडदे यांनी भरलेल्या वीस बावीस ट्रंका त्यांच्या मालकीच्या घरात ठेवल्या! बंगला मोठा होता. 'उगाचच दुसऱ्या जागी भाडे देऊन कशाला रहाता. माझ्या मुलामुलींबरोबर तुमचा वेळ मजेत जाईल' असा युक्तिवाद करून धर्मनिष्ठ, वेदपठणकार डॉ. डोशींनी माझ्या साऱ्या ऐहिक वस्तू बळकावल्या. दागिन्यांची पेटी फोडून त्यातून लहानमोठ्या किमती वस्तू 'गायब' केल्या!

पेसिकाकांच्या बंगल्यात मी आले ती जवळ जवळ संन्यासिनीच्या वेषात. दहा बारा जुनाट साड्या, एक सतरंजी, दोन कपबशा, चमचे आणि सैपाकाला दोन चार भांडी! बस्स्! हा माझा संसार!

घरमालकीणीकडून मी एक पलंग, एक ड्रेसिंग टेबल, एक खुर्ची इतकं सामान तात्पुरते मागून घेतले. माझे सामान सावकाश येत आहे असे मी त्यांना सांगितले आणि ती काही थाप नव्हती. संसाराच्या गरजा अगदी पहिल्यापासून गोळा करायच्या होत्या मला. या समस्येच्या वेळीही मी कुणा नातलगाची मदत घेतली नाही किंवा ती देऊ करायचे कुणाला सुचले नाही.

बेबी मावशी माझ्याबरोबर होत्या. माझी मूक पोरेही. पेसिकाकांच्याकडे येण्यापूर्वी पुण्यात शिरोळे पार्कमधे मी ज्या बंगल्यात भाड्याने राहत होते ते

सारे सामानही घराप्रमाणे भाड्याचे होते. मुंबईला आपले भरपूर सामान आहे मग उगीच कशाला भर घाला त्यात असा सुविचार मी केला होता.

बेबी मावशी वयाने वडील म्हणून आणि पलंग एकच असल्यामुळे मी त्यांना झोपायला पलंग दिला होता. मी खाली सतरंजीवर झोपत असे. अंगावर घेण्यापुरते नवीन कपडे अर्थातच विकत आणले होते.

का कुणास ठाऊक आर्थिक अडचणीने मी साऱ्या आयुष्यात कधीच खंगले नाही. मला असह्य वेदना झाल्या त्या मानवातील अमानवता पाहून. मी खंगले ते खरे त्यामुळे. डॉक माझ्या जीवनात येईतोपर्यंत माझ्या साऱ्या आर्थिक समस्या माझ्या शक्त्यनुसार तत्त्व न विकता, शील न घालवता सोडवल्या. परमेश्वराचा वरदहस्त सदा माझ्या डोक्यावर आहे ही माझी अटळ श्रद्धा मला प्रत्येक संकटाच्यावेळी भरपूर मनोबळ देत आली आहे.

माझी राहणी आरामशीर पण साधी असल्यामुळे आणि व्यसनांचा गंधही नसल्यामुळे मला सुदैवाने कर्ज होते ते फक्त तीन हजाराचे. माधवाश्रमात राहण्यापूर्वी मी मुंबईला आले की नेहमी वेस्ट एंड होटेलमधे राहात असे. त्यांचे शेवटचे बिल द्यायचे राहिले होते. खरे म्हणजे ते तीन हजारही नव्हते पण त्यांनी हिशोबात गडबड घोटाळा करून ती रक्कम दाखवली होती.

उसंत मिळताच पैसे फेडीन असे मी आश्वासन दिल्यावर मॅनेजमेंटने काही महिने धीर धरला. डॉ. डोशीकडून मी तोंडघशी पाडली जाईन अशी मला शंका देखील कधी शिवली नाही. पैसा येत होता पण सारेच सुरुवातीपासून जोडायचे होते. त्यामुळे तो खर्चही होत होता. आस्ते आस्ते सेकंड हॅंड फर्निचर घ्यायचे होते. भांडी-कुंडी, कपडे-लत्ते सारेच जमवायचे होते. म्हणून बिल लवकर चुकवता आले नाही आणि नाईलाजाने मला 'वेस्ट एंड' वाल्यांनी अखेरची ताकीद दिली. पैसे फेडले नाही तर टाच आणणे भाग पडेल असे त्यांनी मला कळवले. त्यांनी भरपूर माणुसकी दाखवली होती तेव्हा मी तरी आणखी किती सवलत मागायची ?

मूळचीच विनोद बुद्धी भरपूर असल्यामुळे मला नोटीस पाहून हसू आले ! वेस्ट एंडने टाच आणण्यापूर्वी वयोवृद्ध तीर्थरूप डॉक्टर डोशी यांनी सारे काही लंपास केले. खरी टांच तर ती होती !

मी नामांकित अभिनेत्री ! माझ्या घरी पैशाच्या राशी आणि जड-जवाहीर साठवलेले असेल अशी त्या बिचाऱ्या होटेलवाल्यांची समजूत असणे रास्त होते. मुळात परिस्थिती अगदीच निराळी असल्यामुळे त्याचा चांगलाच विरस होणार होता याचे मला हसू आले. त्यांचे चेहरे तेव्हा कसे बघण्यासारखे होतील हे मला बघायचे होते.

या साऱ्या गोंधळात आम्ही आणखी एक गोंधळ करून ठेवला. फेमसमधे असताना एका गृहस्थांनी मला मागणी घातली होती. विवाहाचे सुख आपल्या

[ पृष्ठ ११५ वर ]

## मुंबई वार्ता

# बी. पी. सी. सी. टेलिफोन्सची सुरस कथा!

प्रतिनिधी

मुंबईत फोन मिळत नाही. वर्षानुवर्षे वेटींग लिस्टवर रहावे लागते अशी जर कोणी तक्रार माझ्याकडे केली तर मी त्या व्यक्तीला मूर्खात काढीन. अहो तुम्हाला हवा तेव्हा फोन मिळू शकतो. अगदी आठवड्याच्या आतही. पण त्यासाठी म्हणे काही हजार मोजावे लागतात. बॉम्बे टेलिफोन्सचे काही 'तज्ज्ञ कर्मचारी आणि अधिकारी' आपल्या 'दलाला' मार्फत 'ही' जनसेवा करतात. असे म्हणतात की कोणाला फोन द्यावा कोणाला देऊ नये याचा 'पंचनामा' करणारी जी टेलिफोन सल्लागार समिती आहे, त्या समितीचे काही 'सन्मान्य' सदस्यही या प्रकारच्या 'जनसेवेत' भाग घेतात. मात्र त्यासाठी चारपाच हजारांच्या रक्कमेनं त्यांचेही हात ओले करावे लागतात. पण हे सारं न करताही कोणाला फोन हवा असेल तर एक नामी युक्ती सांगतो. मग ऑर्डिनरी कॅटेगेरीजमध्ये अर्ज आहे म्हणून सहा ते सात वर्षे थांबायला नको, की 'ओन युवर टेलिफोन' (ओ. वाय्. टी. योजनेत) आधी सर्व रक्कम भरलेली असल्याने व जरा अग्रक्रम मिळत असल्याने चार वर्षे वाट पहायला नको किंवा स्पेशल कॅटेगेरीज आहे म्हणून दिडदोन वर्षे त्या फोनसाठी थांबायला नको. मग करताना जरा कान पुढे. हं ऐका ती युक्ती! पाचसहा दिवसात फोन मिळवायचा असेल तर नवकाँग्रेसच्या बी. पी. सी. सी. चे सदस्य व्हा आणि जमल्यास कुठेना कुठे तरी पदाधिकारी होण्याचा प्रयत्न करा. असे केले की एकच काय पण दोन फोन्सही मिळतील की. आधीचा फोन असला तरीही फिकीर नको. एक दोन फोन्स सहज मिळतील.

मुंबईत आज ८५ हजार अर्ज वेटींग लिस्टवर आहेत. यात स्पेशल कॅटेगेरीजमधे मोडणारे डॉक्टर्स पत्रकार आदी मंडळीही आहेत. यांच्यापैकी अनेकांना अत्यंत जरुरीचे असूनही दीड दोन वर्ष फोन मिळत नाही, का तर तेवढी यंत्रसामुग्री, टेलिफोन एक्सचेंजीस येथे नाहीत म्हणून. समजा चुकून-माकून फोनचा नंबर मिळालाच तर 'तांत्रिक अडीअडचणींमुळे' प्रत्यक्ष फोन घरात येईपर्यंत सहिना वा त्यापेक्षा अधिक काळ जातो.

मुंबईत फोन्सबाबत एवढी गंभीर

परिस्थिती असतानाही नवकाँग्रेसच्या बी. पी. सी. सी. च्या **एकतीस लोकांना ऐंशी फोन्स** देण्यात आले आहेत. (सरासरी प्रमाण साधारणपणे एका माणसाला २.५ फोन्स एवढं पडतं) या एकतीस लोकांपैकी बहुतेकांकडे एक किंवा दोन फोन्स होते पण आली संधी तर घेऊया हात धुवून म्हणून पुन्हा काहींनी दोन दोन फोन्सही घेतले. अहो महाराष्ट्र राज्याच्या मंत्र्याकडेही एक एक फोन आहे. पण बी. पी. सी. सी. च्या या एकतीसपैकी अनेकांकडे दोन ते तीन फोन्स आहेत. एवढ्या फोन्सची काय गरज लागते ते त्यांनाच माहिती. बहुदा एक फोन हॉलमध्ये, दुसरा स्वयंपाक घरात, तिसरा स्नानगृहात असे या लोकांनी फोन्स ठेवले असावेत. हे सारे फोन्स पाचसहा दिवसात मिळाले आहेत. केव्हाकेव्हा काही महत्त्वाच्या कामासाठी तात्पुरता फोन मिळू शकतो. तो तात्काळ बसवला जातो पण हे सारेच्या सारे ऐंशी फोन्स कायम स्वरूपाचे फोन्स आहेत. हे सारे फोन्स 'अनलिस्टेड' नंबरवाले फोन्स आहेत. डिरेक्टरीत हे नंबर्स तुम्हाला मिळणार नाहीत.

या साऱ्याच्या साऱ्या एकतीस लोकांची नावे आणि त्यांच्या ऐंशी फोन्सचे नंबर्स मी देऊ शकेन. पण हे सारं देऊन वाचकांना वैताग देण्याचा विचार नाही, शिवाय यासाठी बरीच जागाही खर्ची घालावी लागेल. तेव्हा फक्त काही नावे आणि दोनचार नंबर्स देतो.

बी. पी. सी. सी. चे अध्यक्ष बॅ. रजनी पटेल. (नवे नंबर्स ५१५४०० व २१४८००) या शिवाय तुम्ही जर डिरेक्टरीत डोकाऊन पाहिलं तर रजनी पटेल अशा ठळक अक्षरातील नावापुढे तीन फोन नंबर्स मिळतील. त्यापैकी एक त्यांच्या व्यावसायीक ऑफिसचा आहे तर २९०५८८ व २९१७६६ हे दोन रेसिडेंशल आहेत. हे नंबर्स जरा फिरवा, 'तुम्हाला २१५४०० या नंबरवर रजनी पटेल सापडतील' असं फोनवर उत्तर मिळेल. मी स्वत: हे




चारी नंबर्स फिरवून पाहिले आहेत. २१५४००, व २१४८०० या नंबर्सवर पटेल परदेशी गेले असून उद्या परत येत आहेत, उद्या फोन करा असं सांगण्यात आलं. तुम्हीही खात्री करून घेण्यासाठी हे नंबर्स फिरवा आणि पहा ते रजनी पटेल यांचेच आहेत की नाहीत.

श्री. एम्. जी. शहा. – बी. पी. सी. सी. चे चिटणीस – (फोन नंबर्स ५३१४८० व ५३६३९३) याशिवाय रजनी पटेल यांचा सेक्रेटरी की असाच कोणीतरी असलेला राजेंद्रराव नावाचा एक इसम आहे. त्यालाही फोन मिळाला आहे –(नंबर २१४३५४.)

बी. पी. सी. सी.चे दोन्ही उपाध्यक्ष. डॉ. एम्. आर. व्यास, बॅ. टी. गोदिवाला. सचीव, अॅन्ड. व्ही. डी. मेंगदे, ज्यांना बी. पी. सी. सी. ने काही खास कारणामुळे काढून टाकले ते माजी सचीव अॅड. रामराव मोहिते, शंकर पंड्या, कनू देसाई, जय धुळप ही त्या एकतीस ‘ भाग्यवंत ’ लोकांपैकी काही नावे.

फोन्सचा तुडवडा असताना या लोकांना दोन दोन तीन तीन फोन्स का देण्यात आले, ते त्यांनी पाच सहा दिवसात कसे मिळवले वगैरे प्रश्न आपण विचारायचे नसतात. आपण सामान्य माणसं. या भानगडीत पडून काय करायचं आहे ! त्यापेक्षा कधी एकेकाळी वाचायला मिळणारी अशी ही सुरस कथा वाचायची आणि मनोरंजन करून घ्यायचे.

□

## भारतीय स्त्रियांचा ‘व्यापार!’

यू. एन्. आय्. वृत्तसंस्थेच्या वार्ताहराने बैरूटहून गेल्या आठवड्यात स्त्रियांच्या ‘ व्यापारा ’संबंधीची एक अत्यंत खळबळजनक बातमी पाठविली होती. सर्व वर्तमानपत्रांनी ती ठळकपणे प्रसिद्ध केली. या व्यापाराचे प्रमुख केंद्र मुंबई आहे. म्हणून हा व्यापार कसा चालतो याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. पण थोड्या अवधीत शोध न घेण्यासारखे हे काम आहे. बरेच दिवस मेहनत पूर्वक खास तपास केल्यास पासपोर्ट ऑफिस,ट्रॅव्हेल एजन्सिज, इराणच्या आखातातील देशांच्या व्यापार प्रतिनिधींच्या कचेऱ्या आणि त्या देशात जॉब मिळवून देणाऱ्या मुंबईतील अधिकृत आणि अनाधिकृत एजन्सीज यांच्याकडून बरीच खळबळजनक माहिती बाहेर येऊ शकेल. हे काम जोखमीचं आणि अत्यंत कठीण आहे पण अशक्य मात्र नाही.

प्रथम यू. एन्. आय्. च्या बातमीचा थोडा भाग देतो आणि मग मुंबईत हे काम कसं चालतं ते लिहीतो.

आखातातील देशात चालणारा हा ‘ व्यापार ’ स्मगलिंगपेक्षा अत्यंत किफायतशीर आणि धोक्याचा आहे. हा व्यापार करणाऱ्या रॅकेटीयर्समुळे देशाचे एक दशलक्ष पौंडापेक्षा अधिक नुकसान झाले आहे.

नोकरीसाठी जाण्याऱ्या स्त्रियांमध्ये केरळ, आंध्रप्रदेश, गोवा व महाराष्ट्र

येथील स्त्रियांचे प्रमाण प्रचंड आहे. कालांतराने या साऱ्या स्त्रिया देशापुढे एक प्रश्नचिन्ह उभे करणार असं दिसतं. तेथे असलेल्या अनेक स्त्रियांचे भारतीय राष्ट्रीयत्व सिद्ध करणेही कठीण आहे. कारण त्यांच्यापैकी अनेकांना अनाधिकृत मार्गाने पडावातून त्या त्या देशात नेण्यात येतं. एकेका पडावातून ५० ते १०० तरुण मुली अशा प्रकारे नेण्यात येतात. येथून जाणाऱ्या मुस्लिम मुलींना लग्नासाठी विकण्यात येण्याचेही प्रकार घडतात. त्यांना त्यांच्यापेक्षा ३० ते ४० वर्षांनी मोठ्या असलेल्यांशी लग्न करावी लागतात. अनेक जणींना वेश्याव्यवसायालाही लावले जाते वगैरे वगैरे.

मला मुंबईतील मागोव्यात पुढील माहिती मिळाली. आखातातील देशात नोकऱ्या (घरकामाच्या वगैरे) देणाऱ्या अधिकृत आणि अनाधिकृत अशा ३०० पेक्षा अधिक एजन्सीज मुंबईत आहेत. पासपोर्ट ऑफिसातील एका माहितगाराच्या अधिकृत एजन्सीज फक्त ६२ आहेत. म्हणजे हा व्यवसाय अनाधिकृत




पातळीवरच फार मोठ्या प्रमाणात चालतो. या एजन्सीज, जॉब मिळवू पहाणाऱ्या तरुण मुलींबरोबर एक करार करतात. पण तो कागदोपत्री नसतो. तो दोन वर्षांसाठी असतो. २२ महिने काम केल्यावर २ महिने भरपगारी रजा मिळते. त्या त्या देशातील स्थानिक दैनिकात घरकामासाठी बायका पाहिजेत अशा प्रथम जाहिराती येतात. तेथील एजन्टस् मुंबईतील एजन्ट्सबरोबर संधान बांधून असतात. (काही वेळी हे व्यक्तीगत पातळीवरही संबंध असतात.) मग येथील एजन्टस् त्यांचे जाळे पसरू लागतात. येथील दैनिकात बातमी देणे किंवा आपापल्या दलालांमार्फत ' हव्या असलेल्या गरजू ' मुलींना गाठणे हा प्रकार चालतो. त्यांच्याकडून जॉब मिळवून देण्यासाठी ५०० रुपये देण्यात येतात. याशिवाय पासपोर्ट वगैरेची कामे पटकन करून देण्यासाठी २०० ते ५०० रुपये अधिक घेतात. नोकरी तांत्रिक असेल तर ५ हजार रुपयेही घेतले जातात कारण अशा नोकऱ्यात तेथे अमाप पैसा मिळतो. म्हणूनच उपलब्ध असलेल्या नोकऱ्यांच्या जाहिरातीबरोबरच उपलब्ध नसलेल्या नोकऱ्यांचीही जाहिरातबाजी करून व त्या मिळवून देण्याची खोटी हमी घेऊनही पैसा करणारे या व्यवसायात बरेच आहेत.

तीन ते सहा महिन्यात हे एजन्टस् नोकऱ्या मिळवून मुलींना परदेशी पाठवतात. लवकर जायचे असेल तर अधिक दाम मोजावा लागतो. तेथे गेल्यावर काय होईल ते सांगता येत नाही. नशीबवान मुलींना योग्य नोकऱ्या मिळतात तर अनेकींवर वेश्याव्यवसाय लादण्यात येतो. तेथील गर्भश्रीमंत अरबांपासून फोर्समुळे गरोदर राहिलेल्या स्त्रियांचे हाल काही विचारू नका. तोंड दाबून बुक्यांचा मार असतो. येथे परत येणेही शक्य नसते. अनेक जणी अनधिकृत मार्गाने गेल्या असल्याने राष्ट्रियत्वाचा प्रश्नही असतोच. एखादा अरब पुरुष ' चांगला ' असेल तर तो अशा स्त्रीला गर्भपातासाठी खास रुग्णालयात पाठवतो. आखातातील देशात अशा रुग्णालयांची संख्या फार मोठी आहे. येथून काही वेश्यांनाही पाठविण्याचे प्रकार घडतात. या सर्व प्रकारांची चाहूल लागल्याने भारत व कुवेत सरकारांनी काही हालचाली केल्या. (कुवेतला जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण फार मोठे आहे. त्याच्या के. सी. कॉलेज जवळील व्यापार प्रतिनिधींच्या कचेरीजवळ असंख्य स्त्रियांची लागलेली रांग रांगच नजरेस पडते). या सरकारनी उपाय योजना म्हणून ३५ वर्षांखालील स्त्रियांनी त्या देशात जाण्यावर अनेक बंधने घातली आहेत. पण हे सारे गुंडाळून त्यांना प्रवाशी व्हिसावर तेथे नेण्याची युक्ती एजंटानी काढली. यावरही आता काही कडक मार्गांचा अवलंब करण्यात आला आहे. पाहू या आता याला कितपत आळा बसतो ते.

◘ ◻ ◘

# आलेपाक

बडोद्याच्या सुप्रसिद्ध सयाजी उद्यानाच्या प्राणीसंग्रहालयातील वाघाच्या पिंजऱ्यात म्हणे एका विद्यार्थ्याने उडी घेतली. त्याने वाघाला चिडवले; वाघाशी त्याची कुस्ती झाली; वाघाने त्याला ठार केले.

शांतारामबापूंच्या 'पिंजऱ्या'वर ज्या हजारो प्रेक्षकांच्या उड्या पडताहेत त्यांचे तरी वेगळे काय होते ? ◻

"चीनच्या मैत्रीसाठी कोणतेही करार आम्ही मोडू" असे उद्‌गार पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष भुत्तो यांनी काढले आहेत.

मोडण्याची भाषाच बोलायची असेल तर 'खोडकी मोडू', 'कंबरडे मोडू' असे आम्हालादेखील नाही का बोलता येणार ? ◻

संपाचे दिवस हे रजेचे दिवस मानले जावेत, असे जॉर्ज फर्नांडिससाहेबांचे म्हणणे आहे.

फर्नांडिससाहेब फारच बुवा भिडस्त आणि संकोची आहेत. आम्ही म्हणतो संपाचे दिवस हे रजेचे दिवस मानले जावेत; आणि रजेचे दिवस हे कामाचे दिवस मानले जावेत ! ◻

जगज्जेता बुद्धिबळपटू बॉबी फिशर म्हणतो : मला जन्मभर जागतिक चॅम्पियन राहायचे आहे.

बोरिस स्पास्की म्हणतो : मला जन्मभर पराभूत राहायचे नाही. ◻

'सोबत' साप्ताहिकातील 'चित्रसज्जा' सदरातील एक शेरा पाहा : अनुबोधपट बनवण्याचं आमच एक मोठं खातं आहे. पण तिथे कुणाला व्हिजन अशी नाहीच.

अहो ते लक्षात घेऊनच त्या खात्याला 'फिल्म्स डि-व्हिजन' असे नाव दिलेले आहे ! ◻

नागपूर विद्यापीठातील वरच्या वर्गातील विद्यार्थि-विद्यार्थिनींना येत्या वर्षापासून लैंगिक शिक्षण आणि कुटुंब नियोजनाची माहिती देण्यात येणार आहे. या शिक्षणासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे वेगवेगळे वर्ग भरवण्यात येणार आहेत.

वरील शिक्षणाचा उपयोग जर विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना वेगवेगळा करता आला असता तर किती बरे होणार होते. ◻

'मराठा' दैनिकाच्या रविवारच्या आवृत्तीत 'कर्ण खरा कोण होता ?' ते सत्य सांगणारी एक प्रदीर्घ लेखमाला सध्या सुरू आहे.

म्हणजे आम्ही कर्णोपकर्णी ऐकलेली कर्णकथा आता खोटी ठरणार की काय ? हळुहळू मला असे वाटू लागले आहे की सत्य दोन प्रकारचे असते एक खरे सत्य आणि दुसरे खोटे सत्य ! ◻

# नवा, बदलता, उल्हसित भारत –(हो, आपलाच भारत !)

---

आपल्या देशाची निर्भर स्तुती वाचण्या-ऐकण्याची सवय आपल्याला नाही. सारे जग आपल्या नावाने बोटे मोडत असते. विरोधी पक्षांना काहीच चांगले दिसत नाही. येऊन जाऊन आपली स्तुती करणार तो कांग्रेस पक्ष आणि त्याचे मध्यवर्ती सरकार, पण तीही मंडळी चक्क मधूनमधून स्वतःला सुधारण्याची भाषा बोलताना दिसतात.


अशा परिस्थितीत, एका अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने भारताबद्दल व्यक्त केलेली मते वाचून कोणीही भारतीय माणूस आश्चर्यचकित होईल. या समाजशास्त्रज्ञाचे नाव आहे मि. चाडबोर्न गिल्पॅट्रिक. रॉकफेलर प्रतिष्ठानाच्या या माजी सहसंचालकाने भारतात तब्बल साडेसात वर्षे वास्तव्य केले होते. या वास्तव्यात अनुभवाला आलेल्या गोष्टीच त्यांनी अमेरिकेत नुकत्या दिलेल्या एका मुलाखतीत सांगितल्या आहेत.

'भारतात आता ठायी ठायी उभारी, उत्साह आणि आत्मविश्वासाचा आढळ होतो; इतकेच नव्हे तर कित्येक पिढ्यांना आज्ञात असलेला मनमोकळा आनंदही आता सहज दिसतो.'

नुकत्या झालेल्या भारत-पाक संग्रामात सामान्य भारतीय नागरिकाचे वर्तन अत्यंत शिस्तशीर होते, असे सांगून मि. गिल्पॅट्रिक म्हणतात : याहून अधिक योजनाबद्ध, परिपूर्ण आणि चांगली नागरी संरक्षणव्यवस्था मी पाहिलेली नाही. युद्धाच्या तिसऱ्या दिवशी, अवाढव्य दिल्ली शहरात प्रकाशाची एक छोटीशीसुद्धा तिरीप बाहेर दिसू शकत नव्हती....दोन आठवड्यांच्या संपूर्ण प्रकाशबंदीच्या काळात दिल्ली शहरात चोराचोरीचा प्रकार जवळजवळ झालाच नाही. ज्या गोष्टी इतरांनाच जमतात असे मानण्याची सवय लागली असता, आपणही त्या करू शकतो असे पाहिल्यावर, भारतीयांना अभिमान वाटणे स्वाभाविकच आहे'

रशियाशी झालेल्या मैत्रीच्या करारामुळे भारत आनंदित झाला असला तरी या करारात आपले स्वत्व तो गमावणार नाही; कारण 'वर्तमान भारताला स्वातंत्र्याचा जेवढा पीळ आहे तेवढा इतर कोणत्याही देशाला नाही. आपल्यावर कोणाचेही वर्चस्व असावे हे भारताला आता सहन होण्यासारखे नाही...रशियासारखी एकवर्गी, राज्यनियंत्रित समाजव्यवस्था भारताला नको आहे. भारतीयाला अनेकता, विविधता, व्यक्तिस्वातंत्र्यानुवर्ती समाजव्यवस्था प्रिय आहे.'

'अमेरिकन सरकारचे भारतविषयक धोरण कदाचित बदलणार नाही; पण अमेरिकन लोकांनी मात्र भारताकडे अधिक आस्थेने लक्ष द्यायला हवे आहे. गरजवंत, गरीब भारतापेक्षा हा नवा, बदलता, उल्हसित भारत अधिक वेधक आहे...भारतातील लोकशाहीचा दर्जा


मुलायम
नि नरम,
पण अतिशय
टिकाऊ
स्वस्तिक
एअर-ओ-फिल
चप्पल
तुमच्या
पाउलांची
शोभा वाढविते!
तुम्हाला चालताना मुळीच अडखळल्यासारखे वाटू नये, अवघडायला होऊ नये, उलट अगदी आराम वाटावा म्हणून खास कुशलतेने तयार केलेली स्वस्तिकची नवीन एअर-ओ-फिल रबर चप्पल तुमच्या पाउलांना कशी मऊमऊ वाटते नि सुखविते. तिची किंमतही किती माफक-सर्वांना परवडेल अशीच! कुटुंबातील सर्वांची आवडती चप्पल!
पुढील साइझेसमध्ये मिळते.
पुरुषांसाठी: ७/१०,
स्त्रियांसाठी: ३/६,
मुलांसाठी: ९/२,
स्वस्तिक स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लिमिटेड, चिंचवड, पुणे-१९.

अमेरिका किंवा ग्रेट ब्रिटनपेक्षा कमी आहे. असे मला वाटत नाही.'

आता यावर आपण काय बोलणार? रिचर्ड निक्सन माझा विद्यार्थी असता तर वरील मजकूर पस्तीस वेळा लिहून काढायला लावला असता. तोदेखील शाईने; बॉलपेनने नव्हे ! ◘

## याह्याखान काय खातो ?

लेखक म्हणून प्रसिद्धी मिळवायची असेल तर तुम्हाला चांगले लिहिता आलेच पाहिजे, असे मानण्याचे कारण नाही. तुम्ही मोक्याच्या जागी असणे मात्र फार जरुरीचे आहे. त्यामुळे मोठ्यांच्या छोटया (आणि मोठ्यादेखील) गोष्टी माहीत होतात. आणि बहुसंख्य वाचकांना हेच तर हवे असते.

बेगम अक्लीम अख्तर या पाकिस्तानी बाईला हे चांगले ठाऊक असले पाहिजे. कारण ही सध्या आपल्या आठवणी लिहिण्यात गुंग झाली आहे. ही बाई काही तशी सामान्य नव्हे. जनरल याह्याखान आठवतात का तुम्हाला? अहो, ते हो. पाकिस्तानचे भूतपूर्व (खरे म्हणजे भुत्तोपूर्व) सर्वेसर्वा. मेजवान्यांचा त्यांना मोठा षौक. या मेजवान्यांची यजमानीण असे बेगम अक्लीम अख्तर. म्हणजे या बाईला त्या मेजवान्यांच्या वेळी काय काय ऐकायला मिळाले असेल, नाही का? कारण तोंडे खाण्यापिण्याच्या वेळी जितकी बोलतात तितकी बिनखाण्यापिण्याच्या वेळी बोलत नाहीत.

याह्याखानांच्या अमदानीत बेगमसाहेबांचा अधिकार एवढा मोठा होता की त्यांना 'जनरल राणी' हे टोपणनाव मिळाले होते. जनरल याह्याखान तिच्या डाव्या मुठीत होते म्हणे; आणि भुत्तोसरकारने तिला तुरुंगात टाकले त्यावरून ते खरे असले पाहिजे असे वाटते. पण तुरुंगात टाकायचे म्हणजे आरोप तर ठेवला पाहिजे. मग बेगमसाहेबांवर परवान्याशिवाय मद्यपानाचा आरोप रीतसर ठेवण्यात आला.

पुढे जामीनावर त्यांची सुटका झाली आणि बाई सरळ आपल्या आठवणी सांगायला बसली. आपण अल्लाशपथ सगळे खरे सांगणार, असे ती म्हणते. त्यामुळेच पाकिस्तानी आणि परदेशी प्रकाशक तिला लठ्ठ रकमेची आमिषे दाखवत आहेत.

आपल्याला (म्हणजे मला) या आठवणी वाचायची भलतीच उत्सुकता लागून राहिली आहे. त्या सगळ्या मेजवान्यांच्या वेळी याह्याखान काय खात असे, याची खरीखरी माहिती मला हवी आहे. कारण माझ्या ती. आजीच्या बोलण्यावरून याह्याखान शेण खातो, अशी माझी ठाम समजूत झालेली आहे ! ◘

## उच्चारशुद्धिवादिनी

भारतीय आकाशवाणीवरून सादर करण्यात येणाऱ्या वार्तापत्रातील कित्येक

शब्दांचे–विशेषत: नावांचे उच्चारण अयोग्य असते, अशा तक्रारी सर्वत्र ऐकायला मिळतात. त्यात फारशी सुधारणा होईल, अशी आशा करणेही लोकांनी सोडून दिले आहे. या वार्तानिवेदकांमध्ये एक प्रवृत्ती नेहमी आढळते : अनेक साध्यासुध्या भारतीय स्थल-व्यक्तिनामांचा उच्चार ते इंग्रजी ढंगाने करतात. त्यामुळे 'काश्मिर'चा उच्चार 'कॅश्-मीर' असा होतो आणि 'चव्हाणां'चे नाव 'शौ-वान' असे होऊन कानावर आदळते. अर्थात ही प्रकृती साऱ्या उच्चारदोषांचे कारण नाही. कित्येक वार्तानिवेदक एकच शब्द अनेक वेगवेगळ्या प्रकारे उच्चारतात. 'नक्षलवारी' हा शब्द आता आंतरराष्ट्रीय राजकीय शब्दसंग्रहात जाऊन बसला आहे. पण चार वर्षांपूर्वी त्या नावाला जेव्हा प्रसिद्धी लाभली तेव्हा भारतीय आकाशवाणीवरील वार्तापत्रात ते नाव एकाच दिवसात वेगवेगळ्या अर्धा डझन प्रकारे उच्चारले जायचे. तीच स्थिती आता बांगला देशातील अपरिचित स्थळांचा उल्लेख करताना होते.

पण भारतीय आकाशवाणीवरील वार्तानिवेदकांनी ही गोष्ट एकदम मनाला लावून घेऊ नये. त्यांना दिलासा वाटेल, नैतिक धैर्यही लाभेल अशी एक बातमी 'बीबीसी'बद्दल प्रसिद्ध झाली आहे. 'बीबीसी' आत्तापर्यंत वार्तानिवेदनाचा आदर्श मानली जायची. उत्कृष्ट आणि पूर्ण निर्दोष इंग्रजी उच्चार ऐकायचे असतील तर बीबीसीवरील वार्तापत्रे ऐकावी, अशी आख्यायिका निर्माण झाली होती. या आख्यायिकेवर आता मोठा जबरदस्त आघात झाला आहे; आणि सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे हा आघात बीबीसीच्या उच्चारविभागप्रमुखाने केला आहे. या साक्षेपी बाईंनी १६,००० ब्रिटिश नावांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. ही १६,००० नावे, बीबीसीवर गेल्या ४० वर्षांच्या काळात अनेक वेळा वेडीवाकडी उच्चारली गेली आहेत, असे बाईंचे म्हणणे आहे. बरे ही सारी नावे, उच्चारणासाठी जीभ पिळवटायला लावणारी वेल्श वा परदेशी नावे आहेत असेही नव्हे. श्री. पीटर उस्तिनॉव्ह यांचे नावही बीबीसीवर 'पीटर यूस्तिनॉफ' किंवा 'पीटर ऊस्तिनॉफ' असे उच्चारण्यात येते !

सगळ्यात मौजेची गोष्ट म्हणजे या उच्चारविभागप्रमुख बाई स्वत: स्कॉट आहेत. नावांचे उच्चार निर्दोष असावेत यावर त्यांचा कटाक्ष आहे. उदाहरणार्थ, सर फिट्झरॉय मॅक्लीन यांचे नाव उच्चारताना, त्याचा विशिष्ट दंतमंजनाशी संबंध आहे, असे श्रोत्यांना वाटले तर ते अक्षम्य होय, असे या उच्चारशुद्धिवादिनी बाईंना वाटते.

**–अनंतराव**

## सांस्कृतिक मुंबई

# मुंबईचं मुंबईपण हरवलं

**विनय धुमाळे**

सप्टेंबर ४: सध्याकाळी ६–६।। ची वेळ. सहज म्हणून मी लेडी जमशेटजी रोडवरून फिरत चाललो होतो. अचानक सायरनचा आवाज आला. ट्रॅफिक पोलिसाने क्षणार्धात रस्त्यावरील रहदारी थांबवली. मला कळेना, की चाललं आहे काय ? कारण मुंबईत त्या दिवशी कुठल्याही राष्ट्राचा प्रमुख वगैरे आला नव्हता आणि पंतप्रधान मुंबईत यायलाही अजून चार-पाच दिवस होते. लोक पण कुतुहलाने रस्त्यावर थांबले. आणि नंतर आला पोलिसी गाड्यांचा प्रचंड ताफा. त्यातच मधल्या गाडीत फुलांच्या आणि हारांच्या भाराखाली श्री. रणजित मोतीराम राणे यांचा मृतदेह ठेवला होता. बॅंडचे संथ शोकाकूल स्वर कानावर येत होते. संथपणे मोटारीचा आणि पोलिसी गाड्यांचा ताफा चालला होता. रस्त्यावरचे सारे आवाज कोणीही न सांगताच बंद झाले.. अनेक लोक उत्स्फूर्ततेने त्या अत्यंयात्रेत सामील झाले. मीही त्यातला एक होतो.

दादर स्मशानभूमीच्या बाहेरचा रस्ता. हजारो पोलीस गंभीरपणे 'स्लो मार्च' पद्धतीनं चालत होते. त्यातही खरे गंभीर दिसले ते हवालदार. खरंच त्यांना दुःख झालेलं दिसलं. मुंबईच्या इतिहासातली ती अत्यंत खेदजनक गोष्ट होती. इन्स्पेक्टर मंडळींना बहुदा याही प्रसंगाचं गांभीर्य नसावं. ते इतके सहजपणे आणि मजेत चालल्यासारखे चालले होते, की त्यांचं तसं तलवारी लपवून या प्रसंगी असं चालणं सगळ्यांनाच थोडं खटकलं. सगळी हवालदार मंडळी मात्र खरोखर हवालदील झालेली दिसली. थोडीफार दिङमूढ झालेली दिसली. मुंबईचे पोलिस आज लोकांसमोर फार वेगळ्या तऱ्हेनं येत होते. आज मुंबईचा पोलिस लोकांच्या आदराचा (कधी नव्हे तो) विषय झाला होता.

विक्रोळीच्या दंगलीत विक्रोळीचा एक हवालदार श्री. रणजीत मोतीराम लहाने याचा मृत्यू. त्याचबरोबर सीनिअर ग्रेड सब-इन्स्पेक्टर पृथ्वीराज चांदगुडे हेही दंगलीत मृत्युमुखी पडले.

स्मशानात टाचणी पडली तरी ऐकू येईल अशी शांतता. पोलिस कमीशनर श्री. प्रधान, आय. जी. पी. श्री. राजाध्यक्ष, श्री. शरद पवार वगैरे सगळी मडळी जातीनं हजर होती. क्षणार्धात आकाशात बार उडाले. सारे सावधान-

मधे उभे राहिले. ब्युगूलाचे वीरश्रीयुक्त स्वर कानी यायला लागले. पुन्हा एकदा बार काढले गेले व या गंभीर वातावरणातच शवाला अग्नी देण्यात आला. दोन हिंसक जमावातली लढाई शांत करताना रणजीतला वीराचं मरण आलं. आई-वडिलांनी ठेवलेले नाव व माणसाचं आयुष्य यात नेहमीच तफावत असते. पण रणजितच्या बाबतीत तो केवळ नावानं नव्हे तर कृतीनं रणजित ठरला. धन्य रणजित. धन्य मोतीराम.

आणि चितेनं धडाडून पेट घेतला व चितेच्या धुरातूनच मुंबईचं मुंबईपण हरवलं.

या सर्वांचं कारण म्हणजे विक्रोळीची भयानक दंगल. आज अनेक दिवस विक्रोळीचा गोदरेजचा कामगारपरिसर धुमसतच होता. त्यांची युनियन बळकट करायला व्यवस्थापक नाखूष होते. त्यात परत युनियनवर कोणी वर्चस्व स्थापन करायचं यावर अनेक पक्षांची भांडणं व त्यातूनच ही दंगल पेटली. शिवसेनेचे श्री. मनोहर जोशी हे आपल्या अनुयायांसह विक्रोळीचे एक शिवसैनिक श्री. घाडीगावकर यांची नव्येत बघायला गेले होते. पोलिसांनी त्यांना निक्षून सांगितले होते, की ही जायची वेळ नव्हे, दंगल होण्याचा संभव आहे. पण हा सल्ला न मानून श्री. जोशी २ तारखेला संध्याकाळी तेथे गेले. तिथून बाहेर येताना त्यांना जेव्हा, पोलिस संरक्षण देण्यात येत होते. तेवढ्यात श्री. दत्ता सामंतांचा गट (विक्रोळी आमदार) तेथे आला व धुमश्चक्रीला सुरुवात झाली व त्यातच श्री. राणे व चांदगुडे यांची आहुती पडली. पोलिसांनी श्री. दत्ता सामंत व श्री. दिना बामा पाटील (कार्पोरेटर दोघेही कॉंग्रेस) यांना अटक केली.

प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. गोकर्ण यांनी अठरा सप्टेंबरपर्यंत त्यांना रिमांडमधे ठेवण्याचा आदेश दिला आहे. प्रकरण आता न्यायप्रविष्ट असल्याकारणानं त्यांच्यावर आत्ताच काही बोलणं फारसं औचित्यपूर्ण ठरणार नाही परंतु झालेल्या गोष्टी बऱ्याच बोलक्या आहेत. आपल्या गल्लीत आपलं वर्चस्व स्थापण्याची या पुढाऱ्यांची अमानुष महत्त्वाकांक्षा बिचाऱ्या रणजित राणे, चांदगुडेसारख्या लोकांची आहुती घेऊन जाते. या पुढाऱ्यांचे मोठे संकल्प, मोठ्या मोठ्या कामगार चळवळी बांधण्याचे मनसुबे हे एका बाजूला व मंद आवाजातलं मोतीराम राण्याचं रडणं हे दुसऱ्या बाजूला. धड रडताही येऊ नये इतके ते अशक्त झाले होते. माणसाला महत्त्वाकांक्षा असावी. स्वतः पुढारी व्हावं असं वाटणं हेही स्वाभाविक; पण या प्रकारच्या रक्ताळलेल्या पुढारीपणाची कल्पनाच करवत नाही. पुढाऱ्यांनी यापुढे विवेक धरला पाहिजे. आपलं महत्त्व वाढवण्याकरता शहराची शांतता धोक्यात आणण्याचे क्रूर विचार सोडले पाहिजेत. लोकांच्या सरणावर त्यांनी पोळी भाजून घ्यायचा प्रकार सोडला पाहिजे. त्याचप्रमाणे शासनानंही या प्रश्नाचा विचार करायला हवा. मुंबईची अवाढव्य वाढ झालेली आहे. अनेक परस्परविरोधी

कामगारसंघटना उभ्या आहेत. राज्यात आधीच किमती वाढलेल्या, त्यात परत दुष्काळ पडलेला, गरिबांना मुंबईत रहाणं अशक्य झालं आहे. ही सर्व लक्षणे मुंबईचा कलकत्ता बनण्याची आहेत. आणि जर का एकदा शासनाचे नियंत्रण व विवेक सुटला तर मुंबईत सर्वंकष आग भडकायला काही वेळ लागणार नाही.

जानेवारी १९७१ ते जून ७२ मध्ये सगळ्यात जास्ती संप मुंबईत (महाराष्ट्रात) झाले. १८२ संप महाराष्ट्रात झाले. पण त्यातले बहुसंख्य मुंबईतच झाले आहेत. ही सारी मुंबईची वाट लागण्याची लक्षणे आहेत. मुंबईचा मनुष्य प्रचंड वैतागलाय्. त्याला जास्ती भडकवू नये. युद्धपातळीवरून सध्याच्या परिस्थितीशी शासनाने मुकाबला केला पाहिजे. कारण सर्वांच्या असंतोषाच्यासाठी मूलत: वाटणारी असुरक्षितता हीच असते. आज माणसं कुत्र्याच्या मौतीनं मरत आहेत. हे फार काळ चालू शकणार नाही. नुसत्या आश्वासनाने माणसाची दुपारची भूक भागत नसते. पोरंबाळं उपाशी पडलेल्या माणसाला कुठलीच संस्कृती आडवू शकत नाही. एकदा का त्याच्या डोळ्यात अंगार पेटला, जनतेने, असहाय जनतेने एकदा का तिसरा नेत्र उघडला, की मग पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे शासन कोसळेल. ते घडायला नको आहे. पण शासनाने पूर्वीच्या गाफीलपणात राहू नये. वेळ खरोखरच बदलली आहे. आज गरीब एकटाच मरत आहे. काही दिवसांनी ही वृत्ती बदलेल व आपल्याबरोबर कोणाला तरी घेऊन तो मरेल. या पुढाऱ्यांपाशी व सरकारपाशी जनतेची एकच प्रार्थना आहे–स्वत:ची पोळी आमच्या सरणावर भाजू नका आणि मद्रासच्या लोकांना असं म्हणायची संधी देऊ नका. 'सांभाळा, मद्रासची मुंबई बनते आहे.' ◘

# ती संध्याकाळ

दि. ६–९–७२ : आय्. आय्. टी चा पवईचा रम्य परिसर. सर्वत्र हिरवंगार. कॉन्व्हो हॉलच्या आसपास प्रचंड गर्दी. आत शिरायला अक्षरश: अर्धा तास लागला. आत शिरताच आय्. आय्. टी. च्या कॉन्व्होकेशन हॉलचं भव्य रूप लक्षात आलं. अगदी लक्षात राहण्यासारखा प्रचंड हॉल आहे तो. सर्व खुर्च्या वाकं जिथं जिथं म्हणून बसायला, उभे रहायला जागा आहे ती खचून भरलेली. प्रचंड उत्कंठेने हजारो मुलं आणि त्यांच्याबरोबर त्यांचे कृतार्थ आईवडील दाराकडे लक्ष लावून होते. ठीक दहा वाजता आय्. आय्. टी च्या परिसरात विद्युल्लेखा चमकली आणि बदामी साडीत श्रीमती इंदीरा गांधींच्या रूपात अवतरली. इंदिरागांधींची मतं काही का असेनात पण त्यांचा रुबाब विलक्षण. त्या हजारो लोकांचा मिळूनही तेव्हढा झाला नसता. काय चालण्यातली ऐट, काय तो चटपटीतपणा सगळ्यात तरुण कोण

दिसत असतील तर इंदिरागांधीच होत्या. क्षणार्धात सारं सभागृह नकळत उत्स्फूर्ततेने उभे राहिले आणि विजेला विजेनंच प्रतिसाद दिला. टाळ्यांचा विजेसारखा कडकडाट झाला. व्यासपीठावर अलीयावर जंग, श्री.नाईक, श्री. नामजोशी, श्री. टोपे वगैरे मंडळी होती. आय. आय. टी. चे डायरेक्टर श्री. केळकर यांनी शपथ देववली व पदवीदानाचा समारंभ सुरु झाला. काय त्या प्रत्येक स्नातकाचा उत्साह. कोणी मेकॅनिकलला एजी.मध्ये डॉक्टरेट तर कोणी एंजी. मध्ये सुवर्णपदकधारी. किती तरी पदके वाटली गेली. मोठे मोठे काळे झगे घालून अगदी मिरवत होते. खरोखर भारावून जाण्यासारखा तो समारंभ होता आणि मग परत एकदा टाळ्यांच्या कडकडाटात इंदिरा गांधींनी भाषणाला सुरुवात केली. त्यांच्या भाषणात मुख्य सूर स्वावलंबनावर होता व भारतीय तंत्रविज्ञान हे भारतीय परिस्थितीशी एकरूप झाले पाहिजे हा होता. त्यांनी सांगितले, की जेव्हा साऱ्या राष्ट्रात प्रचंड प्रमाणात औद्योगिकरण चालू होते तेव्हा भारत पारतंत्र्याच्या जोखडाखाली पिचत होता त्यामुळे साहजिकच आपला देश इतर देशांच्या मागे राहिला. त्यांनी तंत्रज्ञांना पुढं सांगितलं, की भारताचे तंत्रज्ञान भारतीय परिस्थितीला साजेसे असले पाहिजे. दुसऱ्या राष्ट्राची याबाबतीत अंधानुकरणं नकोत. भारताला अनुरूप अशी लेबर इन्सेंटिव्ह ओद्यागिक केंद्रे निघाली पाहिजेत. भारताचे स्वरूप प्रामुख्याने शेतीप्रधान



त्याच्या शिक्षणाचा खर्च
दिवसें दिवस
वाढतच जाणार...

तुम्हांला परवडेल तो?

कां नाहीं? जरूर परवडेल!

निश्चितकाल ठेवीचे खातें तुम्ही आजच उघडलेत तर त्याच्या पुढील शिक्षणाच्या खर्चाबाबत कांही अडचणी येणार नाहीं. अधिक तपशीलासाठी आमच्या जवळच्या शाखेला आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.
7215DMar

असल्याकारणानं तंत्रज्ञांनी याचा जरूर विचार केला पाहिजे.

त्यात एक सर्वांत समाधानाची गोष्ट होती ती ही, की प्रेक्षकात पंजाबी, खोजा, मराठी, मद्रासी, उडिपी सारे सारे लोक होते. भारताच्या विविधतेचे भव्य प्रदर्शनच घडत होते. ◻

## टयूब रेल्वे....

'खरंच काहो, आमच्या घराखालून रेल्वे जाणार?' कुठलेतरी एक विश्वनाथ कुलकर्णी कुठल्या एका अनंतराव देशपांड्यांना विचारत होते. (वेळ आणि स्थळ ९–५५ ची लोकल व प्रवेश दररोजचा व अभिनय गाडीतून खाली न पडण्याचा.) विश्वनाथरावांच्या तोंडावर (प्रश्न विचारताना) लहान मुलाने आईसफ्रूट पाहिल्यावर जी कळा येते अगदी तीच. एवढा चान्स मिळाल्यावर अनंतराव तरी कशाला सोडतील? अहो खोटे की काय? चक्क तुमच्या घराखालनं जाणार रेल्वे.

याचं कारण–कारण एकच. मुंबईत आता टयूब रेल्वे चालू होणार. चालू होणार म्हणजे काय, काम १९७३ साली चालू होणार आणि बांधून होणार १९८४ साली. एकंदर ही योजना ३५० कोटी रुपयांची आहे आणि कुलाबा ते कुर्ला असा हा मार्ग जमिनीखालून जाईल.

याचे ठळक विशेष.

या रेल्वेचे एक महत्त्वाचे स्टेशन भेंडी बाझार येथे असेल. याची तीन स्टेशने दक्षिण मुंबईत असतील. कफ परेड, बँक व सचिवालय येथे व उरलेली स्टेशने वरळी, प्रभादेवी, दादर वरून माहीम, वांद्रा दिशेने नव्या विद्यापीठावरून कुर्ल्याला उभारण्यात (म्हणजे खणण्यात) येतील. हे सगळे अजून तरी कागदावरच आहे. त्यामुळे मुंबईच्या जनतेला सध्या काहीच दिलासा नाही. फक्त या साऱ्यात एकच गंमतीशीर बातमी आहे ती म्हणजे सध्यातरी या



सगळ्या रेल्वेचा अभ्यास करण्यासाठी एक रेल्वे शिष्टमंडळ लंडनला गेले आहे.

हे सगळं लिहायचं कारण म्हणजे लोकलची अतोनात गर्दी. मुंबई लोकलच्या गर्दीवर परत काही मी लिहायला पाहिजे अशातला भाग नाही, परंतु आता ते फारच व्हायला लागलं आहे. सकाळच्या गर्दीत तर वयस्क माणसांना तीनतीन गाड्या सोडाव्या लागत आहेत. कारण दादर वगैरे स्टेशनाला जो फूट-बोर्डावर उभा राहील तोच चर्चगेटला जाईल अशी स्थिती असल्याकारणाने वयस्क माणसांना हे शक्य होत नाही. तेव्हा सरकारने १९८४ च्या योजना वगैरे नंतर बघाव्यात पण आजचे हाल कसे थांबतील यावर अधिक लक्ष द्यावे. ◻


## आता हे करा....

साहित्य सघ मंदीर झिंदाबाद. दाजी भाटवडेकर की जाय, अनंत वर्तक की जाय. काही म्हणा, आपली मराठी माणसे जोपर्यंत मनात घेत नाही तो पर्यंतच; पण एकदा का त्यांनी मनावर घेतले की काहीही होऊ शकते. अगदी अस्सल संचातला अंमलदार सुद्धा. नुक-ताच साहित्य संघात अंमलदाचा प्रयोग करण्यात आला. प्रयोग म्हणजे केवळ दृष्ट लागण्यासारखा होता. काय तो दाजींचा अभिनय. काय ती अनंत वर्त-कांची सहजता. अनंत वर्तकांनी पन्नाशी ओलांडली असली, तरी २५ च्या सर्जे-रावाची भूमिका त्यांनी बेफाटपणे पार पाडली. दाजींबद्दल तर बोलायलाच नको. चारुशिला भाटवडेकर हरभट, नारायण सारे ग्रेट. सारे नाटक पाहिल्या-वर मनाला एकप्रकारची खिन्नता आली. हे जर पु. लं. चेच अंमलदार जुन्या-संचारात बसू शकते तर तुझे आहे तुझपाशीचा प्रयोग साहित्य संघ मंदिर का करत नाही.

सध्याचा तुझे आहे तुझपाशीचा संच पाहिला, की नाटकाची विटंबना झाल्या-सारखी वाटते. (पु. लं. कशी परवानगी देतात कोण जाणे ?) असं ऐकतोच की साहित्य संघ मंदिर जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करत आहे. साऱ्या रसिकां-तर्फे एक विनंती मी करतो, कृपया तुझे आहे तुझपाशी परत रंगमंचावर आणा. मला वाटतं दाजींशिवाय हे कोणीही हाती घेणार नाही. दाजी ह्या 'अंदाज फेम अमुक अमुक काकाजीच्या भूमिकेत' हलचल फेम कु. क्ष. ऊषाच्या भूमिकेत असल्या जाहिराती वाचवत नाहीत. दाजी तुमच्यावाचून हे कोणीच हाती घेणार नाही. कृपया परत आम्हाला अस्सल तुझे आहे तुझपाशी दाखवा. मी हे लिहिलंही नसतं परंतू तुम्हीच अंमलदारला परत जिवंत केला. मग आमचं काय चुकलं ?

◻

# अनिमिष — गोविंद कुलकर्णी
# पंचविशी — श्याम जोशी, दत्ता जोशी






केशव मेश्राम

मराठवाड्याच्या मोठ्या व श्रेष्ठ परंपरेचाच वारसा पुढे चालविणारे आणखी एक तरुण कवी म्हणून 'अनिमिष'च्या गोविंद कुलकर्णी यांचा उल्लेख करावा लागेल.

'अनिमिष'मध्ये एकूण पन्नास कवितांचा समावेश केला आहे. रूढ अर्थाने या कविता लहानच नाहीत, तर खूप छोट्या आहेत. निर्मितीच्या तंद्रीत बुडालेला हा कवी, लेखनानंतरही, त्याच बेभान अवस्थेत, प्रकट होऊ पाहतो आहे. काळोख, आकाश, आभाळ, डोळे, सुगंध, गुलाब अशा एकाकी शब्दांचे, किंवा भावस्थितीचे साहाय्य घेऊन, श्री. कुलकर्णी आपले मन शब्दांकित करताना आढळतात. आजूबाजूला पसरलेल्या विराट निसर्गरूपाचा एक कप्पा अंतर्मनात थरथरावा आणि ती थरथर, फार कलाकुसर किंवा आटापिटा न करता रंगाचे ठिपके ओढावेत, स्प्रेसारखे विखुरून टाकावेत, अशाच पद्धतीने, गोविंद कुलकर्णी यांची सगळी कविता आविष्कृत होताना दिसते. त्यामुळे कविता वाचण्याची किंवा कवितेच्या रूपाकडे पाहण्याची जी एक आपल्या मनाला व डोळ्यांना सवय झालेली असते तिलाच ही कविता हेलकावा देते.

अशा लोकविलक्षण पद्धतीने आपल्या व्यथांना, जाणीवांना शब्दरूप देणे आणि तरीही त्यातील तळमळ रसिकमनापर्यंत नेऊन भिडविणे ही एक अवघड गोष्ट होती. निसर्गाचे अफाट रूप जसे त्यांना स्तिमित करून सोडते त्याचप्रमाणे कवीला त्याच्या असहायतेचीही ओळख करून देण्याचे कटु कार्य त्याच क्षणी निसर्गाकडून घडते आणि कवीचे कविपण ह्यात आहे, की तो ही अगतिकतेची कडू गोळी खळखळ न करता आपलीशी करतो. म्हणजे उत्कटतेने ते भारून जातात आणि आपल्या पंगुत्वाने कातर

बनतात. कवी कातर बनला तरी शब्दांना आक्रोशाचे कर्कश वजन, कुलकर्णी येऊ देत नाहीत. कलावंताच्या संयमाने ते शब्द प्रामाणिक व सहज पातळीवरच ठेवतात. ह्यातूनच त्यांना त्यांच्या मनोवेदनेचा एक सूर सापडला आहे आणि म्हणूनच श्री. गोविंद कुलकर्णींची 'अनिमिष'मधील कविता अत्यंत बंदिस्त व वैयक्तिक वाटते, पण तरी तिच्यात सर्वस्पर्शीत्वाचा अंशही मिसळलेला आहे. कारण संवेदनाच्या तरलतेला जपणारा कोणीही माणूस निसर्गाची विराटता व आपली क्षुणता नाकारत नाही.

'तुडूंब तंद्रीची पिकू आली उन्हें
फुलाफळांतून पालवती मने'

असा चित्रदर्शी अनुभव ते मांडतात. वास्तवातील अनेक अवघड व गुंतागुंतीच्या प्रश्नांनी कवी हृतबल बनतो. ह्या अगतिकतेचाच एक सहजोद्‌गार 'कुठे काय? इथे तिथे तिथे इथे कुठे काय?...हातपाय' असा बावरून कवीमुखातून बाहेर पडतो. अज्ञाततही कवीला एक परिचित अशीच धून साद घालत राहते. ती साद आपल्यासाठीच आहे अशी एक वेदना कवीच्या अंतरंगात द्रवासारखी पसरते. पृष्ठ ३५ वरील कविता. मनाच्या चाचपणीतूनही आभाळाच्याच असीमतेचे प्रत्यंतर येते. पृष्ठ ३६, ५३, ६० आणि पृष्ठ ६४ वरच्या कवितातून याच भावनेचे प्रत्ययकारक प्रकटीकरण झाले आहे.

स्वत:च्या सर्वस्वासहित कवीचे मन गहाळ झाल्याची कवीची व्यथा आहे. हे मन साकळल्या आकाशातही बावरी प्रकाशफुले मोठ्या सापेक्षीपणे जपण्यात रममाण होते आणि ह्यामुळेच 'अनिमिष'मधल्या बऱ्याच कवितांना शब्द 'कॅलिडिओस्कोप'सारखे जुळवल्यासारखेही वाटतात. एकच एक प्रदीर्घ कविता वाचून आपण संपविली असाही एक विचार या सगळ्या कवितांचे वाचन केले तर उद्‌भवल्यावाचून राहात नाही. कारण की बंदिस्तपणाच्या व अभिव्यक्तीच्या वेगळेपणाचा अंगिकार केल्यामुळे कवीचे काव्यविश्व एकसुरी व मर्यादित बनले आहे. पन्नास वेगळ्या कविता वाचूनही एकच एक कविता वाचल्याचे प्रत्यंतर यामुळेच येत असावे. एकच एक वेदना एका विशिष्ट ठेक्याने काही नियत भावात्मक कालाने परावर्तीत होते आहे. असे या कविताच्या आस्वादसमयी होते. श्री. गोविंद कुलकर्णी यांच्या कवितेची ही एक ठळक मर्यादा होय.

आजची बहुसंख्य नवी मराठी कविता पाहिली तर तिचा सूर चढा लागल्याचे जाणवते. ती सर्व अंगाने धडाधडा कोसळताना दिसते. पराकोटीच्या तीव्रतेने उमटणारा हा आवाज कानात घुमतो व आपली संवेदनाच बधीर बनवतो. म्हणून एका नव्या कवीची कविता दुसऱ्याहून नेमकी कशी वेगळी हे सांगणे कठीण झाले आहे. अशा तरुण कवींच्या समूहापासून वेगळे राहून आपले मर्यादित पण सूक्ष्म व कंपने उठविणारे भावविश्व 'निमिष'भर निर्माण करण्याचे वेगळेपण गोविंद कुलकर्णींच्या

शैलीला घ्यावे लागले. विराटतेशी सांधा जुळवू पाहणारा, सलगी करू पाहणारा हळव्या मनाचा हा नवा कवी, म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. मराठवाड्याच्या कविपरंपरेचा पाईक ठरतो. वैचारिकतेचाच नव्हे तर भावनेचाही चढा सूर न लावण्याच्या त्याच्या सच्चेपणाची म्हणूनच गंभीर दखल घ्यावी लागते. ◻

**अनिमिष**
गोविंद कुलकर्णी
स्वयप्रभा, प्रकाशन
किंमत ५ रुपये

## पंचविशी

## हौसेला मोल नाही

'विना सहकार नही उद्धार' ह्या मंत्राचे बाकीच्या क्षेत्रात काय होते कुणास ठाऊक? पण कवितेच्या प्रांतात मात्र दोन कवींनी हा मंत्र अंमलात आणून आपले कविताचे पुस्तक प्रकाशित केले आहे. श्री. श्याम जोशी आणि दत्ता जोशी या दोघांच्या प्रत्येकी पंचवीस कवितांचा संग्रह म्हणजे 'पंचविशी' होय.

या जोशी कवींचे एक दर्शनी वैशिष्ट्य जाणवते ते म्हणजे या दोघाही तरुणांना यमकाची खूप आवड आहे. इतकी की त्याशिवाय कविता आकारूच शकत नाही अशी त्यांची धारणा असावी. म्हणून स्वेच्छेने त्यांनी स्वतःला यमकाच्या बेडीत अडकविलेले दिसते. यमकामुळे येणारी कृत्रिमताही त्यामुळेच त्यांच्या कवितेत आपोआप शिरते.

बाह्यचित्रणातच रंगून पडण्याची लकब श्री. श्याम जोशी यांचे वेगळेपण दाखविते. पण सामर्थ्य नाही. 'चांदरात', 'लोणावळ्याचा निसर्ग', 'सागरकाठी', व 'कविता आणि मी' या कविता अनेक दृष्टीने पाहिल्या तरी सामान्यच आहेत. 'जीवनसाले', 'उदबत्ती', 'कमदिल', 'नटलेली नार', व 'गडबडगाडी' या कविता प्रमुखतः उपरोधिक आहे. पण हा उपरोधही दुय्यम प्रतीचा आहे. 'मास्तर' या शीर्षकाची कविता मर्ढेकरांच्या 'गणपत वाण्या'ची आठवण करून देते. पण त्यातील वेदना वा आशयघनता यांच्या जवळपासही ती जाऊ शकत नाही. त्यातल्या त्यात श्री. श्याम जोशी 'गोठ्याच्या वाटेवरती' आणि 'क्षणभर' या दोन कवितात प्रामाणिक वाटतात. अधिक सहज वाटतात. पण त्यांच्या प्रतिभेचा आवाका मर्यादित आहे. कवितेत उर्मीपेक्षा हौसेचा भाग अधिक आहे.

श्री. दत्ता जोशी यांच्या कविता श्याम जोशी यांच्या तुलनेने बऱ्या वाटतात. पण तपशील भरून कविता लांबलचक करण्याची त्यांना खोड आहे. आपल्यास ठाऊक असलेल्या सगळ्या गोष्टी कवितेत आणल्या पाहिजेत अशी त्यांची श्रद्धा आहे. दोन ध्रुव, चौपाटीवर, पिसे, काखेत कळसा, व टिपरी पुनव या कविता अशाच आहेत. नेमक्या आशयाच्या बाबतीत कवीच चाचपडत

असल्याने कविता नुसत्या पद्य पातळीवर रखडत राहतात.

आशयसघनतेच्या अभावाबरोबर जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे अनेक समर्थ कवींच्या शैलीचे तंतोतंत अनुकरण करण्याची वृत्ती. 'बीज अन् तरू', 'अबोल झालीस', 'यावयाचे नव्हते तर' आणि 'बोलावयाचे नव्हते तर' या कविता अनुकरणात फसलेल्या आहेत. 'प्रिये' ही एक श्री. दत्ता जोशी यांची एक चांगली कविता. त्यातील खालील ओळी मनात तरंग उठवितात.

'तूच माझी गेय कविता ।
तूच माझी भाग्यसरिता
जीवनाच्या वाळवंटी ।
येत असता प्राण कंठी
शिंपुनी जल प्राशवीली ।
गाढ ममता ॥'

ह्या ओळी पारंपरिक असूनही प्रामाणिक वाटतात. ह्याप्रमाणेच 'मी' आणि 'फिरस्ते' या कविताही लक्षात राहतात.

श्री. दत्ता जोशी यांची अभिव्यक्ती सहज आहे. त्यांना शब्दांचे चांगले भान आहे. अनुकरण त्यांना अजून टाळता येत नसले तरी मनःपूर्वकतेमुळे त्यातही ते आपला अस्पष्ट का होईना ठसा उमटवू शकतात.

'पंचविशी' हे शीर्षक देऊनच कवींनी आपल्या उत्साहाचे व काव्यवेडाचे प्रकटीकरण केले आहे. इतकेच नव्हे तर 'पंचवीस'च कवितांची निवड करून शीर्षकास अन्वर्थकता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हौसेला मोल नाही हे जरी खरे असले तरी 'माणूस' 'पंचविशी'नंतरच घडत असतो आणि कवींचे वय लक्षात घ्यायचे नसले तरी त्यांची 'झेप' आरंभीच लक्षात येते. ह्या जोशीद्वयांच्या 'पन्नास'-ही कविता वारकाईने वाचल्या तरी हातात अत्यल्प उरते. कवींनीच हे ओळखणे आवश्यक आहे. ◘

**पंचविशी**
श्याम जोशी – दत्ता जोशी
सुदशा प्रकाशन, निपाणी
किंमत २ रुपये


# कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन



# पिलाजीराजे शिर्के

ब. मो. पुरंदरे

महाराजांनी संभाजीराजांना आग्र्याहून येताना मथुरेत कृष्णाजीपंतांकडे ठेवलं होतं. संभाजीराजे यावेळी अवघे नऊ वर्षांचे होते. मथुरेहून राजगडापर्यंत अशा पावसाच्या दिवसात नद्या, नाले आणि जंगले ओलांडीत रात्रीअपरात्री दौडायचे होते. पाठीवर औरंगजेबाच्या फौजा पाठलागावर येणार हेही उघड होतं. वाटेत कुठं ना कुठं मुघली ठाणेदाराच्या चौक्या आडव्या येणार होत्या. त्या चुकवीत हुकवीत पळायचं होतं. सारी वाट दगदगीची आणि संकटाची होती. या नऊ वर्षांच्या बाळाला हे झेपणार नाही, म्हणून महाराजांनी त्याला मथुरेत कृष्णाजीपंतांकडे ठेवलं. महाराज तावडतोब मथुरेहून रातोरात दक्षिणेच्या मार्गाला लागले. स्वराज्याचा चिमणा राजपुत्र मागे राहिला. एवढसं वय, पण संभाजीराजे फार भारदस्तपणे वागत होते. समजूनदारपणा त्यांच्या

अंगी होता.

त्या वेळी महाराज दक्षिणेच्या मार्गावर असलेल्या नरवरच्या घाटीतून जाणार होते. जावंच लागणार होतं. मार्ग तोच होता. नरवरला बादशाही ठाणं होतं. या ठाण्यावर आपल्याला मुघली ठाणेदार आडवील असा महाराजांचा अंदाज होता. महाराज आग्र्याहून पसार झाल्याचे अजून कोणालाही माहीत नव्हते. अद्याप फुलादखानालाही पत्ता लागलेला नव्हता. इतकेच काय पण महाराजांच्या शामीयान्याभवती पहारा करणाऱ्या पहारेकऱ्यांनाही पत्ता लागलेला नव्हता. ते समजत होते की, शिवाजीराजे आत पलंगावर झोपलेच आहेत! ही श्रावण वद्य द्वादशीची रात्र होती. महाराज दुपारीच पसार झाले होते.

महाराज रातोरात दौडत होते. बरोबर बाजी सर्जेराव, निराजी रावजी, राघो मित्र, गंगाजी मंगाजी वगैरे जिवलग सौंगडी होते.

महाराज नरवरच्या ठाण्याजवळ आले. ठाण्यावर पहारेकरी होते. या वेळी महाराजांनी एक विलक्षण गंमत केली. केवढा धाडसी खेळ तो! महाराज स्वत: होऊनच ठाण्यावर गेले! ठाणेदाराने चौकशी केली की, कोण लोक? कुठं चालले? महाराजांनी स्वत: होऊन सांगितले,

'आम्ही शिवाजीराजे भोसले! आग्र्याहून परत चाललो! बादशहांनी परत जाण्यास कालच परवानगी दिली! म्हणून परत निघालो! हे बादशाही परवाने!'

स्वत: महाराजांनी बादशाही शिक्क्यांची परवानापत्रं ठाणेदाराला दाखविली. शिवाजीराजे भोसल्यांसारखा विलक्षण गाजलेला माणूस आपल्या ठाण्यावर आपण होऊन आला याच गोष्टीचं ठाणेदाराला अपरूक झालं. आपण होऊन राजे आपल्या ठाण्यावर येताहेत आणि शाही परवाने दाखवीत आहेत, हे पाहून त्या ठाणेदाराला महाराजांच्या बनवा-बनवी विषयी किंचितही शंका आली नाही. महाराजांनी आपल्याबरोबर हुबेहूब बादशाही शिक्के असलेली बनावट परवानापत्रे घेतली होती. हे शिक्के बनावट तयार करवून बनावट पत्रावर उमटवून महाराजांनी आग्र्याहून निघतानाच बरोबर घेतले होते. वेळ प्रसंगी उपयोगी पडावेत म्हणून. अन् या पत्रांचा अचूक उपयोग महाराजांनी नरवरलाच केला. हा सारा बनावट माल आग्र्यात आधीच महाराजाच्या त्या दोन वकिलांनी तयार करून महाराजांना दिला होता.

ठाणेदाराला स्वत: होऊन भेटून व परवाने दाखवून महाराज नरवरहून पुढं सटकले. याच वेळी आग्र्यात खळबळ उडाली होती. शिवाजीराजे पसार झाले म्हणून केवढी शोधाशोध व धावाधाव चालू होती. औरंगजेबाने तावडतोब सर्व दिशांच्या ठाण्यांना हुकूम रवाना केले की, वाटा बंद करा! कोणालाही सोडू नका. बादशाही शिक्क्याचं परवानापत्र असेल त्यालाच फक्त सोडा. बाकी कोणीही जाऊ लागला तर त्याला कैद करा!

हे हुकूम घेऊन शाही स्वार दौडत सुटले. सगळ्या वाटा, घाट, खिडी, नद्यांचे उतार बंद करण्यात आले. त्यातच एक स्वार शाही हुकूम घेऊन नरवरच्या ठाणेदाराकडे दौडत आला. त्याने शाही हुकूम ठाणेदाराला दिला. त्याने तो वाचला. 'शाही शिक्क्याची परवाना पत्रे असल्याशिवाय कोणालाही नरवरच्या घाटीतून दक्षिणेकडे उतरू देऊ नका, असा हुकूम होता. ठाणेदाराने लगेच वजीर जाफरखानसाहेब यांच्या नावाने मोठ्या अदबीने पत्र लिहून पाठविले. त्याने पत्रात लिहिलं होतं,

'हुजूरचा हुकूम पावला. आम्ही आधीपासून या हुकूमाची अंमलबजावणी करीत आहोत. कालच शिवाजीराजे भोसले येथून दक्षिणेकडे रवाना झाले. त्यांनी शाही परवाने दाखविले म्हणून आम्ही त्यांना जाऊ दिले. नाही तर त्यांनाही आम्ही जाऊ देणार नव्हतो.'

हे उत्तर आल्यावर वजीराने कपाळाला हात लावला! औरंगजेब तर गारही झाला आणि गरमही झाला. त्याने तावडतोब पाठलागावर फौजा पाठवल्या. काय उपयोग? महाराज यावेळी आग्र्यापासून कमीत कमी साठ कोस दक्षिणेकडे दूर गेले होते.

मुघलांना महाराज पुन्हा कधीच सापडले नाही. ते महाराष्ट्रात राजगडावर सुखरूप पोहोचले सुद्धा!

महाराज राजगडावर पोहोचल्यावर काही दिवसातच हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर हे राजगडावर येऊन पोहोचले. महाराजांना आनंद झाला. महाराज आग्र्यात पेटाऱ्यात बसल्यानंतर त्यांच्या पलंगावर हा हिरोजी फर्जंद झोपला होता व मदारी मेहतर त्यांचे पाय दाबीत बसला होता. केवढं भयंकर दिव्य होतं ते! न पेटलेल्या चितेवर झोपण्यासारखंच होतं ते! जर बनाव उघडकीला आला असता तर बादशहाने त्यांना अक्षरशः भाजून काढलं असतं ना! पण दोघेही नंतर पसार झाले. वाटा आडवाटांनी त्यांनी प्रवास केला. हजार संकटांना तोंड देत देत ते राजगडावर सुखरूप आले. महाराजांनी केवढं प्रेमभराने स्वागत केलं त्यांचं. राजगडावर सणासारखा आनंद उफाळला. महाराजांनी केवढं त्यांचं कौतुक केलं. मदारी तर एक लहान पोरगा. अवघं सोळा सतराचं वय. पण त्याने जीव धोक्यात घालून डाव जिंकला होता. महाराजांनी त्याला हृदयाशी धरलं अन् म्हणाले,

'बेटा, केवढं केलंस! किती कौतुक करावं? शाबास लेकरा, काय देऊ तुला?"

हे ऐकताच चटकन मदारी म्हणाला,

'महाराज मला काही नको. वाडेहुडे नको. सरदारी नको. मानपान नको. महाराज आपण तख्तावर बसाल, तेव्हा त्या तख्ताची व्यवस्था ठेवण्याचं काम मला सांगा!"

'जरूर बेटा, जरूर!'

महाराज आनंदाने म्हणाले. पण त्यांनी त्याला बक्षिसी अपार दिली.

आग्र्याहून यायच्या राहिलेल्यापैकी

कुणी ना कुणी राजगडावर येऊन पोहोचत होते. आनंद नव्याने उसळत होता.

एके दिवशी राजगडावर प्रचंड आनंद उसळला. तोफा उडाल्या. नौबती दणाणल्या. शिंगे कर्णे ललकारले. साखऱ्या वाटल्या गेल्या. जणू महाराजांच्या वरुणी महालात राजपुत्रच जन्माला आला. होय! राजपुत्रच जन्माला आला. राजपुत्र नव्याने जन्माला आला. पुनर्जन्मच झाला म्हणायचा हा. चिरंजीव संभाजीराजे मथुरेहून कृष्णाजीपंत 'मामां'च्या बरोबर राजगडावर सुखरूप येऊन पोहोचले. आनंदी आनंद झाला. महाराजांनी अपरंपार दानधर्म केला. युवराजांना सांभाळून घेऊन येणाऱ्या कृष्णाजीपंतांना, त्यांच्या भावांना आणि आईला महाराजांनी खूप मोठं धन बक्षीस दिलं. त्यांना 'विश्वासराव' असा किताब देऊन महाराजांनी आपल्या हृदयातले भाव उघड केले.

महाराजांची अनेक पत्रं औरंगजेबाला गेली होती. दिल्लीचा शाहजादा मुअज्जम दक्षिणेच्या सुभ्यावर सुभेदार म्हणून नेमला गेला होता. या राजपुत्र मुअज्जमशी महाराजांनी फारच स्नेहाचं वागणं ठेवलं. औरंगजेबाने खास मुअज्जमच्या सांगण्यावरून महाराजांना 'राजा' हा किताब बहाल केला. महाराजांना औरंगजेबाने 'राजा' केलं!

या काळात मुघलांशी लढाया थांबल्या. सैन्याला चार दिवस विश्रांती मिळाली. त्यांचे संसार आनंदाने बहरले. शेतीभाती पिकांनी दाटून आली. पुरुष माणसं चार दिवस निवांत घरी राहिलेली बघून घरातल्या लक्ष्म्या सुखावल्या. महाराजांचे गडकोट, पागा आणि अठरा सरखाने ताजेतवाने झाले. महाराज स्वराज्याचं बळ साठवीत होते, वाढवीत होते.

पुरंदरच्या तहात असं ठरलं होतं की, औरंगजेब बादशहांनी युवराज संभाजीराजांना सहा हजाराची मनसब द्यावी. प्रत्यक्ष सैन्य घेऊन लष्करी कामगिरी करण्याइतकी संभाजीराजांची उमर नव्हती. ते फारच लहान होते. म्हणून त्यांचे प्रतिनीधि म्हणून सरसेनापतीने व विराजी रावजी यांनी या मनसबीची कामकाजं पाहावीत असं ठरलं होतं. या कलमाप्रमाणे औरंगजेबाने वऱ्हाड आणि औरंगाबाद प्रांत यांच्या दरम्यानचा मुलुख 'संभाजीराजांची मनसब'. म्हणून महाराजांकडे सोपविला होता. हा मुलुख तसा लहानच होता. पण त्याचा प्रत्यक्ष कारभार पाहण्यासाठी रावजी सोमनाथांची नेमणूक महाराजांनी केली. सहा हजार सैन्यानिशी मुघली छावणीत लष्करी चाकरी करण्यासाठी सरसेनापती प्रतापराव गुजर आणि दिवाण म्हणून निराजी रावजी यांना महाराजांनी औरंगाबादला शाहजादा मुअज्जमकडे रवाना केलं. पहिल्यांदाच या सहा हजाराच्या मनसबीचा केवळ नाममात्र तावा घेण्यासाठी व नाममात्र रूजू होण्यासाठी छोट्या संभाजीराजांना मुअज्जमकडे केवळ दोन दिवसांकरिता पाठवायचं

ठरलं. संभाजीराजे औरंगाबादला रवाना झाले.

औरंगाबादला संभाजीराजांचं आगत स्वागत मुअज्जम शाहजाद्याने फार फार उत्तम केलं. शाहजादा फारच जिव्हाळ्याने वागला. गाठीभेटी उत्तम झाल्या. आग्र्यातील औरंगजेबाची वागणूक आणि औरंगाबादेतील त्याच्याच मुलाची, मुअज्जमची वागणूक यात अपार फरक होता. मानसन्मान परस्परांचे झाले व संभाजीराजे निरोप घेऊन राजगडास परतले. प्रतापराव गुजर आणि निराजी रावजी हे सहा हजार मराठी फौजेनिशी मुअज्जमच्या हाताखाली औरंगाबादेत राहिले. राजकीय गाठीभेटी कशा घ्यायच्या, कसं वागायचं, कसं बोलायचं याचा हा एक धडा संभाजीराजांना इथं मिळाला.

महाराज राजगडावर होते पण त्यांचं सारं लक्ष दिल्ली, आग्र्याकडे लागलं होतं. कारण त्यांचे दोन जिवलग तेथे औरंगजेबाच्या तुरुंगात पिचत पडले होते. आग्र्याला गेलेली सर्व मंडळी परतली. कवींद्र परमानंदही परत आले, पण हे दोघे वकील अडकले होते. रघुनाथपंत आणि त्र्यंबकपंत. सात महिने होऊन गेले होते. महाराजांनी औरंगजेबाशी गोडीगुलाबी चालविली होती, त्यातला एक हेतू, या दोघांना सोडवून आणावं हाच होता.

अखेर जमलं! रघुनाथ बल्लाळ कोरडे आणि त्र्यंबक सोनदेव डबीर शाही तुरुंगातून सुटले! अतिशय हाल सोसूनही ही माणसं खंबीर राहिली होती. त्यांची शरीरं पिचून निघाली होती पण मनं मात्र अभेद्य आणि अजिंक्य राहिली होती.

रघुनाथपंत व त्र्यंबकपंत प्रवास करीत करीत राजगडला येऊन पोहोचली. केवढा आनंद महाराजांना! फार फार भोगून ही माणसं आली होती. आग्र्याहून सुटून येण्यासाठी या दोघांनी अतिशय साहसं केली होती. आता यांचा गौरव करायचा तरी कसा? काय द्यायचं यांना? काय हवंय यांना? सोनं मोती? महाराजांनी दोघांनाही मायेने जवळ हृदयाशी धरलं. त्यांच्या पाठीवरून हात फिरविले. इथं शब्द तोकडे होते. खजिने अपुरे होते. त्यांना याहून अधिक काय हवं होतं?

राजगडाला तोरण लागलं. खरोखरच तोरण लागलं. राजाच्या घरी लगीन निघालं. राजाने आपल्या लेकाचं लगीन ठरवलं. संभाजीराजांना हळद लागली. बाशिंग चढलं. राजाने सोयरीक धरली कोकणातल्या शिर्के राजांशी. चिपळूण प्रांतातल्या कुटऱ्याच्या शिर्के पिलाजीरावांची लेक येसूबाई राजांनी सून म्हणून निवडली. शिर्के राजांचे खानदान फार फार मातबर. फार शतकापासून कोकणात त्यांची तलवार गाजत आली होती. यांच्याच पूर्वजांनी खेळणागडाच्या जंगलदरीत दहा हजार फौजेनिशी आलेल्या मलिकुत्तुजार झैनुद्दिन नावाच्या एका ढाण्या वाघाला साफ लोळवलं होतं! मोठे मोठे राजे महाराजे या सुलतानापुढं भुईसपाट होत असताना शिर्क्यांनी मात्र दहा हजार

शाही फौज गनिमी काव्याच्या एका झडपेत खलास करून टाकली !

पण पुढच्या काळात शिर्केराजे बादशाही मनसबदार बनले. शिर्केराजे दाभोळचे वतनदार बनले. महाराजांना शिर्के हवे होते स्वराज्यासाठी. म्हणून महाराज हा नात्याचा दुहेरी डाव मांडत होते. पिलाजीरावांना एक मुलगा होता. त्याचं नाव गणोजीराजे. महाराजांनी बोलणी लावली, की आमची लेक राजकुंवरबाईसाहेब उर्फ नानीबाईसाहेब आम्ही तुमच्या गणोजीराजांना देतो अन् तुमची येसूबाईसाहेब उर्फ भिऊबाईसाहेब आम्ही आमच्या संभाजीराजांना करून घेतो. पिलाजीराजांना आनंदच झाला. कारण शिवाजीमहाराजांशी सोयरीक जुळतीय ! त्यांनी लगेच हो म्हटलं. नातं जुळलं. महाराजांनी पिलाजीराजांना विनंती केली, की राजे स्वराज्यात या ! बादशहाची चाकरी करू नका !

पिलाजीराजांनी हेही मानलं. महाराजांनी राजांना म्हटलं,

' स्वराज्यात तुम्हांला आणि तुमच्या सर्व शिर्के मंडळींना योग्यतेनुरूप चाकऱ्या मिळतील. पण स्वराज्यात येताना तुम्ही तुमचं दाभोळचं शाही वतन स्वराज्यात सोडून दिलं पाहिजे ! ते वतन सरकारजमा होईल. '

हे कलम जरा अवघडच होतं. एवढं पिढीजात वतन सोडून द्यायचं म्हणजे अवघडच. आजवर एखाद्या राजासारखा कारभार दाभोळला केला. तुकांचे मुजरे, नजराणे घेतले. वाडेहुडे बांधून राज्य केलं, ते सोडायचं ? अन् राजगडच्या लष्करात नोकरी करायची ? राजांना पटेना. महाराज म्हणाले,

' राजे, हे स्वराज्य देवाधर्माचं आहे. हे राज्य म्हणजे श्रींचे राज्य. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा. या राज्याची चाकरी म्हणजे श्रींची चाकरी. '

पिलाजीराजांनी होकार दिला. बादशाही दाभोळचं वतन स्वराज्यात दाखल झालं. राजे मराठी लष्करात सामील झाले. झालं ठरलं. लगीन ठरलं. येसूबाई आणि राजकुंवरबाई नवऱ्या सजल्या. संभाजीराजे व गणोजीराजे नवरदेव शोभले. ही चारही मुलं लग्नात अगदीच लहान होती.

लग्नं गाजली. शिवाजीराजे आणि पिलाजीराजे एकमेकांचे दुहेरी व्याही झाले. मानपान झाले. कोकणची लेक घाटावर आली. घाटावरची लेक कोकणात गेली. ही सोयरीक झाली आणि स्वराज्याचं बळ आणखी वाढलं. पिलाजीराजे कोकणात घरी गेले.

आठ-दहा महिने गेले. पिलाजीराजे अस्वस्थ झाले. त्यांना हा सारा व्यवहार कसातरीच वाटायला लागला ! आपण कोकणातले खरं म्हणजे राजे. पण स्वतंत्र राज्य गेलं बादशहाच्या घशात. ते गेलं. पण पिढीजात वतनदारी होती, तीही गेली ! काय राहिला मान ? कुठं ती वतनदारी आणि कुठं ही पगारी नोकरी ? हे काही बरं झालं नाही. हे आपलं दाभोळचं वतन आपल्याला परत पाहिजेच. शिवाजीमहाराजांनी

आपलं वतन परत आपल्याला द्यायलाच हवं. इतर कोणालाही महाराज वतनं देत नसतील. पण आपल्याला हे द्यायलाच हवं. अन् नक्की ते देतील. कारण आपण त्यांचे सर्वांत महत्त्वाचे नातलग आहोत. आपण एकमेकांचे दुहेरी व्याही आहोत.

झालं! पिलाजीराजे या वतनासाठी बेचैन झाले. एके दिवशी त्यांनी शिवाजीमहाराजांना एक पत्र लिहून पाठवलं.

पिलाजीराजांचं पत्र राजगडावर आलं. महाराजांनी थैली उघडली. त्यांनी पत्र मोरोपंतांकडे दिलं. मोरोपंतांनी पत्र वाचून दाखविण्यास सुरुवात केली. आदराच्या मायन्यानंतर पिलाजीराजांनी लिहिलं होतं,

'.. तरी दाभोळचे आमचे वतन सरकारात अमानत जाहाले. हे आमचे वतन पुरातन. वाडवडील खात आले. इमाने इतबारे तख्ताची चाकरी खात आले. जे वडिली मिळविले ते जतन करावे हे लौकिकास योग्य होय. सांप्रतही आम्ही महाराजांची चाकरी इमाने करीत आहोत. तरी दाभोळचे आमचे वतन आम्हांस परतोन मिळावे......'

पत्रातील मजकूर ऐकून महाराज क्षणभर काहीच बोलले नाहीत. नंतर ते जराशा उदासपणे हसले. मोरोपंतांनी त्यांच्या मनातला भाव ओळखला. ते म्हणाले,

'महाराज, हा अवघ्यांचा स्वभावच झाला आहे. वतनाची पाळेमुळे खोलवर गेली. वतनावाचून माणसास जिणे व्यर्थ वाटते.'

'पंत, ही वतनदारी मोठी घातक. हे वतनदार प्रसंगी वतन टिकविण्यासाठी स्वराज्याशी वैर करतील. शत्रूस सामील होतील, हे जाणून आम्ही वतने देणे बंद केले. सरंजामी वतने आहेत, ती जप्त करीत चाललो. हेतू हा की, स्वराज्य बळदंड व्हावे. खाजगी वतनदार बळजोर न व्हावेत. त्यांनी इमाने इतबारे स्वराज्याची चाकरी करावी. पराक्रमाची आणि कर्तबगारीची हौस त्यांचे मनात आणि मनगटात उगवावी. केवळ वडिली मेळविले ते वतन उपभोगीत राणे हा पुरुषधर्म नव्हे परंतु व्याहींना आमचे मन उमगलेच नाहीत.'

'महाराज शिर्क्यांची समजूत घालावी.'

'पंत आम्ही प्रयत्न मांडिला की अवघ्या जनांनी या देवाधर्माचे राज्यावर प्रीत करावी, निष्ठा ठेवावी. शिर्केराजांना आम्ही राज्यात आणले. त्यांस लेक दिली. त्यांची लेक केली. हेतू हा की, त्यांची या राज्याचे ठायी माया जडावी. परंतु शिर्केराजे केवळ वतनावरच माया करतात. वतन मागतात. पंत व्याह्यांस वतन देणे नाही! ही विषाची चटक बरी नव्हे. त्यास वतन देणे नाही, नाही!'

'महाराज, शिर्केराजे फार मातब्बर आहेत. वतन न दिले तर ते कदाचित रूसतील.'

'कदाचित आमच्यावर रागावतील-सुद्धा! पंत, येथे कोणाच्या राग-

लोभाचा सवाल नाही.'

'पण महाराज शिर्केराजे नाराज होऊन जर–जर– ?'

'पुन्हा बादशाहास सामील झाले तर ना ?'

'होय महाराज, हीच भीती वाटते. स्वार्थ आणि अविचार यांचं नातं फार जवळचं असतं.'

'तर पंत, शिर्केराजे पुन्हा आमचे शत्रू होतील. बस्स इतकंच होईल. पंत शत्रू परवडला पण वतनदार नको! बाहेरून हल्ले करणाऱ्या शत्रूला हे राज्य लौकर मोडता येणार नाही. पण आत वतनदार असले तर ते मात्र हे राज्य क्षणात बुडवतील. शिर्केराजे आम्हांला व्याही म्हणून हवे आहेत. लढत्या हत्याराचे मर्द म्हणून हवे आहेत. वतनदार म्हणून नकोत.'

'अगदी खरं आहे महाराज, पण महाराज मला वाटतं वतन न देताही जर शिर्केराजे आपल्या मायेत राहतील तर—'

'तो प्रयत्न आम्ही जरूर करू. काही राजकारण करू. पण पंत स्वकीयांशीच राजकारणं करायची वेळ आली की आम्हांला दुःख होतं. स्वकीयांसाठी अंतःकरण असावं. परक्यांसाठी राजकारण असावं. पण निरुपाय आहे पंत, लिहा! तुम्हीच लिहा. शिर्केराजांना आम्ही सांगतो तो धूर्त राजकारणातला हितकारक गनिमी कावा लिहा—'

पंतांनी कलमदान आणि कोरा बंद घेतला. महाराज सांगू लागले. पंत लिहू लागले. मायना लिहिल्यानंतर महाराजांचे शब्द पंतांनी लिहिले,

'...दाभोळचे वतन जे अमानत जहाले, ते परतोन मिळावे. म्हणोन लिहिले. तरी, आपले राज्यात वतने देण्याचा दंडक नाही. परंतु तुम्ही स्वामीकार्य केले व सोयरीकही तुम्हासी जाली. तरी चिरंजीव राजकुंवरबाईस पुत्र होईल, तेव्हा ते देशमुखी वतन आपण तुम्हास देऊ...

महाराजांनी शिर्केराजांची ही वतनाची मागणी मानलीही नाही आणि नाकारलीही नाही. राजकुंवरबाईला मुलगा होईल तेव्हा त्याच्या नावाने वतन परत करू असा धूर्त गनिमी कावा करून महाराजांनी हा प्रश्न कमीत कमी दहा वर्षं पुढं ढकलला.

महाराज हसले. त्या हसण्यात कुत्सित भाव नव्हता, तर विषण्ण निरुपाय होता.

हे पत्र पिलाजीराजांना रवाना झाले. राजांनी ते वाचलं. जरासे खट्टू झाले. पण खूषही झाले. वतन आत्ता मिळणार नसले तरी पुढं मिळणार आहे, हा आनंद त्यांना झाला.

एकूण पिलाजीराजे भाबडेच. त्यांना शिवाजीमहाराजांचं अंतःकरणही कळलं नाही आणि राजकारणही कळलं नाही!

□ □ □

# पुन्हा एकदा सिमला करार

पुन्हा एकदा सिमला करार

## रौप्यमहोत्सवी भेट
## देशाचा विश्वासघात
## की
## नवे म्युनिक ?

बॅ. रजनी पटेल
व्ही. के. नरसिंहन्
नीळकंठ खाडिलकर
मिलिंद गाडगीळ
रवींद्र पवार
प्रभाकर रेगे
मेजर रणजितसिंग
जगदीश गोडबोले
श्री. ग. माजगावकर

# शांततेची वाटचाल सिमला कराराचे सार्थक

रजनी पटेल

तंटेबखेडे, तीन युद्धे आणि अगणित चकमकी हा भारत–पाकिस्तानचा पाव शतकाचा इतिहास. ह्या दोन देशांनी आता त्या यातनामय इतिहासाकडे पाठ फिरवून आपल्यामधील वादग्रस्त प्रश्न सोडविण्यासाठी शांततेचा मार्ग अनुसरण्याचा निर्णय घेतला आहे. भारत–पाकिस्तान संबंधावर जी कोळिष्टके माजली होती ती सिमला येथे एका फटकाऱ्यासरशी झटकून टाकण्यात आली. शांततेचा मार्ग आता साफ झाला आहे.

पाकिस्तानचे अध्यक्ष श्री. झुल्फिकार अली भुत्तो जूनच्या अखेरच्या आठवड्यात सिमला येथे शिखर वाटाघाटी चालू असताना पत्रकारांना मुलाखत देताना म्हणाले होते, 'एका फटकाऱ्यासरशी काही आम्हाला सर्व काही नीटनेटके करता येणार नाही. पंचवीस वर्षांच्या ह्या ढिगाऱ्याची झाडलोट करण्यासाठी काही काळ लागणारच.'

ह्या दोन देशांत पंचवीस वर्षांच्या वैरामुळे निर्माण झालेले गैरसमज व संशय दूर करण्यासाठी काही काळ वेगवेगळ्या पातळीवर वाटाघाटी करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. सिमला कराराचे महत्त्व आहे ते हे. त्याने आज प्रत्यक्ष पदरात काय पडले आहे ह्यापेक्षा त्याने काय साध्य होणार आहे ह्या दृष्टीने त्याला महत्त्व आहे.

श्री. भुत्तो व श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी इतिहासाच्या मढ्यांना वर्तमानावर सत्ता गाजवू दिली नाही हे करारावरून दिसते. शांततेचे व परस्पर सहकार्याचे युग सुरू करण्याची संधी त्यांनी वाया जाऊ दिली नाही. फाळणीपासून ज्या वादांनी ह्या उप-खंडाला बेजार केलेले आहे ते वाटाघाटींनी सोडविण्यासाठी सिमला करारामुळे मार्ग मोकळा झाला आहे.

**वादग्रस्त प्रश्न सोडवण्यासाठी तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप व शस्त्रबळ सिमला करारात वर्ज्य मानले आहे हे लक्षात घेतले, तर ३ जुलै १९७२ रोजी करण्यात**

आलेला हा करार क्रांतिकारकच आहे असे म्हणावे लागेल.

तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप, मध्यस्थी किंवा लवाद ह्यांना ह्या करारात स्थान नाही. हितसंबंधी तिसऱ्या पक्षाच्या हस्तक्षेपावाचून भारत व पाकिस्तान ह्यांना आपल्यातील वादग्रस्त प्रश्नांचे मूल्यमापन करता येईल आणि त्याच्या बाबतीत योग्य तो दृष्टिकोन स्वीकारून शक्य तोवर त्यांचा उकल करता येईल.

शस्त्रबळाचा वापर करायचा नाही आणि फौजा आंतरराष्ट्रीय सरहद्दीच्या आपापल्या बाजूना मागे घ्यायच्या, कोणाच्याही मान्य स्थानाला बाध न आणता १७ डिसेंबर १९७१ ची युद्ध-बंदीच्या वेळचो प्रत्यक्ष नियंत्रणाखालील रेषा प्रमाण मानायची, ह्या निर्णयामुळे ताण तावडतोब नाहीसा होईल.

शस्त्रबळ वापरायचे नाही आणि फौजा आंतरराष्ट्रीय सरहद्दीपर्यंत मागे घेऊन गेल्या युद्धात जिंकलेला मुलुख परत करायचा हे ठरल्याने वातावरण निवळले असून थंड वातावरणात चर्चा घडून येणे शक्य झाले आहे.

वादग्रस्त प्रश्न सोडविण्यासाठी सिमला बैठकीनंतर आणखी बैठकी होतील हे दोन्ही देशाच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले आहे. पंचवीस वर्षे साचून राहिलेला द्वेष व संशय ह्यांनी ह्या दोन देशांतील शेजारधर्माचे सबंध दूषित झाले होते, तो द्वेष व संशय निपटून काढण्यासाठी कधी नव्हे ती संधी सिमला बैठकीमुळे मिळाली आहे ह्याची जाणीव श्रीमती गांधी व श्री. भुत्तो ह्या दोघानाही होती.

**लोकशाही अखत्यारी**

पाकिस्तानातील दुसऱ्या कोणत्याही नेत्याला कधी नव्हता असा अधिकार घेऊन, लोकांचे अखत्यारपत्र घेऊन श्री. भुत्तो सिमल्याला आले होते. लोकशाही पद्धतीने निवडलेले राष्ट्राचे नेते ह्या नात्याने श्री. भुत्तो ह्यांनी सिमला येथे आल्यावर देखील स्पष्ट केले, की चिर-स्थायी शांतता कशी प्रस्थापित करता येईल हे पहाण्यासाठी आपण आलो आहोत. सिमल्याला येण्याच्या आदल्या दिवशी रेडिओवर बोलताना श्री. भुत्तो म्हणाले होते, की मागे वाटाघाटीनी वाद मिटवता आले नसले तरी युद्धाने कोणाचाच फायदा झालेला नाही.

भारताशी पुन्हा युद्ध करण्याने पाकिस्तानची अपरिमित हानी होईल हे श्री. भुत्तो जाणून आहेत. ह्या वर्षाच्या सुरुवातीला सत्तेवर आल्यापासून त्यांनी ज्या लोकशाही प्रक्रियेला चालना दिली ती अशा युद्धामुळे कमकुवत होईल. अशा युद्धामुळ लष्करी यंत्र पुन्हा खडे होईल आणि ज्या सेनाधिकाऱ्यांची देशा-वरील पकड त्यांनी काहीशी मोडून काढली होती त्या सेनाधिकाऱ्यांना पुन्हा बळ येईल. तरीदेखील प्रदीर्घ लष्करी राजवटीचे क्लेशकारक अनुभव पाकि-स्तानने अजून झटकून टाकायचे आहेत.

पाकिस्तानचे अध्यक्ष म्हणून आपल्या शिरावर कोणता भार आहे ह्याची स्वतःला जाणीव असल्याचे श्री. भुत्तो ह्यांनी दाखवून दिले आहे. गेल्या वर्षी भारतावर आग पाखडणाऱ्या भुत्तोहून अगदी वेगळी अशी प्रगल्भता, सावधपणा

आणि सूक्ष्म राजकीय विवेचकता श्री. भुत्तो ह्यांनी सत्तेवर आल्यापासूनच्या आपल्या सर्व कृतींनी दाखविली आहे. हुकूमशाहीपेक्षा लोकशाही अधिक कठीण कसोटी आहे ह्याचा पडताळा श्री. भुत्तो ह्यांच्या वर्तनात व कार्यपद्धतीत पहायला मिळतो.

पाकिस्तानने ताश्कंद करार धाब्यावर बसवलेला असल्यामुळे पाकिस्तानवर विश्वास ठेवता येणार नाही ही टीका आता अप्रस्तुत आहे. ताश्कंद करारावरील अत्याचाराला जबाबदार असलेल्या सत्तासाधनापेक्षा वेगळी अशी आजची पाकिस्तानातली राजकीय घडण आहे.

पाकिस्तानात व भारतात आज जी परिस्थिती आहे तीमुळे श्री. भुत्तो ह्यांच्या दृष्टिकोनात व धोरणात क्रांतिकारक परिवर्तन घडून आले आहे. १९६५ च्या युद्धानंतर ताश्कंद येथील त्यांचा युद्धखोरासारखा पवित्रा ज्या निरीक्षकांनी पाहिला होता त्यांना १९७२ मध्ये सिमला येथे त्यांनी मिळते घेण्याची भूमिका घेतलेली पाहून सुखद आश्चर्य वाटले. हे घडले ह्याचे कारण असे, की ताश्कंद बैठकीनंतर हिंदुस्तान उपखंडातील परिस्थिती विलक्षण पालटली आहे.

भारतात एक क्रांतिकारक राजकीय-आर्थिक परिवर्तन घडून आले आणि श्रीमती इंदिरा गांधींनी देशाला नवे गतिमान नेतृत्व दिले. ह्या नेतृत्वाने जो राजकीय दिशा दिली तीमुळे १९७१ च्या वादळातून, संकटातून आणि युद्धातून यश, सन्मान व वैभव संपादन करून आपण बाहेर पडलो. ह्याउलट पाकिस्तानात प्रतिगामी लष्करी हुकूमशाहीने पेरलेल्या युद्धाच्या व द्वेषाच्या बियाण्याने केवळ पराभवाचे व विभाजनाचे पीक आले. ह्या प्रतिगामी लष्करी हुकूमशाहीमुळे पाकिस्तानला विपत्ती आणि विध्वंस ह्यांच्या अग्निदिव्यातून जावे लागले. ह्यातून साडेसात कोटी लोकांचे स्वतंत्र, लोकशाहीवादी, धर्मातीत व समाजवादी प्रजासत्ताक राज्य म्हणून बांगलादेश उदयाला आला. ह्यामुळे जगातले पहिले व सर्वात मोठे मुसलमान राष्ट्र हे पाकिस्तानचे महत्त्व घसरले.

## सुस्थिर नेतृत्व

पाकिस्तानात जी परिस्थिती आहे तिच्या उलट भारतातली राजकीय परिस्थिती आहे. इथले नेतृत्व भक्कम पायावर उभे आहे. आणि उपखंडात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सद्भावनेने व कळकळीने जे काही केले जाईल, त्याला लोकांचा पाठिंबा मिळण्याची इथल्या नेतृत्वाला खात्री आहे.

पाकिस्तानातील लोकांना भारतातल्या लोकांइतके स्वातंत्र्य नसले आणि त्यांचा आवाज तितका प्रभावी नसला तरीदेखील भुत्तो आता जे काही निर्णय घेतील त्याला पाकिस्तानातील लोकांचा पाठिंबा असला पाहिजे ह्याची जाणीव श्रीमती गांधींना आहे. चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने भुत्तो यांना जे जे काही करायचे असेल ते ते त्यांनी आधी पाकिस्तानातील लोकांच्या

"गळी उतरवले" पाहिज. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी राजवटीने लोकमतास चुचकारले पाहिजे.

पाकिस्तानात खरीखुरी लोकशाही राजवट येणे ही उपखंडात चिरस्थायी शांतता प्रस्थापित होण्याची उत्तम हमी आहे. बांगला देशातल्यासारख्या लोकशाहीनिष्ठ सरकारशीच भारताला चिरंतन मित्रत्वाचा व शांततेचा करार करता येईल. ज्या लष्करी हुकूमशाहीने पाकिस्तानी लोकांना कंगाल करून सोडले, अर्थव्यवस्थेची पुच्छप्रगती केली आणि लोकशाही प्रक्रियांना मुसक्या घातल्या तिच्याशी भारताला मित्रत्वाचा व शांततेचा करार करता येणे शक्य नव्हते. श्री. भुत्तो यांच्या नेतृत्वाखालील लोकशाही प्रवाहाचे लष्करी यंत्रावर वर्चस्व रहायला हवे असेल तर तो प्रवाह पुष्ट बनविणे हे भारताचे कर्तव्य ठरते.

भारताला पाकिस्तान सुस्थिर, एकसंध व पुरोगामी झालेले हवे आहे असे श्रीमती गांधींनी वारंवार सांगितलेले आहे. पंचवीस वर्षांपूर्वी ज्या विसंगत कल्पनांवर पाकिस्तानची उभारणी झाली, त्या बांगला देशच्या उदयामुळे निरर्थक ठरल्या असून गाडल्या गेल्या आहेत. लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या पुढारीपणाच्या नेतृत्वाखाली बांगला देशने सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आणि परंपरावाद व मागासलेपणा नष्ट करण्यासाठी जे प्रयत्न केले आहेत, त्यांचा परिणाम पाकिस्तानवर झाला आहे.

सिमला करार हा प्रतिगामी शक्तीविरुद्ध प्रहार आहे हे दोन्ही देशातील प्रतिगामी शक्ती त्याविरुद्ध चवताळून उठल्या आहेत त्यावरून लक्षात येते. एक जनसंघ सोडला तर भारतात सिमला कराराविरुद्ध दुसरा जवळजास एकही आवाज उठलेला नाही. राष्ट्रीय नेतृत्व जे जे काही करील त्याला विरोधी पक्षाने आक्षेप घेतलाच पाहिजे या भ्रामक समजुतीचा जनसंघावर पगडा असेलही, पण या कराराविरुद्ध त्याने जी आक्रस्ताळी हाकाटी चालवली आहे ती मागील विचारसरणी अधिक बारकाईने तपासून पाहिली तर हे कळून येईल, की विचारपूर्वक घेतलेल्या राजकीय भूमिकेपेक्षा ह्या हल्ल्यामागे त्याची जातीय विचारसरणीच अधिक आहे.

भारतातील व पाकिस्तानातील सर्वसाधारण लोकांचे परस्परांशी काही वैर नाही, पुढाऱ्यांनी आणि सत्ताधारी लोकांनी ह्या दोन देशांमध्ये सतत वैराग्नी जळत रहावा म्हणून खटाटोप केला आहे. परकीय शस्त्रांमुळे प्राप्त झालेल्या सामर्थ्याचा प्रभाव दाखवण्यासाठी आतापर्यंत पाकिस्तानचे लष्करी पुढारी फुरफुरत होते. लोकनियुक्त नेता ह्या नात्याने श्री. भुत्तो ह्यांना सिमला बैठकीहून रिक्त हस्ते परतणे शक्य नव्हते. आपल्या लगतच्या शेजाऱ्याशी शांततेचे व स्नेहाचे संबंध रहावेत असे ज्या लोकांना तीव्रतेने वाटते, त्यांचे श्री. भुत्तो ह्यांच्यावर सतत दडपण आहे.

शांततेचा काळ लाभला तर देशा-

## घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा


**प्रथम पहिल्या मुलाची सर्व तरतूद नीट करायला नको का?**



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

**लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक**

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/480

तील आर्थिक विकासाच्या व सामाजिक पुनर्रचनेच्या अधिक निकडीच्या प्रश्नांकडे लक्ष देता येईल ह्याची जाणीव श्री. भुत्तो ह्यांना आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला बांगला देशची जी मदत होती ती आता बंद झाल्यामुळे तर ह्या प्रश्नांनी विलक्षण उग्र स्वरूप धारण केले आहे. लष्करी पसारा सांभाळण्यामुळे देशावर असह्य भार पडतो, प्रगती व समृद्धी ह्यांची पिछेहाट होते आणि लाभ तर तसा काही होत नाही, हा अनुभव भारताशी झालेल्या तीन युद्धांमुळे आला आहे.

पाकिस्तानच्या सर्व परदेशी 'उपकारकर्त्यां'नी इतकी वर्षे पाकिस्तानला झेपणार नाहीत, फारशी वापरताही येणार नाहीत अशी शस्त्रास्त्रे व दारूगोळा पुरविण्यापलिकडे काहीही केलेले नाही, हे श्री. भुत्तो ह्यांना समजून चुकले आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था सुधारावी किंवा प्रगतिशील आधुनिक देश असा त्याचा विकास व्हावा, ह्यासाठी त्यांच्यापैकी कोणीही म्हणण्यासारखे काही केलेले नाही.

अशा पार्श्वभूमीवर सिमला शिखर बैठकीमुळे कोणाचा जास्त फायदा झाला ह्याचा हिशेब करणे हे निव्वळ मूर्खपणाचे आहे. **ह्या बैठकीमुळे आणि करारामुळे जो लाभ होणार आहे तो भारतीय व पाकिस्तानी लोकांचा लाभ होणार आहे.** शांततेचा प्रदीर्घ काळ प्राप्त होणे हे ह्या दोन्ही देशांच्या आर्थिक विकासासाठी उत्तम भांडवल आहे. सिमला करारात व्यापारी, आर्थिक व सांस्कृतिक संबंधांची व इतर वेगवेगळ्या क्षेत्रातील सहकार्याची तरतूद आहे.

सिमला येथे काही चमत्कार घडून येतील अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती; आणि तरीही जो करार झाला तो चमत्कारच म्हणावा लागेल. ह्या दोन नेत्यांच्या विवेकशीलतेला याचे श्रेय द्यायला हवे. 'एक पाऊल मागे, दोन पाउले पुढे' ही अनेक वर्षांची राजकीय चाल ह्या दोघांनी स्वीकारली. दोन्ही देशांनी एक पाऊल मागे घेतले आहे, पण आता ते दोन्ही देशांच्या लोकांच्या भल्यासाठी दोन प्रचंड पावले पुढे टाकू शकतात. सिमला बैठकीचा एक महत्त्वाचा परिणाम असा झाला, की डिसेंबरच्या युद्धापूर्वी जो तणाव वाढला होता तो नाहीसा झाला. म्हणूनच इतर काही नाही तरी सिमला करार हे शांततेच्या व संबंध सुरळीत होण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल आहे.

## शांततेची आच

दोन्ही देशांना शांततेची गरज आहे ह्याचा सिमला शिखर बैठकीच्या वेळी विशेष प्रभाव पडलेला दिसून आला. एका काळी भारत व पाकिस्तान ह्यांनी एकच वारसा संपादन केला होता. आता समान वारसा जोपासत असलेल्या ह्या दोन देशांनी निकटचे शेजारी म्हणून परस्परांशी शांततेने राहिले पाहिजे आणि अडीअडचणीच्या व आपत्काळी एकमेकांच्या मदतीला धावून गेले पाहिजे. कधी नव्हते एवढे हे बांगला देशाच्या जन्मानंतर भुत्तो यांनी ओळखले आहे. स्वतःच्या देशाच्या प्रश्नांबाबत

श्री. भुत्तो ह्यांचा दृष्टिकोन वास्तव व व्यवहारी असल्यामुळे आपल्या देशाची अर्थव्यवस्था स्थिरस्थावर करण्यासाठी आणि लष्करी हुकूमशहांनी मागे ठेवलेल्या धुळधाणीतून आधुनिक, प्रगतिशील राष्ट्र उभे करण्यासाठी त्यांना बराच काळ शांतता नांदायला हवी आहे.

> आणि आपल्या दृष्टीने विशेष महत्त्वाची गोष्ट अशी, की श्री. भुत्तो हे आपल्या देशाचा जीवनमार्ग म्हणून समाजवादाची भाषा करणारे पाकिस्तानचे पहिलेच सत्ताधारी नेते आहेत.

सिमला येथे मतैक्य होण्यासाठी दोन्ही बाजूंनी देवाणघेवाण केली. जुनी युद्धबंदी रेषा प्रमाण मानावी आणि शांतता राखण्याच्या कामात संयुक्त राष्ट्रांच्या निरीक्षकांना गोवून घ्यावे या दोन गोष्टींचा पाकिस्तानने बोलणी सुरू होण्यापूर्वीच आग्रह धरला होता. अंतिम करारात या दोन्ही मागण्यांना स्थान मिळालेले नाही. त्याऐवजी सर्व प्रश्न तिसऱ्या पक्षाच्या हस्तक्षेपावाचून द्विपक्षी वाटाघाटींनी सोडविण्याविषयी करारात स्पष्ट उल्लेख आहे.

गेल्या युद्धात जिंकून घेतलेला पंजाब व सिंधमधील ५००० चौरस मैलांचा प्रदेश पाकिस्तानला परत करण्यासाठी कराराने भारत बांधलेला आहे हे खरे आहे, पण जम्मू व काश्मीरच्या बाबतीत मात्र ते लागू नाही. पश्चिम विभागातील युद्धकैद्यांच्या परत पाठवणीसाठी चर्चा व्हावी लागणार आहे. आणि पूर्व विभागातील युद्धकैद्यांची परत पाठवणी बांगला देशाच्या संमतीवाचून होऊ शकणार नाही. याचा अर्थ असा, की पाकिस्तानला अगोदर बांगलादेशाला मान्यता द्यावी लागेल. तसे पाहिले तर गेले युद्ध काही मुलूख जिंकून घेण्यासाठी झाले नव्हते आणि डावपेच व व्यूहरचना या विचारापलिकडे कोणत्याही बाजूने दुसऱ्याचा मुलुख जिंकण्याचा प्रयत्न केला नाही.

### महत्त्वाचा लाभ

पाकिस्तानने १७ डिसेंबर १९७१ च्या युद्धबंदीच्या वेळची जम्मू व काश्मीरमधील नियंत्रण-रेषा मान्य केली आहे, तीत बदल करण्यासाठी शस्त्रबळ न वापरण्याचे कबल केले आहे आणि द्वि-पक्षीय वाटाघाटींनी ती ठरवून घेण्याचे कबूल केले आहे. हा भारताचा महत्त्वाचा फायदा आहे.

पाकिस्तान काश्मीरमध्ये 'स्वयंनिर्णया'ची निर्यात करणार नाही, काश्मीरमधील लोकांना त्यांची परिस्थिती असमाधानकारक वाटत असेल तर त्यांनी आपला 'स्वयंनिर्णया'चा हक्क बजवावा असे जे श्री. भुत्तो ह्यांनी सिमला बैठक सुरू होण्यापूर्वी भारतीय पत्रकारांना सांगितले ते अर्थपूर्ण होते. ताश्कंद येथे आणि १९६६ च्या आधी व नंतर त्यांनी जी भूमिका घेतली होती तीत हा विलक्षण बदल होता. त्यावेळी त्यांनी भारताशी युद्ध करण्याचा पुरस्कार केला होता.

आपल्या लोकांच्या कल्याणाकडे लक्ष देण्याची जो निकड आहे तिच्या कामी

आपली साधनसामुग्री व शक्ती लावणे दोन्ही देशांना शक्य व्हावे म्हणून आजवर स्नेहाच्या व सलोख्याच्या संबंधांना बाधक ठरलेल्या संघर्षाचा व संग्रामाचा शेवट करून उपखंडात चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्यात यावी असे भारत व पाकिस्तान ह्यांनी ठरवले आहे, असे सिमला करारात म्हटले आहे.

अबाधित शांततेसाठी दोन्ही देशातील लोक आसुसलेले आहेत ह्याचे दडपण आल्याचे हे निदर्शक आहे. पाकिस्तानला अमेरिकन शस्त्रे देणे बंद करावे आणि सर्व तणावाच्या विभागातून मागे सरावे म्हणून अमेरिकेवरदेखील असे लोकशाही दडपण येत आहे. आंतरराष्ट्रीय पोलिसाचे काम करून अमेरिका आता थकली आहे.

भारत ही आता आशियातील महत्त्वाची शक्ती बनली आहे व पाकिस्तानला शस्त्रे पुरवून त्याला भारतासमोर उभे करण्याचे आत्मघातकी धोरण इतःपर अमेरिकेला अनुसरता यायचे नाही, हे अमेरिकेच्या धोरणाच्या शिल्पकारांनी लक्षात घेतले आहे. राष्ट्राध्यक्ष भुत्तो ह्यांनादेखील बदललेल्या परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. एकदा का अमेरिकन शस्त्रांचा पुरवठा बंद झाला, की भारताबरोबर सतत संग्राम चालू ठेवण्याचा ताण पाकिस्तानला झेपणार नाही.

आणि अशा सर्व संग्रामांनी स्वतःची हानी झालेली असल्यामुळे पाकिस्तानी नेत्यांनी भारताचा मैत्रीचा हात पकडण्याचे ठरवले आहे. ह्यामुळे उपखंडात लोकशाही, समानता व समृद्धी अवतरणार आहे. ह्या दोन देशांना पूर्ण मनोमीलनाचा मार्ग अनुसरता येईल, मात्र एकेक पावलाने.

□ □

[ मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी प्रकाशन ]

# नागरिक परिषद् मुंबई

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला जनसंघाच्या वतीने मुंबई येथे एक सिमला-करार विरोधी नागरिक परिषद आयोजित झाली होती. या परिषदेत झालेल्या भाषणांचा सारांश

## श्री. व्ही. के. नरसिंहन्

संपादक, इंडियन एक्सप्रेस

मी सिमला कराराचा विरोधक नाही. मग मी या परिषदेला कसा आलो? एक संपादक या नात्याने सिमला कराराबद्दलच्या लोकभावना समजावून घेण्यासाठी मी या परिषदेस उपस्थित आहे. सिमला करार करताना पंतप्रधानांनी पाकिस्तानचे अध्यक्ष श्री. भुत्तो यांची भूमिका बदलली आहे, या गोष्टीवर विश्वास ठेवला आहे. या विश्वासाला श्री. भूत्तो हे पात्र आहेत किंवा नाहीत हे अद्याप ठरावयाचे आहे. वाट पहाण्यास हरकत तर खासच नाही. आपल्याला जागृत राहूनच भूत्तोंची ही कसोटी पहावी लागेल. सिमला कराराने स्थायी शांती येईलच असे छातीठोकपणे सांगता येणे कठीण आहे. त्याबाबत शंकेला जागा आहे. पण म्हणून प्रयत्नच करू नये असे नाही. प्रदेश परत करणे ही आता नामुष्कीची बाब नाही. आंतरराष्ट्रीय संकेतानुसार, कोणतेही राष्ट्र दुसऱ्याचा प्रदेश फार काळ ताब्यात ठेवू शकणार नाही. सावध राहून, श्री. भूत्तो यांचेवर नजर ठेवून त्यांना सिमला कराराची अंमलबजावणी करावयास लावणे हा एकच मार्ग भारतापुढे होता तो श्रीमती इंदिरा गांधींनी अवलंबिला. त्याच्या यशस्वितेबद्दल आज तरी शंका घेण्यास जागा आहे.

## श्री. नीळकंठ खाडीलकर

संपादक, नवाकाळ

सिमला येथे शिखर परिषदेसाठी श्रीमती इंदिराजींनी श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. जगजीवनराम यांना बरोबर नेले तेव्हाच इथे काहीतरी पाणी मुरते आहे अशी मला शंका आली. करार झाला असे केवळ वृत्त आले.

कराराचा तपशील नंतर येईल असे सांगण्यात आले तेव्हा तर संशय पक्का झाला व या करारात भारताचे हिताचे विरुद्ध अशी कलमे आहेत अशी कराराचा मसुदा पाहिल्यानंतर तर माझी खात्रीच पटली.

सिमला करार हे एक नाटक आहे. मैत्री होणे कठीण आहे हे दिसत असूनही मैत्रीची, सहकार्याची, चिरशांतीची नाटकी भाषा बोलली जात आहे. परस्परांवर आक्रमण करणे योग्य नाही हे पटल्याचे भूत्तोंनी सांगितले, पण अनाक्रमण करार करावयास ते तयार नाहीत. काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे असे म्हणत म्हणत भारताने काश्मीर प्रश्न परस्पर सहकार्याने सोडविण्याच्या कलमाला मान्यता दिली व तो पुन्हा काढता येईल असा वादग्रस्त प्रश्न बनविला. श्री. जगजीवनराम यांच्या राणा भीमदेवी थाटातल्या गर्जना त्यांना गिळायला लावून त्यांचा विसरभोळा 'गोकूळ' बनविणारे सिमला करार हे एक नाटक आहे. या करारातील परस्पर सहकार्याची, सद्भावनेची भाषाही नाटकीच आहे. त्याच्यावर पडदा पडून प्रत्यक्ष संघर्ष कधी सुरू करायचा हे पाकिस्तानच्याच हाती आहे.

जिंकलेला भू-प्रदेश परत देणे, कसलीही हमी न घेता, नुकसानभरपाई न मागता, आपला प्रदेश परत न मागता तो प्रदेश परत देणे हा देशाचा विश्वासघातच मानला पाहिजे.

रशियाचा या कराराचे मागे हस्तक्षेप आहे. त्यांच्या दडपणानेच हा करार झाला यात मला तिळमात्र शंका नाही.

## श्री. मिलिंद गाडगीळ

असोसिएटेड मेंबर ऑफ इन्स्टिटयूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीज, लंडन

युद्धशास्त्राचे दृष्टिकोनातून हा करार म्हणजे एक कागदाचा कपटा आहे. या खेरीज त्याला अधिक किंमत नाही. एकतर्फी युद्धविराम ही या कराराची नांदी होती. आणखी तीन दिवस पश्चिम आघाडीवर युद्ध लढलो असतो तर पाकिस्तानला कायमचा धडा शिकवता आला असता. पण आंतरराष्ट्रीय दबावामुळे युद्धविराम करावा लागला. तोच दबाव करार घडवून आणण्यास कारणीभूत झाला.

सिमला येथे रशियन मुत्सद्यांची उपस्थिती, एक आठवड्यापूर्वी झालेली पॉडगॉर्नी व स्वर्णसिंग भेट व त्यापूर्वी स्वर्णसिंग व भूत्तो यांनी केलेल्या मॉस्कोवाऱ्या व नंतर भूत्तोंनी करार घडवून आणल्याबद्दल रशियाचे मानलेले खास आभार या साऱ्या गोष्टी जनसंघ नेते श्री. अटलविहारी वाजपेयी यांचा परकीय हस्तक्षेपाचा आरोप खरा असल्याचेच दर्शवितात.

आपल्या राज्यकर्त्यांना युद्धातील डावपेच समजत नाहीत हे ताश्कंदला हाजीपीर, छांब इ. ठाणी परत देऊन एकदा

# बाल संगोपन (खेड्यातील)

## डेन-टॉनिक आणि कॅल्सि-टोन

**(टीथिंग पिल्स)**
लहान मुलांचे दांत
सुखाने उगवण्यास मदत होते.
आईस काळजी रहात नाही.
**१५० गोळ्या**
**कि. २ रुपये**

**(टॉनिक पिल्स)**
लहान मुलांचे वाढीस
उपयोगी. मूल गुटगुटीत व
निरोगी राहते.
**१५० गोळ्या**
**कि. २ रुपये**

६ व्या महिन्यापासून वरील दोन्ही औषधे प्रत्येकी तीन तीन गोळ्या रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ पाण्याबरोबर द्याव्यात.
सर्वत्र मिळतात.

## मोफत

महाराष्ट्र आणि गुजराथमधील ५००च्या खालील वस्तीतील प्रत्येक गांवातील ६ महिन्याच्या खालील प्रत्येक मुलामुलीस वरील दोन्ही औषधे विनामूल्य द्यावयाची आहेत. तरी गावच्या सरपंचातर्फे कळवावे. म्हणजे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करू. प्रत्येक वेळी सहा नावे तरी असावीत.

## होमिओ लॅबोरेटरीज

१७८ राजा राममोहन रॉय मार्ग.
गिरगांव, मुंबई ४.

सिद्ध झालेले होतेच. ते या कराराने पुन: एकदा सिद्ध केले आहे.

## श्री. रविंद्र पवार

विद्यार्थी नेते

१९४७ पासून पंचवीस वर्षे भारताच्या नकाशाचे लचके तोडले जात आहेत हे तरुण पिढीला मंजूर नाही. तुम्हाला जमत नसेल तर बाजूला व्हा. आम्ही ते थोपवून पाकिस्तानची गुर्मी जिरवू. सिमला करार करणारांनी खुर्ची खाली करावी.

## डॉ. प्रभाकर रेगे

प्राचार्य

सिंधू पासून हिंदू हा शब्द आला हे खरेच आहे म्हणूनच पाकव्याप्त सिंध मधून आलेल्या निर्वासिताबद्दल आम्हाला बंधुभाव वाटतो. ते व बांगला देशचे निर्वासित यांना एकाच मापाने मोजता येणार नाही. घोर विश्वासघात असे वर्णन योग्य ठरावे अशीच प्रदेश परत देण्याविषयीची कलमे आहेत. काश्मीर हा प्रश्न म्हणून जिवंत ठेवण्यास व शेख अब्दुला सारख्या देशद्रोह्याचे पुनश्च महत्त्व वाढविणारा असा हा करार टोकरून लावला पाहिजे.

## मेजर रणजितसिंग

१९२७ च्या भारत-पाक युद्धात अवेळी शस्त्रसंधी पुकारल्यामुळे पश्चिम पाकमध्ये टिक्काखानच्या अधिपत्या-खालील ४५ हजार पाक सैनिकांना कोंडण्याची व युद्धकैदी बनविण्याची संधी गेली.

मेजर रणजितसिंग यांनी १९६५ च्या युद्धात पराक्रम गाजविलाच, पण १९७१ च्या युद्धातही 'राखीव' म्हणून ते सैन्यात दाखल झाले व आघाडीवर जाऊन लढले. कालच्या परिषदेत तेच अध्यक्षस्थानी होते.

ते म्हणाले की, 'चिकन नेक' काबीज करून छांब विभागात हल्ला करणाऱ्या टिक्काखानाच्या सेनेला दोन-तीन दिवसात वेढता आले असते. बांगला देशात पाकचे ९३००० युद्धकैदी ताब्यात आले, त्याचप्रमाणे पश्चिम पाकमध्येही ४५००० पाक सैनिकांना 'युद्धकैदी' करता आले असते तर त्याचा पाकवर फारच दारुण परिणाम झाला असता.

भारतीय सेना सर्व आघाड्यांवर डावपेचात्मक ठाणी घेण्याच्या पवित्र्यात असतानाच युद्धबंदी जाहीर झाली. जर आणखी दोन-तीन दिवस मिळाले असते तर पाकचा कणा पुरतेपणी मोडला असता.

भारताने जिंकलेला जवळ जवळ सर्वच्या सर्व मुलूख सिमला कराराने काहीही बदल्यात न मिळविता पाकला

परत करण्यात आला आहे. याचा सैन्यावर विपरीत परिणाम होईल. विख्यात पत्रकार दुर्गादास यांनी 'फ्रॉम कर्झन टू नेहरू' या आपल्या पुस्तकात अशी आठवण सांगितली आहे की, १९६५ च्या युद्धात जनरल चौधरींना सियालकोट जिंकण्याचा आग्रह केला असता त्यांनी असे उद्‌गार काढले की, 'मी या राजकारण्यांना चांगले ओळखतो ! जे परत दिले जाणार ते जिंकण्यासाठी माझे सैनिक मी बळी देऊ इच्छित नाही !' १९६५ साली ही भावना होती तर १९७१ च्या सिमला करारानंतर पुढील युद्धाच्या वेळी कोणती भावना राहील ?

मेजर रणजितसिंग म्हणाले, की सिमल्यात वाटाघाटी झाल्या तेव्हा पाकवर चार कारणांसाठी जबरदस्त दबाव होता. १ : पाच हजाराहून अधिक चौरस मैल प्रदेश पाकने गमावला होता. २ : पाकचे ९३००० युद्धकैदी भारताचे ताब्यात आहेत. याचाच अर्थ दर सहाशे पाकिस्तान्यांपैकी एकजण भारताच्या ताब्यात असून त्यामुळे पाक जनता भुत्तोपुढे तीव्र निदर्शने करीत होती. ३ : पाकची वीस लाख लोकसंख्या आपण व्यापलेल्या प्रदेशात आहे. ४ : पाकची डावपेचात्मक दृष्टीने महत्त्वाची ठाणी आमच्या ताब्यात आहेत.

सिमला करारानंतरची परिस्थिती कोणती आहे ? १ : भारताने पाकचा प्रदेश परत दिला आहे. २ : पाकचे युद्धकैदी आपल्या ताब्यात असले तरी तीन हजार युद्धकैदी सोडले असून त्यांनी युद्धकैद्यांना चांगली वागणूक मिळत असल्याची खात्री पाक जनतेला दिली आहे. ३ : पाक जनतेला वाटणाऱ्या काळजीचा दबाव हलका झाला आहे. शिवाय पाकमध्ये चार लाख बंगाली असून त्यांना पाक सरकारने 'ओलीस' ठेवले आहे. पाक युद्धकैद्यांना पाकपेक्षा चांगले खायला मिळत आहे. आणि चार लाख बंगाल्यांच्या बदल्यात त्यांची मुक्तता होणार आहे ! सिमला करार सर्वथा अनिष्ट आहे आणि दडपणाशिवाय तो केला असणे शक्यच नाही.

◻

# विरोध........

देशभर सिमला करार स्वागताच्या
नौबती झडत असताना
जनसंघाने आपला विरोध
असा व्यक्त केला–



सत्याग्रही महिला : सौ. सुमतीबाई सुकळीकर



डॉ. वसंतकुमार पंडित यांचे नेतत्वाखाली गद्रारोड येथे जाणाऱ्या सत्याग्रहींना निरोप

श्री. मोरे आणि पुणे पोलिस





राजभवनावर निघालेला
जनता मोर्चा
दि. १३ ऑगस्ट १९७२

# ढोल, नौबती आणि डावपेच

जगदीश गोडबोले

सिमला कराराच्या विरोधात जनसंघाने प्रसिद्ध केलेले 'सिमला करार : घोर विश्वासघात' हे पत्रक वाचल्यानंतर मनात आलेले विचार नमूद करत आहे.

'सिमला-करारा'ला जनसंघाचा प्रखर विरोध होईल हे अपेक्षितच होते, पण तो विरोध इतका उघड आणि वेगडी स्वरूपाचा असेल याची मात्र कल्पना नव्हती. एकतर जनसघासारखा राष्ट्रव्यापी पक्षही या कराराकडे पक्ष-निरपेक्ष दृष्टीने पाहू शकत नसावा किंवा बहुधा 'सिंधु-आसिंधु' या पलीकडे जनसघाच्या विचारांची व डावपेचांची मजल पोहोचत नसावी. पहिला प्रकार जर असेल तर तो दुर्दैवी आहे. पण दुसरा प्रकार जर असेल तर तो धोकादायकही ठरू शकेल.

पहिल्या प्रथम दोन गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. पहिली म्हणजे 'डाव्या' वा 'उजव्या' विचारांची झापड न लावल्यामुळे मी 'इंदिरा-भक्ती'त तल्लीन आणि विलीन झालो नाही, त्याचप्रमाणे केवळ इंदिरा वा कांग्रेस-द्वेषाने आंधळा झालो नाही. युद्धशास्त्र व राजनीतीशास्त्र याविषयी आवड असणारा साधा-सुधा माणूस या दृष्टीतून मी विचार मांडणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या शूर-वीर जवानांबद्दल मी योग्य तो आदर बाळगतो, पण त्यांच्याप्रमाणेच उन्हापावसात राबणाऱ्या शेतकरी-कामगारांनाही मी त्यांच्याच तोडीचे देशभक्त समजतो. त्यामुळे आपली सेनादले केवळ राष्ट्रभक्तीनेच प्रेरित होऊन काम करतात व त्यामुळे त्यांनी रक्त सांडून जिंकलेला 'इंच-इंच' प्रदेश सरधोपटपणे लढवावा अशी माझी भावना नाही, असो.

जनसंघाच्या पत्रकाकडे ओझरता दृष्टिक्षेप जरी टाकला तरी एक गोष्ट चटकन् नजरेत भरते ती ही, की हा सर्व 'सामान्य' लोकांच्या भावना भडकविण्यासाठी केलेला खटाटोप आहे. अर्थात् ज्या देशात ९०% मतदार 'सामान्य' आहेत तिथे या प्रयत्नात वावगे काहीच नाही, पण जनसंघाच्या मातब्बर नेत्यांच्या जाहीर भाषणांतून व मुलाखतीतूनही यापलीकडचे काही

आढळत नाही आणि इथेच सर्व गोंधळाला सुरुवात झाल्यासारखी वाटते. काँग्रेसचा पर्यायी पक्ष म्हणवणाऱ्या जनसंघाचा हा मानसिक गोंधळ आणि अज्ञान देशाच्या भविष्यकाळात विपरीत परिणाम करू शकेल.

प्रत्यक्ष युद्ध व त्याची पर्यायी राजकीय उद्दिष्टे या संबंधात जनसंघ साध्य आणि साधन यांची गफलत तर करत नाही ना? 'इंच–इंच लढवू' वा 'रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत युद्ध लढवू' या कल्पना कवितेत वा युद्धकाळात शोभतात, पण त्याने युद्धाचा अंतिम उद्देश साध्य होतो का याचा विचार निदान राष्ट्रव्यापी पक्षाच्या पुढाऱ्यांनी तरी करायला नको का? युद्धाकरताच युद्ध अशी तर जनसंघीय नेत्यांची भावना नाही ना?

क्लाडलेविल्सपासून ते चर्चिल-माओपर्यंत सर्वच जाणत्यांनी युद्धाची व्याख्या 'राजनीतीच्या डावपेचांचा एक पर्यायी आणि प्रभावी प्रकार' म्हणून केली असली तरी ते अवधान प्रत्यक्ष राखण्यात भल्याभल्यांचा तोल गेला आहे. खुद्द चर्चिलसाहेब व प्रे. रूझवेल्ट यांची या भुलभुलैयात फसगत झाली आहे. आज सगळे जग चर्चिलला एक महान् मुत्सद्दी व युद्धशास्त्राचा जाणकार म्हणून ओळखते व जनसंघानेही त्यांचे नाव उद्धृत केले आहे, म्हणून आपल्या विषयाच्या संदर्भात हा मुद्दा स्पष्ट करणे भाग आहे.

आपले हितसंबंध अबाधित राखण्यासाठी आणि अलम् दुनिया लोकशाहीसाठी निष्कंटक करण्यासाठी दोस्त राष्ट्रांनी दुसऱ्या महायुद्धाचे प्रचंड रणकंदन घडविले. पण त्या सर्वभक्षक युद्धानंतर दोस्त राष्ट्रांच्या वाटचाला उरली केवळ स्मशानातील राख आणि त्यातून उठलेले प्रबळ साम्यवादी रशियाचे भूत! दोस्त राष्ट्रांची अवस्था अक्षरशः आगीतून फुफाटयात पडल्यासारखी झाली आणि याचे कारण चर्चिल, रूझवेल्टसारख्या नेत्यांना चढलेली नाझी द्वेषाची धुंदी आणि युद्धाची बेहोषी. युद्धाच्या गदारोळात युद्ध करण्याचा मूळ हेतूच ते विसरले व पराभवाच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या स्वाभिमानी जर्मन राष्ट्रावर 'विनशर्त शरणागती'ची अट ते लादून बसले.

वर्णवर्चस्वाने झपाटलेला रक्तपिपासू हिटलर व त्याचा नाझी पक्ष यांचा नायनाट करणे हे जरी दोस्त राष्ट्रांचे पवित्र कर्तव्य होते, तरी रशियाच्या प्रबळ भूसत्तेला पायबंद घालू शकणाऱ्या युरोपातल्या एकुलत्या एक जर्मन राष्ट्राची धूळधाण करणे कितपत शहाणपणाचे होते? देशाचा सर्वस्वी विनाश व पराभव याची चाहूल लागलेल्या काही जर्मन सेनाधिकाऱ्यांनी हिटलरला पदच्युत करून राष्ट्र वाचविण्याचा घाट घातला व दोस्तराष्ट्रांकडे मदतीची याचना केली, पण उलट दोस्तांच्या 'मुत्सद्दी' नेत्यांनी संपूर्ण जर्मन राष्ट्राला 'विनशर्त शरणागतीच्या' सर्व विनाशक कोंडीत ढकलले. लज्जारक्षणाकरता वा अंतर्गत बदलाकरता एकही पळवाट

[ पृष्ठ ९९ वर ]

जबानी पहिली : भाग पाचवा

# मी नेताजींना बघितलंय् !

लेखक : नारायण सान्याल
अनुवाद : अशोक शहाणे



## चालू लेखमाला

पत्र ? इथ कुठलं पोस्टऑफिस न् कुठला पोस्टमन—तर पत्र !

कुतूहलानं म्हणाले—कुठाय् ? बघू !

खिशातनं तिनं कागदाचा एक चतकोर बाहेर काढला. हं, म्हंजे चिठ्ठी ! मी चिठ्ठी उलगडली. सगळं उर्दू ! मला कुठं समजत होतं.

—कुणी दिली ही चिठ्ठी ?

—तूच अंदाज कर ना !

आलं लक्षात.

—नाझिर आला होता वाटतं ?

—आला होता म्हंजे ? तीन तीनदा फेऱ्या मारल्या बिचाऱ्यानं ! शेवटी ही चिठ्ठी देऊन गेला.

—पण ही तर उर्दूत लिहिलेली आहे. ती कशी वाचणार ?

—अम्माजींच्याकडे घेऊन जा ना. किंवा कियानीजींच्याकडे !

लछमी आपली सांगून मोकळी झाली. पण म्हणून खरंच जाता थोडंच येतंय्. वेड्यामारखं काहीतरी लिहिलं असलं म्हंजे ! त्याचा काय भरोसा ! शेवटी आपल्यालाच शरमिंदं व्हायला लागायचं, नाही का ? पण एवढ्यात सगळ्याजणी माझ्याभोवती गोळा झालेल्या. अन् गालातल्यागालात हसतायत परत. लछमी, नमिताई, भावीजी, यमुनाबाई—सगळ्याच. म्हंजे हे काय आणखीन् ? ह्या सगळ्या हसतायत काय म्हणून ?

शेवटी यमुनानंच रहस्य फोडलं. त्यांना पत्रातला मजकूर माहित झाला होता. राबेयाकडन त्यांनी वाचून घेतली होती चिठ्ठी. अन् ते पत्र नव्हतंच मुळी. एक उर्दू बयेन् होता. म्हंजे दोन ओळींची कविता !

रागानं माझी कानशिलं गरम झाली. माझं पत्र ते. ते मला वाचता येत नाहीय्. अन् जगातले लोक मात्र ते वाचून हसतायत ! सरतेशेवटी राबेया खातूनला दया आली माझी. कागद माझ्या हातातनं घेऊन तिनं हावभावानिशी त्या दोन ओळी वाचून दाखवल्या.

आये थे तेरी दीद को बे-दीद हो चले
चौकाठ तेरी चूम के शहीद बन चले ।

वेडा आहे अगदी !—मी म्हणाले.

भावीजी हसून म्हणाली—तो तर वेडा आहेच. पण तुलापण वेड लावलंय् ना ! तू असं कर. तू जाऊन ये एकदा कर्नल चतर्जींच्या छावणीवर. अन् थंड करून ये तुझ्याकरता शहीद झालेल्या ह्या प्राण्याला.

—अडलंय् माझं खेटर ! मी आता

चांगली ताणून देणाराय् !

असं म्हणून मी आडवी झाले. पण तें निव्वळ त्यांना दाखवण्याकरता. खरं तर माझं खेटर अडलंच होतं की ! माहीतर तीनतीनदा कशाला आला असता तो ! पोरी आपापल्या कामाला गेलेल्या बघितल्यावर मी गुपचुप उठले. पाय न वाजवता कर्नल चतर्जींच्या छावणीकडे गेले. सबंध अंतर चालावं लागलंच नाही. नाझिर एका झुडपाच्या आड बसला होता. वहीत काहीतरी लिहीत होता. मला बघितल्यावर त्याच्या चेहऱ्यावर हंसू उमटलं.

—काय लिहितोय्स ? डायरी ?

—हॅत् ! कविता लिहीत होतो. वाचू ?

—चल ! मला नाही ऐकायची तुझी कविता. ही काय कविता ऐकायची वेळ आहे ? तू माझ्याकडे कशाला आला होतास ते सांग.

पण माझ्या शेवटच्या प्रश्नाकडे त्यानं लक्षच दिलं नाही. पहिलाच प्रश्न त्याच्या डोक्यात घुसला होता. म्हणाला—कविता ऐकायला कसली आलीय् वेळ-अवेळ ! आयुष्यातल्या कुठल्याही ठिकाणी जायला फक्त कवितेलाच तर तेवढी परवानगी असते !

तरी मी कसली कबूल होते !

म्हणाले—काही परवानगी नसते. हा काय बगिचा आहे का ? हे रणांगण आहे. इथं आंसवं ढाळायची परवानगी आहे, रक्त सांडायची परवानगी आहे. पण तुझ्या त्या चंद्र फुलं-दारू वगैरेवाल्या कवितेला मुळीसुद्धा परवानगी नाही !

काय गोड हंसला नाझिर.

म्हणाला—थोडी चुकलीस की ग तू. कबूल, हे लढाईचं मैदान आहे. इथं आंसू न् कलेजा फाटून आलेलं खून ह्यांनाच पहिला हक्क आहे—कबूल ! पण म्हणून काही आपली जवानी अन् आपली मोहब्बत काही खोटी ठरत नाही— एवढं तरी कबूल करशील का नाही तू ? आंसू न् खून आपला पाठलाग करतायत आपला टँक्स न् आर्मर्ड वाहिनी सारखा. तूर्त जवानी अन् मोहब्बतीची हार झाल्याय्. पीछेहाट चालल्याय् त्यांची. पण त्यांनी कुठं ही हार अखेरची मानलीय् ? मानलीय् का आरती ?

आता काय उत्तर देऊ मी ? उपमानं अन् उपमेय ह्यांची एक एवढी लांबलचक सिमिली आणून उभी केलीय् नाझिरनं, की जरा विचार करावासा वाटतोय् मला. कसली मिल्टनसारखी सिमिली आणलीन् !

पण तो त्याच दमात बोलतच चाललाय्—अन् हे पण चूक आहे तुझं. रोषणाई, गुलबगिचे अन् शराब हीच काही मोहब्बतीची सामग्री नाही. आसू म्हंजेच माझ्या मोहब्बतीचा नैवेद्य आहे. खून म्हंजे माझ्या जवानीचं अर्घ्य आहे. ह्या सगळ्या गोष्टी आता एकवटून गेल्यायत आरती—हे सगळं मिळूनच तर माझी कहाणी !

माझा हात ओढून घेऊन आपला हात त्याच्यावरनं अलगद फिरवत-फिरवत दर्दभरी आवाजात तो म्हणाला—

दो लफ्जों में पुशिदा
एक मेरी कहानी है

एक लफ्ज मोहब्बत है ।
एक लफ्ज जवानी है ।
आँसू को मेरे ले कर
दामन पे जरा जाँचो
जम जाये तो खून है
बह जाये तो पानी है ।
वेडा! पार वेडा !

संध्याकाळचा सूर्य दमूनभागून निरोप घेत होता पश्चिमेच्या क्षितिजावर. ब्रह्मदेशातल्या 'वा' गावाच्या कडेवर हार झालेल्या सैनिकांच्या तुकडीतली आम्ही दोघं. आम्ही दोघांनी मुक्तिमंत्राची दीक्षा घेतली होती. अन् हा मुक्तिमंत्र म्हंजे मृत्युमंत्र होता. म्हंजे आम्ही जीव आधीच ओवाळून टाकले होते. पण तरी जीवन कुठं नाकबूल करता येत होतं? कुठं म्हणता येत होतं, की ह्या जीवनात प्रेम नाही म्हणून? आमच्या जीवनात तारुण्य कधी आलंच नाही म्हणून?

माझ्या तोंडून शब्द फुटत नव्हता खरंतर. तरी तसंच मी म्हणाले—माझ्याकडे कशाकरता आला होतास?

आणि हंसला तो. म्हणाला—हा वयेत् ऐकवायला.

—मग मी जाऊ आता?

—जातेस? पण माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस ते तू!

—पण मी कुठं कवि आहे?

—कवि तर मीदेखील नाही आरती! हा वयेत् काही माझा नाही. माझ्यासारख्याच एक हतभाग्या कवीचा आहे. अकबर इलाहाबादी. कदाचित् तुझ्यासारख्याच कुण्या मुलीवर प्रेम केलं असेल त्या बिचाऱ्यान!

मी मलूल हंसले.

नाझिर परत मुद्द्याच्या गोष्टीवर आला. म्हणाला—मला वाटत होतं, की ब्रह्मदेश ओलांडून मणिपूरला गेल्यावर मग तुला आपली बायको करून घ्यावं. स्वतंत्र भारतात. पण ते तर काही तूर्त होण्याजोगं दिसत नाही—

मी त्याला मधेच अडवलं.—तू आतापास्नंच एवढा निराश का होतोयस नाझिर? एक-ना-एक दिवस आपण दोघं नक्कीच स्वतंत्र भारतात जाऊन पोचू.

तो हंसत राह्यला. म्हणाला—मला शंका आहे.

माझ्या कपाळाला आठ्या पडल्या. म्हणाले—नेताजींच्या शब्दावर विश्वास नाही तुझा?

—तसं नाही ग. तुझाच काहीतरी गैरसमज झालाय्. आपण जिवंत भारतात पोचू असं काहीच आश्वासन नेताजींनी दिलेलं नाही. आपल्या प्रेतावर स्वतंत्र भारतवर्षाची इमारत उभी राहील असं ते म्हणालेय्त. कदाचित् आपण दोघंही जिवंत राहू तोपर्यंत. पांगळा नाझिर नु विकलांग आरती स्वतंत्र भारतात पोचतीलही कदाचित्.

—मग?

—पण असं का म्हणून वाया जाऊ द्यायचं आपलं आयुष्य? का म्हणून नाकबूल करायचं आपलं तारुण्य?

—त्यात काय फायदा आहे नाझिर? ह्या छावणीत तर काही विवाहित आयुष्य जगता यायचं नाही!

—पण म्हणून काय झालं ? स्वतंत्र भारतात तुला छातीशी कवटाळायला कसलीच अडचण असणार नाही. इथं आझाद हिंद सेनेचा सैनिक ह्या नात्यानं तुमच्या राणीवाहिनीची प्रत्येक सैनिका ही माझी बहीण लागते. पण म्हणून हचा एकांतातदेखील मी तुला—

नेमका हृयाच क्षणी आकाशातल्या सैतानांच्या कळपाचा आवाज कानावर आला. शत्रूची विमानं परत आल्यायत. नाझिर तत्काळ उठून उभा राहचला. प्रेमिकाचा सैनिक बनला. उर्दू कवि कुठल्याकुठं हरवून गेला ऑल-राउंड ॲथलेटमध्ये. आम्ही ज्या बारक्याशा उंचवटचाच्या कडेला बसलो होतो, त्याच्याजवळच एक उथळसा खड्डा होता. नाझिरनं मला सावरून उठायचीही फुरसत दिली नाही. मला बळकट पकडून त्यानं माझ्यासकट उडी घेतली त्या खड्डचात. खड्डा दोनेक हात खोल होता. दोघांना जागा व्हावी इतका प्रशस्त पण नव्हता. कवटाळून पाय दुमडून नाझिर पडून राहचला त्या छोटचाशा खड्डचात. डोक्यावर एक विमान घिरटचा घालत होतं. दुर्बिणीच्या काचेतनं वैमानिकाला नक्कीच दिसले असतील लष्करी पोशाख चढवलेले दोघे जीव. फिरूनफिरून परत येऊन खड्डचाच्या दिशेनं मशीनगन चालवत राहचला तो. आमच्या कानालगतनं वारंवार मृत्यूची झळ गेली. पण खड्डचाच्या आत होतो म्हणून एकपण गोळी लागली नाही. खड्डचाच्या शेजारच्या प्रचंड पिंकाडो झाडानं वाचवलं आम्हाला. ते तिथं असल्यामुळं विमानाला जास्ती खाली येता आलं नाही.

आणखी तीनचार विमानं आमच्या छावणीच्या आसपास फिरत होती. बी—२९. ती इनसेंड्रिअरी बाँब टाकत होती. स्फोटाच्या आवाजानं जमीन कापत होती. आमच्या मागनं येणारी तुकडीच इथं असेल असा त्यांचा अंदाज होता बहुतेक. अन् आमच्याजवळ नाही ॲक-ॲक गन की विमान. त्याच्यामुळं त्यांच्या हचा ध्वंसलीलेत अजिबात व्यत्यय आला नाही.

सगळं शांत झालं तेव्हा जवळजवळ अर्धा तास लोटला होता, सगळीकडे स्मशानासारखी शांतता. आम्ही दोघंजण खड्डचातनं बाहेर आलो. कपडचांवरची धूळ झटकता–झटकता हंसतहंसत मी म्हणाले—आत्ताच तू म्हणत होतास, की राणीवाहिनीतली प्रत्येकजण तुला बहिणीसारखी आहे म्हणून. कुणा मुलीला असं छातीशी कवटाळून—

—छट् ! तुझ्या जागी दुसरी कुणी असती तरी मी हेच केलं असतं. ही मिठी प्रेमिकाची नव्हती, ती सैनिकाची होती.

ते मला माहीतच होतं. तरी मला वाटत होतं, की नाझिरनं जरासं खोटं बोलावं. पण तो काही खोटं बोललाच नाही.

मी हंसून म्हणाले—सैनिकाची का म्हणतोस नाझिर? कॉम्रेडची तरी म्हण ना ! निदान ह्या क्षणिक अनुभवाला तरी किंचित् रोमांचाची आठवण राहू दे.

नाझिरपण माझ्यासारखंच मलूल हंसला. म्हणाला—ठीक आहे. तुझ्या

मनासारखं होऊ दे. ती मिठी सोल्जरची नव्हती, कॉम्रेडची होती.

आणखी काहीच न बोलता आम्ही आपापल्या जागी गेलो. मी देवळात येऊन पहाते तर काय—बाँबच्या स्फोटामुळं बहुतेकींनाच कमीजास्त जखमा झाल्या होत्या. पाचेक जणींना तर फारच लागलं होतं. मशीनगनची एक गोळी अम्माजींच्या डाव्या खांद्यात घुसली होती. मेजर मेननंनी तातडीनं गोळी शरीरातनं काढून टाकली होती. पण भयंकर रक्त गेल्यामुळं अम्माजी निपचित् पडून होत्या. सगळ्यांची शुश्रुषा करण्यात बराच वेळ गेला.

आम्ही रंगूनहून निघालो तेव्हा आमच्याजवळ पंधरा ट्रक होते. त्यापैकी आता फक्त सहाच तेवढे शिल्लक होते. बाकीचे नदीच्या अलीकडेच पेट्रोल ओतून आम्हीच जाळून टाकले होते. जखमी मंडळींना ह्या सहा ट्रकमध्ये घातलं. नेताजींची गाडी होती. पण त्यांनी गाडीत बसायला नकार दिला. रात्रीचा अंधार पडल्यावर आम्ही ‘वा’च्या दिशेनं रवाना झालो

त्याच रात्री आमची टोळी फुटली. इलाजच नव्हता काही. सहा ट्रक जखमी मंडळींना घेऊन जात होते. ‘वा’ शहर मागं टाकून रात्रीतल्या-रात्रीच ते सित्तांग नदीपाशी पोचणार होते. पायी चालणारी मंडळी इतकं अंतर तोडणं अशक्यच होतं. ती दिवसाउजेडी दुसरीकडे कुठंतरी थांबणार होती. त्यांनी नोनखास नावाच्या गावी थांबायचं असं ठरलं. जखमी मंडळींना घेऊन जाणाऱ्यांच्या टोळीत जनरल भोसले, चतर्जी न् अय्यरसाहेब जात होते. पायी जाणाऱ्यांच्या बरोबर जनरल मालिक, मेजर स्वामी, मेजर मेनन, जमन कियानी न् स्वत: नेताजी.

नाझिर पडला चतर्जींचा एडिकाँग. त्यामुळं त्याला तर पहिल्या टोळीबरोबर म्हंजे ट्रकमधनंच जावं लागलं. निघायच्या आधी एक क्षणभरच तो भेटायला आला होता. बोलायइतकी फुरसतच नव्हती. त्याचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन मी म्हणाले—मी राजी आहे नाझिर! मौलमीनला पोचल्याबरोवर!

त्याचा चेहरा उजळून निघाला. आणखी चार माणसं तिथं नसती तर त्यानं मला जवळ घेऊन माझं चुंबन घेतलं असतं बहुतेक. त्याचा चेहरा बघून तरी मला तसंच वाटलं होतं. पण त्यानं माझा हात किंचित् दाबला अन् लगेच तो धावत निघूनपण गेला. काय हरणासारखा पळतो नाझिर!

आपल्याला पायीपायीच जावं लागेल असं मला वाटत होतं. कारण मी काही जखमी नव्हते की अशक्त नव्हते. पण अगदी शेवटच्या क्षणी लेफ्टनंट थीबर्स मला म्हणाल्या—आरती, तू गाडीनंच जा. अम्माजींच्या शुश्रुषेची जिम्मेदारी तुझी.

किट-बॅग न् रायफल उचलून लगेच मी गाडीकडे निघाले. त्यांनी मागनं परत हाक मारली.—आरती, हे बघ!

मी जागीच थांबले. मागं वळले.

—अम्माजींच्याबद्दलचं लक्षात ठेव. सावध रहा.

आता मात्र माझी सहनशक्ती संपली.

—एक प्रश्न विचारू का मी ?

कोरडेपणानं थीबर्स म्हणाल्या—नाही ? लष्करी शिस्तीत ' व्हाय 'ला काहीच स्थान नाही.

मी सॅल्यूट ठोकला. तोच त्यांच्या बोलण्यावरचा माझा एकमात्र जबाब !

लॉरीत काही जखमी मंडळींना झोपवलं होते. नर्स म्हणून आलेल्या आम्ही तिघीजणी कशातरी पाय दुमडून बसलो होतो. वेली न् पाल्यापाचोळ्यानं गाडी झाकून घेतली होती. एवढ्यातच अम्माजींना प्रचंड ताप चढला होता. त्या निपचित् पडून होत्या. गाड्या निघाल्या.

थोड्याच वेळानं वाटलं, अम्मजी काहीतरी बोलतायत्. म्हणून मी खाली वाकून त्यांना हाक मारली. काही उत्तर नाही. म्हंजे तापात बरळतायत्. कान टवकारूनपण काही लागलं नाही त्याचं बोलणं. आपल्याला न कळणाऱ्या भाषेत बोलतायत् असं वाटलं. जर्मन असेल कदाचित्. तापात माणसं असं बोलतात ? म्हंजे आपली मातृभाषा सोडून दुसऱ्याच भाषेत ? मला त्यांच्या बोलण्यातले फक्त दोनतीन शब्दच तेवढे लागले—नेताजी, इंडिया, क्विजलिंग वगैरे. बाकी फाडफाड जर्मन किंवा फ्रेंच.

त्यातच पाऊस आला. ट्रक उघडा. आम्ही पार भिजून गेलो. अम्माजीपण. आधीच त्यांच्या अंगात एकशेतीन ताप. त्यात हे भिजणं.

मध्यरात्र उलटून गेलेली. काहीतरी आवाज झाला न् अचानक गाडी थांबली. ड्रायव्हर सरदारजी होता. त्यानं ट्रक रस्त्याच्या कडेला घेतला. आता पाऊसपण थांबला होता. झाडावरनं मधनंच दोनचार थेंब पडत होते तेवढेच. सरदारजीनं बॉनेट उघडून बॅटरीच्या उजेडात ठाकठुक करायला सुरुवात केली. बाजूनं जपानी ट्रक चक्क आमच्या अंगावरनं पुढं जात होते. पण आम्हाला काय झालंय् ते पहायलाही ते तयार नव्हते. जवळजवळ तासेकभर खटपट करून घामाघूम झालेल्या सरदारजीनं सरतेशेवटी सांगितलं ते असं, की एक महत्त्वाचा पार्ट मोडलाय्. गाडी काही आता चालायची नाही.

सत्यानाश ! इतके रोगी न् आम्ही मुली ! समुद्राच्या मध्यभागी असल्यासारखं वाटायला लागलं. अर्थात् भगवान सहाय्यकारी होताच. म्हंजे अगदी अक्षरशः ! थोड्याच वेळात आमच्याच टोळक्यापैकी आणखी एक ट्रक येऊन थडकला. त्यात मेजर बी. सहाय होते. म्हंजे भगवान सहाय ! सगळं कळल्यावर म्हणाले—इलाज नाही. दोन्ही गाड्यांतल्या जखमी मंडळींना माझ्या ट्रकमधे ठेवा. अन् नर्स एकच पुरे. बाकी आपण सगळे पायी जाऊ या.

हुकूम मिळाल्या-मिळाल्या आम्ही त्याची अंमलबजावणी केली. सगळी जखमी मंडळी एकाच गाडीत कोंबली. म्हंजे आता गाडी सुरू होऊन धक्के बसायला लागले, की एक दुसऱ्याच्या अंगावरच पडणार. अन् तेदेखील जखमेवर पण. पण दुसरा इलाज काय होता ! मेजर सहायांच्या हुकूमाप्रमाणं

आम्ही पायीपायी निघालो अंधारातनं.

आम्ही सित्तांग नदीच्या तीराशी येऊन पोचलो तेव्हा रात्र संपत आली होती. काही करून नदी लगेच ओलांडता आली तर बरंचसं निश्चित होता येईल. नदीवरचा पूल मोडून पडलाय्. म्हंजे शत्रूच्या सैन्याला सहजासहजी पलीकडे जाता यायचं नाही. शिवाय नदीच्या काठालाच आझाद हिंद सेनेचं विमान-विरोधी तोफांचं ठाणं आहे. म्हंजे शत्रूच्या विमानांना इथं बिनविरोध वाट्टेल तो धुमाकूळ घालता यायचा नाही. इथं पोचल्यामुळंदेखील आम्ही खूप निश्चित झालो होतो.

तेव्हा कुणाला वाटलं होतं, की ह्या सित्तांग नदीच्या काठावरच लागोपाठ तीन अपघातांना तोंड द्यावं लागणाराय् आम्हाला? विमानविरोधी तोफांच्या तुकडीतला एक जवान वाट दाखवत आम्हांला तीनेक मैलांवर असलेल्या गावाकडे घेऊन गेला. जनरल भोसल्यांच्या नेतृत्वाखाली राणी-वाहिनीच्या थोडक्या मुलींनी दिवसभर इथंच काढायचा असं ठरलं. अय्यरसाहेब नदीच्या काठी परत गेले. नेताजींच्या छावणीत. नेताजीपण नुकतेच तिथं पोचले होते असं कळलं. गाडी नादुरुस्त झाल्यामुळं आम्हाला दोनेक तास रखडावं लागलं होतं, तेवढ्यात ते पायी-पायीच तिथं पोचले होते.

आमच्या छावणीत गेले. तर सगळ्यांचे चेहरे गंभीर. सगळ्यांचं बोलणं खालच्या आवाजात. कुजबुजत. म्हंजे काहीतरी वाईट गोष्ट घडल्याय् कचित आधी. कुणी गेल्याची तार घरी आली की जसं होतं ना, तसं एकंदर वातावरण.

थोड्या वेळानं भास्करनची गाठ पडली. भास्करन् म्हंजे नेताजींचा कॉन्फिडेन्शिअल स्टेनो. केरळचा इसम. नेताजींनी सिंगापूरमध्ये पहिलं पाऊल ठेवल्यापास्नं तो कायम त्यांच्याबरोबरच आहे. आम्ही त्याला भासिदादा म्हणायचो. मी त्याला विचारलं—काय झालं रे? सगळे इतके गंभीर आहेत ते?

कानात सांगितल्यासारखं भास्करननं थोडक्यात काय ते सांगितलं. घडलेला प्रकार निव्वळ करूणच नव्हता. तो हृदयविदारक होता.

काल रात्री प्रचंड गैरसमजुतीमुळं एक जपानी ऑफिसर आमच्या एका सैनिकाच्या हातनं मारला गेला होता. आमच्या सैनिकाच्या संगिनीला तो बळी पडला होता. नेताजींचं त्याच्यावर फार प्रेम होतं. भारताच्या ह्या स्वातंत्र्य-लढ्यात तो आम्हाला जिवापाड मदत करत आला होता.

अर्थात अपघात तो अपघातच! निव्वळ गैरसमजुतीचा प्रकार! आझाद हिंद सेनेचा संत्रीपण फार दिवसांपास्नं सरसेनापतींच्या सुरक्षावाहिनीत काम करत आला होता. उत्तर-बिहारमधला इसम. विश्वंभरदास पांडे म्हणून. अंधाऱ्या रात्री कुणीतरी नेताजींच्या छावणीकडे येतोय् असं पाहून त्यानं प्रश्न केला होता—हुकूमदार?

ह्या Who comes there म्हणतोय् हे लक्षातच आलं नाही त्या जपानी


छोट्या नायकाला प्रेरणा देणारी साठे माल्टेक्स बिस्किटे
पहिल्या पासूनच मी लढाऊ वृत्तीचा.
लुटुपुटीची बंदूक घेऊन फिरण्याची व खेळण्याची
भारी हौस. मध्येच भूक लागली तर खायला
माल्टेक्स बिस्किटे! माल्टेक्स बिस्किटे माझी
तब्येत ही अशी तुस्त राखतात. कारण त्यातील
माल्ट व पौष्टिक घटक पूर्णपणे उत्साह
वाढविणारी आहेत.
SATHE Maltex BISCUITS
heros' SBC-

ऑफिसरच्या. कदाचित त्याला वाटलं असेल, संत्री दुसऱ्या कुणालातरी काही-तरी हुकूम देतोय्. काही न बोलता तो छावणीकडे येतच राह्यला. तत्काळ विश्वंभर संगीन उंचावून धावला होता. जपानी अधिकारी जागच्याजागी मरण पावला.

हा अपघात जपानी मंत्री इसोडांच्या मनाला फार लागून राह्यला होता. नेताजी किती भांबावून गेले होते, त्यांना किती वाईट वाटत होतं—ते शब्दात सांगणं अशक्यच आहे. रात्रभर पायपीट करून, दमूनभागून, उपाशी-तापाशी, जाग्रणानं गळून जाऊन, मुक्कामावर पोचून ते खाली बसतायत् एवढ्यातच हा प्रकार घडून गेला होता. त्यांच्याच दारात त्यांचा मित्र संगिनीनं विद्ध झाला होता! सगळे दगडासारखे स्तब्ध होऊन गेले होते. मेजर मेननी त्या जपानी अधिकाऱ्याला तपासलं. अन् उठून उभं रहाता-रहाता ते तोंडातल्या-तोंडातच म्हणाले—डेड!

विश्वंभर तसाच उभा होता. रक्ताळ-लेली संगीन हातात घेऊन. आपली चूक एव्हाना त्याला चांगलीच उमगली होती. अन् तो अडाण्यासारखा नेताजींच्याकडे बघत होता.

कुणीतरी विचारलं—विश्वंभरला गिरफ्तार करायचं का?

नेताजींनी जमन कियांनींच्याकडे बोट केलं—ह्या मोहिमेची सगळी सूत्रं ह्यांच्या हातात आहेत!

नेताजी जायला वळत होते. परत फिरून म्हणाले—त्याला डिसार्म करा.

एकजण पुढं झाला. त्यानं विश्वंभरची रायफल न् पिस्तूल काढून घेतलं. विश्वं-भरला अटक झाली.

दोन्ही हातांनी तोंड झाकून विश्वंभर स्फुंदून-स्फुंदून रडायला लागला.

नेताजी खुर्चीवर जाऊन बसले. ध्यानस्थ झाल्यासारखे. मग एक अक्ष-रही बोलले नाहीत. कुणाशी. हातपाय पसरून झोपलेही नाहीत.

सकाळ झाली. आमची एकपण लॉरी ह्या तीराला आली नाही अशी बातमी मिळाली. नदी पार करून फक्त नेता-जींची गाडीच तेवढी इकडे आली होती. 'वा' नदीच्या तीरावर खुद्द नेताजींनी उभं राहून आमच्या गाड्या एकामागो-माग एक पार केल्या होत्या. आता ते स्तब्ध बसून राह्यले एकटे. त्याचं हृदय जणु जळत होतं! अन् ते दगड बनून गेले होते!

दोनेक तास असे ध्यानस्थ मौनी गेल्यावर अचानक ते उठून बाहेर आले खोलीतनं. स्वत:शीच बोलल्यासारखं म्हणाले — चला ह्यांची काही खायची सोय करा आता!

नेताजी परत माणसात आलेले बघून आम्ही सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. आमच्या संगिनीला जपानी अधिकारी बळी पडणं हा भलताच अपघात होता. पण लढाईच्या धुमश्चक्रीत कुणी मेल्याबद्दल सुस्कारा सोडण्याइतकी तरी फुरसत मिळते कुठं?

आठ वाजायला आले होते. आम्ही चहाची व्यवस्था करण्यात गुंतलो होतो. ट्रकमधनं आणलेल्या जखमी मंडळींना

छोटया-छोटया शेड्समधे ठेवलं होतं. एका मोकळया मैदानात चारी दिशांना ह्या शेड्स होत्या. सगळयांची तोंडं मैदानाकडे. नेताजी परत कामाला लागले होते. नेताजींचे डॉक्टर मेजर मेनन, कर्नल चतर्जींचा ए. डी. सी. लेफ्टनंट नाझीर अहमद ह्यांना बरोबर घेऊन नेताजी रोग्याची विचारपूस करत होते. मेजर मेनन एकेकाला तपासत होते. बरोबर नर्स होतीच. मग त्यांचं बँडेज बदलणं, औषध देणं, पथ्य काय ते सांगणं — असा कार्यक्रम होता. नाझीर काही ह्या कामाला हातभार लावत नव्हता. तो फक्त अंगरक्षका-सारखा नेताजींच्याबरोबर फिरत होता. आम्ही चहा बनवत होतो तिथनं ते शंभरेक यार्डावरपण नसतील. स्पष्ट दिसत होतं सगळं.

समाचार घेणं संपलं. न् ते तिघेजण मैदान ओलांडून येत होते. मैदान कसलं, चौकच की तो. जरासा मोठ्ठा एवढंच. त्यांनी जवळपास निम्मं अंतर काटलं असेल एवढयात — काही ध्यानीमनी नसताना — आकाश छेदून शत्रूची दोन बेछूट फाइटर विमानं आली. आम्ही तरी पक्क्या इमारतीच्या आड होतो. पण ते तिघंही अगदी खुल्या मैदानात मधोमध होते. कर्नल चतर्जी आमच्या-इथनंच ओरडले — टेक शेल्टर ! प्लेन्स !

नर्स बरीच मागं होती. ती मागच्या-मागं एका शेडमधे घुसली.

ह्या तिघांत सर्वात पुढं होते मेजर मेनन. प्राणपणानं त्यांनी आमच्या इमारतीच्या रोखानं धूम ठोकली. मध्ये नेताजी. तेपण पळतायत. पण अठ्ठेचाळीस वयाचा हा प्रौढ माणूस. रात्रभर पायपीट केलेली. परत पायात टॉपबूट. ते कितीसे जोरात पळणार ? सगळयात मागं लेफ्टनंट नाझिर अहमद. काळविटासारखा चपळ तरुण सैनिक. कॉलेजमध्ये हंड्रेड-यार्डसला लागोपाठ तीनदा चँपियन झालेला. सैन्याच्या हॉकी-टीममधला जबरदस्त सेंटर-फॉरवर्ड ! एवढास्सा रस्ता काटायला नेताजींना जेवढा वेळ लागेल तेवढयात त्यानं सहज सबंध मैदान दोनदा पालथं घातलं असतं. अन् तरी मी स्वतःच्या डोळयांनी पाह्यलं — ढांगा टाकत तो नेताजींच्या शेजारनंच येतोय्. नेताजी पळतायत. पण नाझिर चालतोय्. त्यांचा अंगरक्षक तो. तो काही त्यांना मागं टाकून पुढं येत नाहीय्. अत्यंत निष्ठुर क्षण होते ते.

पहिलं प्लेन खाली आलं. नेताजी चक्क धापा टाकत होते. नाझिरनं एकदा वरती बघितलं. भिवयांच्यावर हात ठेवून. मशिनगन चालवत-चालवत विमान मैदानाच्या बाहेर गेलं. नेताजी न् नाझिरपास्नं दहा-पंधरा इंचांवर मातीत गोळया घुसल्या. सरळ रेषेत धूळ उडाली. नेताजी आमच्या वरांड्या-पास्नं आता अंदाजे तीसेक फुटांवर होते. म्हंजे अजून दहा-एक पावलं. जास्तीतजास्त.

एवढयात दुसऱ्या विमानानं ड्राइव मारली. बहिरी ससाण्यासारखं ते खाली आलं एका सरळ रेषेत. मशिनगनचा

फटाफट आवाज येतोय् त्या राक्षसी यंत्रातनं. जवळ, आणखी जवळ आलं ते. गोळयांचा भडिमार करून परत निघून गेलं वर आकाशात. त्याच्या क्षणभरच आधी नेताजींनी शेवटचं पाऊल उचललं अन् ते आमच्या वरांडयांत आले. नाझिरला जमलं नाही. त्याचं रक्तबंबाळ शरीर पायरीशीच कोसळलं.

कर्नल चतर्जी न् नेताजी धावतच गेले त्याच्याकडे. त्यांनी उचलून वर आणलं ते रक्तानं न्हालेलं शरीर.

नाझिरच्या अंगाची डावी बाजू रक्तानं चिंब झाली होती.

डाव्या गुडघ्यात गोळी लागली होती.

माझ्या डोळयादेखतच घडला सारा प्रसंग—अन् मी दगडाच्या पुतळीसारखी बसून राह्यले नुसती. नाझिरला शुद्ध नव्हती. तत्काळ मेजर मेनन न् कर्नल चतर्जी जखम तपासायला लागले. गोळी काढून टाकायला पाह्यजे मांडितनं.

सबंध दिवस काय करत कसा गेला काही कळलं नाही. संध्याकाळच्या सुमाराला नाझिर शुद्धीवर आला. पायात असह्य कळा मारत होत्या. बुलेट बाहेर काढता आलं नव्हतं. न् इस्पितळात गेल्याखेरीज काढता येणारपण नव्हतं. इस्पितळ सगळचात जवळ म्हंजे मौलमीनला. तिकडेच चाललोय् आम्ही. इस्पितळात पोचेपर्यंत नाझिर जिवंत राहतोय् का नाही कोण जाणे.

तो शुद्धीवर आल्यावर मी म्हणाले— फार दुखतंय् ?

दातावर दात दाबून तो म्हणाला— हो. पाय कापून टाकला का काय ग ?

—नाही नाही. पाय ठीकच आहे. बरा होऊन जाईल.

बेहद्द कळा मारत असतानापण नाझिर हसला. म्हणाला— कालच म्हणत होतो ना मी तुला, नाझिर पांगळा होऊन जाईल म्हणून ?

मी त्याच्या तोंडावर हात ठेवला. म्हणाले— बोलायला बंदी आहे डॉक्टरांची. काही होत नाही तुझ्या पायाला.

त्याला असं म्हणाले खरी. पण मला पक्कं ठाऊक आहे, की हे काही खरं नाही. इस्पितळात पोचल्यावर ह्याचा पाय गुडघ्यापास्नं कापून टाकावा लागेल असं मेजर मेनन म्हणत होते. म्हंजे नाझिर अहमद जगला-वाचला तरी सैन्याच्या हॉकी-टीमचा सेंटर-फॉरवर्ड काही जगत नाही हे पक्कं.

संध्याकाळचा अंधार दाटून आला. म्हंजे परत प्रवासाला सुरुवात करायला हवी. सित्तांग नदी पार करून आमची एकपण लॉरी आलेली नव्हती. सगळयाच गाडया एकेक वाटेत गळून पडल्या होत्या. जपान सरकारनं नेताजींना स्वतःच्या वापरासाठी म्हणून दिलेली गाडीच तेवढी शिल्लक आहे.

—जखमी मंडळींना माझ्या गाडीत घाला. आपण सगळेच पायी जाऊ या.

नेताजी एकाच दमात म्हणाले. पण त्याचा अर्थ लक्षात यायला मात्र आम्हाला वेळ लागला. हे पायी जाणं म्हंजे काही घरातनं उठून समोरच्या

दुकानात जायचं नव्हतं. सित्तांगपास्नं मौलमीनला जायचं होतं. वाट मोठी बिकट होती. डोंगर-पर्वतांनी घेरलेली. साप, जळवा न् गोरिलांनी भरलेली. आझाद हिंद सरकारचे पंतप्रधान, आझाद हिंद सरकारचे सरसेनापति, मित्रपक्षाचे एक नंबरचे दुश्मन नेताजी सुभाषचंद्र बोस ! पण त्यांच्या नशिबी आज चार चाकांची मोडकीतोडकी गाडीपण आली नव्हती ! त्यांच्या गळ्यातला हार सिंगापूरच्या एका माणसानं सात लाख रुपये मोजून घेतला होता ! त्यांच्या उदात्त आवाहनानं कोटचधीश हबीब, करीमभाई न् आदमजी फकीर होऊन गेले होते !– तोच प्रौढ गृहस्थ सित्तांगहून मौलमीनला पायी जाणार होता !

पण त्यांच्या गाडीत तरी इतक्या जखमी लोकांच्यापुरती जागा कशी काय होणार होती ? जास्तीत जास्त चारजणं मावले असते त्या गाडीत. अन् आमच्यात उठता–बसतापण न येणारे किमान सहाजणं होते.

म्हंजे जागेच्या प्रश्नाच्या विचार करणं अटळ होतं. तो निघालाच. मी तिथंच होते. प्रश्न कर्नल चतर्जींनी काढला. नेताजींनी काहीच उत्तर दिलं नाही. विवेकानंदांच्यासारखे दोन्ही हात छातीवर ठेवून ते निष्कंप तेवणाऱ्या ज्योतीप्रमाणं उभे होते. नजर क्षितिजापलीकडे. चष्म्यातनंपण त्यांचे डोळे चमकताय्तसं वाटत होतं.

शेवटी उत्तर दिलं ते मेजर-जनरल जमन कियानींनी. ते ह्या मोहिमेचे कर्णधार होते. आदेश त्यांनाच द्यावा लागणार होता. लष्करात ते चांगलेच मुरलेले होते. जगणं-मरणं त्यांच्या लेखी सारखंच होतं. परिस्थिती कितीही विक्राळ असली तरी सेनापतीची चलबिचल होता कामा नये. मेजर मेननकडे वळून ते खंबीर पण खालच्या आवाजात म्हणाले—डॉक्टर ! पेशंट निवडायची जबाबदारी तुमच्यावर आहे. जी दोघं जगायची शक्यता कमी असेल—

तरी नाहीच जमलं. एवढ्या कसलेल्या लष्करी अधिकाऱ्यालाही आपला हा असला कठोर हुकूम पुरता सांगता आला नाही. पण हुकूम अपुरा असला तरी त्याचा अर्थ उघड होता.

मेजर मेनन हे पण लष्करी अधिकारीच. रणांगणाच्या धामधुमीत त्यांचे पण दिवस गेलेले. तरी दचकून एकदम उभे राह्यले. म्हणाले—वेल, हाउ कॅन आय—

त्यांनाही आपला प्रतिपाद पुरा करणं जमलं नाही.

जनरल कियानींनी मनगटावरलं घड्याळ पाह्यलं. म्हणाले—आणखीन् अर्ध्या तासात निघायचंय् आपल्याला. डॉक्टर ! मला वाईट वाटतंय्. पण निर्णय घेण्याकरता पंधरा मिनटांपेक्षा जास्ती वेळ देता येतं नाहीय् मला ! चौघांची निवड करा !

नेताजी तरीही गप्पच. स्तब्धच.

कियानी त्यांना म्हणाले—या तुम्ही ! डॉक्टरांना काम करू द्या !

कुणीतरी ओढून नेल्यासारखे ते दोघं त्या खोलीतनं बाहेर गेले. मेजर मेनन

जळजळीत नजरेनं त्या पाषाणासारख्या निष्ठूर सेनापतीकडे बघतच राह्यले. मग एकदम त्यांनी दोन्ही हातांनी आपला चेहरा झाकून घेतला. न् ते मटदिशी खाली बसले.

माझी छाती धडधडत होती. मी गप्प होते म्हणून मी इथं आहे हे त्यांच्या लक्षातच आलं नव्हतं. पण मी काही बोलायला हवं का नाही ? कर्तव्य म्हणून काही आहे का नाही ? नाझिरच्या वतीनं, अम्माजींच्या वतीनं काही सांगावं का मेजर मेननना ?

—मेनन, मेरे बेटे !

मेजर मेननंनी मान वर केली. ते पेशंटपाशी आले. त्यांनी पेशंटचा हात आपल्या हातात घेतला.—अम्माजी ?

—बैठो बाप !

मेजर मेनन जमिनीवरच बसले. अम्माजींच्या डोक्यावरनं हात फिरवत-फिरवत त्यांनी विचारलं—तुम्हांला खूप त्रास होतोय् का अम्माजी ? झोपेचं औषध देऊ ?

—नाही नाही ! काही त्रास नाही होत मला. एक विनंती आहे.

—सांगा.

—माझ्या नवऱ्याबद्दल तुला माहीत आहे ना ?

—हो. ऐकलं होतं.पालेलच्या विमान-तळावरच्या लढाईत मेजर गढवाल बळी पडले. त्यांचं प्रेत शोधूनपण सांपडलं नाही म्हणे.

—हो हो ! तर त्यांच्याखेरीच उभ्या जगात माझं आणखी कुणी नव्हतं. आता तर कुणीच उरलं नाही. तर तू—तू मला वगळ ह्यांतनं !

विजेचा धक्का बसल्यासारखा झाला मेजर मेननना. ते झटदिशी मागं सरले. म्हंजे मेजर–जनरल कियानींचा तो कठोर हुकूम ऐकला का काय अम्मा-जींनी ?

—प्लीज मेजर ! मी तुझ्या आई-सारखी आहे ! मी विनवतेय् तुला !

—नाही नाही नाही !—मेजर मेनन ओरडलेच.—ह्या सहा रोग्यांत तुमचीच तब्येत सगळ्यात चांगली आहे. तुम्ही नक्की बऱ्या व्हाल.

—पण काय करायचंय् मी जगून ? कशाकरता जगत राहू मी ? वय पण झालंय् माझं. ह्या सगळ्यांच्यापेक्षा मी मोठी आहे वयानं. त्यांच्यापेक्षा जास्ती दिवस काढलेत मी ह्या जगात—

—नाही ! तुम्ही गप्प बसा बरं आता !

झटदिशी बाहेर निघून गेले डॉक्टर. रणांगणात खूप बीभत्स दृश्यं खंबीर मनानं पाहूचली असतील त्यांनी. पण हे काळीज फाडून टाकणारं दृश्य काही सहन करता आलं नाही त्यांना. पळून गेले ते.

तेवढ्यात मी दिसले अम्माजींना. त्यांनी हाक मारली. नाइलाजानं मी त्यांच्याकडे गेले.

—मला एक कागदाचा तुकडा न् पेन देतेस का आरती ?

—कशाला ?

—नेताजींना चिठ्ठी पाठवायचीय्.

डायरीतनं एक पान फाडून मी अम्माजींना दिलं. पेन पण. थरथरत्या

अक्षरात एकच ओळ लिहिली त्यांनी. अन् कागद माझ्या हातात दिला. मी वाचायचा प्रयत्न केला. पण काही कळलं नाही. त्यांनी लिहिलं होतं—

Netaji ! Permettez–moi faire reparation pour le pecher de mon mari.

—काय लिहिलंय्‌त हे ?

माझ्या दोन्ही गालांवर हात ठेवून त्यांनी प्रेमानं मला आपल्याकडे ओढलं. न् माझ्या डोक्याचं चुंबन घेतलं. त्या क्षीण हंसल्या. म्हणाल्या—त्यांना समजेल. जा, देऊन ये.

नेताजी फार लांब नव्हतेच. बाकीच्या अधिकाऱ्यांशी पुढच्या प्रवासाबद्दल बोलत होते. चिठ्ठी घेऊन मी त्यांच्याकडे गेले. कागद त्यांच्या हातात दिला असेल-नसेल इतक्यात एक प्रचंड आवाज झाला खोलीत. आम्ही सगळे धावतच परत तिकडे आलो.

अम्माजींचं निष्प्राण शरीर पडलं होतं. स्वतःची रायफल हनवटीखाली लावून अम्माजींनी आत्महत्या केली होती.

नाही. कोणताच लष्करी कायदा मोडला नव्हता मेजर गढवालच्या पत्नी सरस्वतीबाईंनी. राणीवाहिनीच्या प्रत्येकीकरता एक बुलेट राखीव होतंच. खुद्द नेताजींचा हुकूमनामा !

लोक म्हणतात, नेताजी म्हंजे दगडासारखे कठोर ! दुःखा:त ते 'अनुद्विग्नमना' न् सुखात 'विगतस्पृह' असायचे. खोटं सांगतात ते. आझाद हिंद सेनेनं भारतात प्रवेश केल्याची बातमी ऐकून ते लहान मुलासारखे खूष होऊन गेले होते. अन् त्या दिवशी अम्माजींच्या मृतदेहापाशी हातात दुर्बोध्य भाषेतली चिठ्ठी घेऊन दगडासारखे उभे असलेले पाहचलेय्‌त मी त्यांना. त्यांचे डोळे पाण्यानं डबडबले होते तेव्हा !

मेजर मेननना काही तो कठोर हुकूम पाळावा लागला नाही. मग कशातरी त्या पाचीजणांना गाडीत जागा झाली.

अगदी निघायच्या ऐनवेळेला आणखी एक प्रकार घडला. तो पण सांगते.

इतक्या आजारी अन जखमी लोकांना घेऊन गाडी जातेय् तर त्यांच्यावरोबर एक डॉक्टर असायला हवा असं कुणीतरी म्हणालं.

नेताजी म्हणाले—मेजर मेननना जाऊ दे त्यांच्याबरोबर.

पण सगळ्यांनीच ह्याला विरोध केला म्हंजे जनरल भोसले अन् चतर्जींनी. मेजर मेनन म्हंजे नेताजींचे खासगी डॉक्टर होते. कायम नेताजींच्या बरोबरच राहणं हे त्यांचं कर्तव्यच होतं. शिवाय आता नेताजींना इतका रस्ता चालावं लागणार होतं—तर डॉक्टर बरोबर हवेतच की ! अय्यर अन् स्वामींनी पण हेच उचलून धरलं. नेताजी पण हट्ट धरून बसले. जिद्द करायला लागले. चांगलाच पेचप्रसंग उभा राह्यला.

इतका वेळ मेजर जनरल कियानी एका बाजूला गप्प उभे होते. सगळ्यांचं बोलणं ऐकत होते. स्वतः मात्र काहीच बोलले नव्हते. आता एकदम करड्या आवाजात ते म्हणाले—मेजर जनरल

भोसले अँड हिज एक्सलन्सी अय्यर!

त्यांच्या त्या आवाजानंच सगळे दचकले.

मग कियानींनी धीम्या आवाजात बोलायला सुरुवात केली—मला फार वाईट वाटतंय् पण नाइलाजानं मला तुम्हाला एका गोष्टीची आठवण करून द्यावी लागतीय्. ह्या मोहिमेचं पुरं नेतृत्व मेजर जनरल जमन कियानींच्याकडे आहे. हा अधिकार सेनेच्या सरसेनापतींनी दिलेला आहे. मला तो अधिकार वापरून मी असा आदेश देतो, की मेजर मेनन नेताजींच्याबरोबर पायी जातील. सेनेच्या सरसेनापतींचा जीव धोक्यात घालणं मला शक्य नाही. गाडीबरोबर कुणी जावं हे मी पहातो. माझी जबाबदारीच आहे ती. ह्याच्यावर आणखी कुणाचं काही म्हणणं असेल तर त्यानं आधी सरसेनापतींच्याकडनं मला कामावरनं कमी केल्याचा हुकूम आणावा अन् मगच काय ते बोलावं.

ही दरडावणी भोसले किंवा अय्यर ह्यांच्याकरता नाही हे एव्हाना सगळ्यांच्याच लक्षात आलं होतं.

नेताजींना डिक्टेटर म्हणणाऱ्यांच्याकरता आता पुढचं सांगते—सगळेच गप्प होते. कुणी काहीच बोलेना. तेव्हा नेताजींनीच ती तंग शांतता मोडली. ते म्हणाले—ह्यावर आता कोण काय बोलणार!

मोटार रवाना झाल्या-झाल्या जनरल कियानींनी आम्हाला फॉल-इन केलं. नेताजीपण रांगेत येऊन उभे राह्यले. अम्माजींच्या मृतदेहाचा नीट अंत्यसंस्कार करायला वेळच नव्हता. तरी लष्करी इतमामानं थोडक्यात मृतदेहाला अग्नि दिला. पेट्रोल ओतून टाकलं. चिता भडकून पेटली. शेवटचा लष्करी सलाम करून आम्ही निरोप घेतला.

मेजर-जनरल कियानींच्या हुकुमानं आमचा लंबा प्रवास सुरू झाला. सगळ्यांच्या माना खाली होत्या. पहिल्या रांगेत नेताजी, जपानी जनरल्स हंसोडा न् हाचाइया. नंतर चाळीसेक मुली. न् सगळ्यांत शेवटी शंभरेक जवान. प्रत्येकाच्या पाठीवर जवळपास अर्ध्या मणाचा बोजा. कपडे, चपला, मग वगैरे गोष्टी. हा बोजा प्रत्येक मुलीच्या पाठीवरपण होताच. स्वत: नेताजींच्या पाठीवरपण होता.

अर्ध्या-एक तासाच्या अंतरानं एअर-रेड अलार्म ऐकू येत होता. आम्ही झाडाझुडपात, जवळच्या खड्डयात आसरा घेत होतो. परत ऑल-क्लिअर झालं, की आम्ही चालायला लागत होतो.

हा प्रवास मी जन्मात विसरणार नाही. रात्रीमागून रात्री चालावं लागलं होतं आम्हाला. दमणुकीनं सबंध अंग मोडून यायचं. बुटाच्या टाचा झिजून-झिजून गेल्या अगदी. प्रत्येकजण कमी जास्त लंगडत होता.

रस्ता रस्ता रस्ता! रस्ता संपायलाच मागत नव्हता. सबंध रात्र जवळजवळ दहा तास चालायचो आम्ही. सूर्य मावळल्यापास्नं सूर्य उगवेपर्यंत. तासभर चालून झालं, की पाच मिनिटांची विश्रांती. म्हंजे फक्त बसून राह्यचं. कुणी आडवं होऊ नका, असं सगळ्यांना

सांगून ठेवलं होतं. कारण मग परत उठून उभं राहणं मुश्कील. दोन्ही पाय अगदी भरून आले होते. दगडासारखे जड झाले होते.

दुसऱ्या दिवसापास्नंच लक्षात आलं– नेताजी किंचित् लंगडतायत. त्याच्या दुसऱ्या दिवशी—म्हंजे आमच्या ह्या प्रवासाच्या तिसऱ्या दिवशी—आम्ही कियाकोटो नावाच्या गावाच्या आमराईत तळ ठोकला. तसे मेजर मेनन नेताजींच्याकडे आले न् म्हणाले––तुम्ही हे टॉपबूट काढा बरं. मला जरा पाय बघू देत तुमचे.

नेताजींनी मान हलवली. म्हणाले–– काय बघायचंय् त्यात ! पायांना काही झालेलं नाही.

मग मेजर मेनन स्वतःच नेताजींचे बूट काढायला सरसावले. आता मात्र नताजींना काहीच म्हणता येईना. त्यांच्या ऑर्डर्लीनं बूट काढले. नेताजींचे दोन्ही पाय फोडांनी भरले होते !

नमितातांई म्हणाली––तुमच्या कुठल्यातरी एपिकमध्ये एक गोष्ट आहे ना––एका लढवय्याच्या मांडीला विंचू चावला होता पण गुरूची झोपमोड व्हायला नको म्हणून त्यानं हूं–का–चूं केलं नाही. मला काही माहीत नाही ती गोष्ट. पण इथं शिष्यांचं मनोबळ खचू नाही म्हणून नेताजींनी आपल्या वेदना टॉपबुटांच्या आड झाकून ठेवल्या !

तिसऱ्या रात्री आम्ही मोठ्या कष्टानं पाय उचलत उचलत चाललो होतो. एवढ्यात समोरनं प्रचंड वेगानं दोन गाड्या आल्या. जपानी ऑफिसर सॅल्यूट करून म्हणाला—ह्या गाड्या मौलमीनहून नेताजींच्याकरता आल्यायत. त्यांची गाडी त्यांनी जखमी लोकांच्याकरता दिली असं कळलं म्हणून—त्याला नेताजींनी धन्यवाद दिले. मग ते म्हणाले ––माझ्या ह्या चाळीस बहिणींच्याकरता किमान एक का होईना ट्रक जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत मी गाडीत बसणार नाही.

जपानी अधिकाऱ्याला बिचाऱ्याला संकोचानं मेल्यासारखं झालं.

नेताजी त्याला म्हणाले –– त्यापेक्षा तुम्ही असं करा. जनरल इसोडा न् हाचाइयांना मौलमीनला पोचतं करा.

चौथ्या रात्री चालणं खरंच अशक्य होऊन बसलं. निव्वळ थकव्यानं आमच्यातले काही लोक मरतील अशी अवस्था आली. पायच आता चालायला तयार नव्हते. लहान पोर एकेक पाय उचलत कसतरी चालतं ना, तशी आमची गत झाली होती.

इथपास्नं पुढं काही डायरी लिहिली नाही मी. तेवढी ताकदच राहली नव्हती. थकव्यानं डायरी लिहिण्याच्या संवयीवर मात केली. आता इतके दिवस मधे गेल्यावर धड आठवतपण नाहीय् सगळं. पण बहुतेक त्याच रात्री आम्ही बिलिन नदीच्या काठी पोचलो.

इथं प्रचंड पावसानं आम्ही चिंब भिजून गेलो.पावसापास्नं बचाव करण्याजोगा काही आसराच नव्हता जवळपास कुठं. नेताजीदेखील उभ्याउभ्या – किंवा चालताचालता म्हणा वाटलं तर –– पुरते भिजून गेले. तरी बरं —रात्रीच्या अंधारात त्यांच्या मागनं चालता येत

होतं. दिवसाउजेडी त्यांच्याकडे बघवतच नव्हतं. तीन दिवस त्यांनी दाढी केली नव्हती. अंघोळ केली नव्हती. डोक्याला तेल लावलं नव्हतं. आता ते चांगलंच लंगडत होते. मधे एकदा नमितातांई म्हणाली — पराजयाचं सुतक पाळता-यत असं वाटतंय् ह्यांना बघितल्यावर.

म्हंजे काय कोण जाणे !

भास्करन्‌ला मी विचारलं — दाढी का करत नाहीत रे नेताजी ? अन् डोक्याला तेलपण नाही ?

भास्करन् म्हणाला — संगळं टाकून दिलं त्यांनी. शेव्हिंग सेट, तेल, कंगवा, जास्तीचे कपडे. ओझं हलकं करून टाकलं !

इलाज काय दुसरा ? त्यांचं वैय-क्तिक सामान — म्हंजे आमच्या भाषेत किडबॅग किंवा 'पिठू' — ते काही नेताजी दुसऱ्या कुणाला वाटू द्यायला तयार नव्हते. कारण मग त्यांच्यातल्या सैनिकाची इज्जत ती काय राह्यली ! तेव्हा स्वतःचा बोजा ते स्वतःच वहाणार ! अन् तरी शरीराला ते झेपत नव्हतं— त्यामुळं ते आपली एकेक वस्तु फेकून देऊन सामानाचं वजन कमी करत चालले होते.

ह्या कहाणीला काही अंत नाही. मी तर तुम्हांला आधीच सांगून टाकलंय्, की त्या शेवटच्या दिवसात डायरी लिहिण्याइतकं बळही माझ्या अंगात उरलं नव्हतं. चित्त पण थड थाऱ्यावर नव्हतं. अन् लांबलचक पंचवीस वर्षं मधे गेलेली असल्यामुळं निव्वळ आठव-णीवर भरोसा ठेवून काही लिहून टाकणंपण काही खरं नाही.

थोडक्यात काय तर एक दिवस आम्ही मौलमीनला येऊन पोचलो अखेर शेवटी. मौलमीनपासनं आमच्याकरता गाडीची व्यवस्था होती. म्हंजे आगगाडीची. मौलमीनला पोचल्यावर एक दिवस नेताजी तिथं होते. त्यांच्याकरता जपान सरकारनं रेल-मोटार पाठवली. अन् दुसऱ्याच दिवशी ते बँकॉकला निघून गेले.

आता ह्याच्या पुढच्या आठवणी म्हंजे निव्वळ माझी खाजगी गोष्ट. तिथं आझाद हिंद सेनाही नाही नि नेताजीही नाहीत.

मी मौलमीनला पोचले ती तारीख होती पाच मे. पहाटेची वेळ. त्याच-दिवशी संध्याकाळी मौलमीन इस्पितळात लेफ्टनंट नाझिर अहमद मरण पावला. इस्पितळाच्या रेकॉर्डप्रमाणे तो तीन तारखेला तिथं भरती झाला होता. त्याच दिवशी त्याचा पाय कापून टाकला होता त्यांनी. नंतर आणखी दोन दिवस जिवंत होता तो. माझी वाट बघत असल्यासारखा शेवटपर्यंत तो शुद्धीवर होता. पण त्याला बोलता मात्र येत नव्हतं. मला ओळखलं त्यानं. रुमालानं कितीदा त्याचे डोळे पुसले मी त्या दिवशी.

माझी कहाणी संपली.

काय म्हणता ? त्या राजाराणीच्या वेशात नेताजींची पायधूळ घेतली ती गोष्ट ? नको. राहू दे ते सगळं. खरंच सांगतेय्, ह्याच्यानंतर आता ते तसलं काही लिहावंसं वाटत नाहीय्. तशा तर

कितीतरी गोष्टी सांगायच्या राहून गेल्यायत्‌च की. शिवाय मला तरी अगदी सगळ्याच गोष्टी कुठं ठाऊक आहेत ? अम्माजी खरंच गुप्तहेर होत्या का काय ते कुठं मला ठाऊक आहे ? त्यांनी चिठ्ठीत काय लिहिलं होतं ते तरी कुठं ठाऊक आहे ?

त्या तरी गोष्टी मला कुठं सांगता आल्यायत्‌ तुम्हाला ? तर मग हे पण तसंच राहू दे ना.

इस्पितळवाल्यांनी नाझिरचं सामान-सुमान नंतर मलाच देऊन टाकलं होतं. तुमची मातृभूमी स्वतंत्र झाल्यावर नाझिरच्या आईच्या पत्त्यावर त्याचं घड्याळ, पेन वगैरे पार्सल करून पाठवून दिलं मी. फक्त दोनच गोष्टी माझ्या-जवळ राह्यल्या. आठवण म्हणून. उर्दू शायरीनं भरलेलं एक लहानसं नोटबुक. मौलमीनच्या इस्पितळाच्या आग्नेय कोपऱ्यात बहरलेल्या गुलमोहराच्या झाडाखाली नाझिरला माती दिली मी. पण कवितेची वहीपण तिथेच टाकता आली नाही मला. तेव्हा वाटलं, की ही वही मी ठेवून घेतली स्वतःजवळ तर उलट बरंच वाटेल त्याला.

ह्या वहीनंच मला उर्दू भाषा शिका-यला भाग पाडलं. इथल्या शाळेत उर्दूच शिकवते मी सध्या. नाझिरच्या ह्या वहीनं निव्वळ जीवनच दिलं नाही; उपजीविकापण दिल्याय्‌.

आणखीपण एक स्मृतिचिन्ह आहे. एक रुमाल. ह्या रुमालानं त्याची जखम बांधली होती एक दिवस. माझ्याजवळ एवढा एकच रुमाल होता. ह्या रक्तानं माखलेल्या रुमालानंच त्या दिवशी डोळे पुसले होते त्याचे. तो मृत्यूच्या दिशेनं वाटचाल करत असताना.

पंचवीस वर्षं गेली नंतर. आता मी प्रौढ झालेय्‌. तरी तो रुमाल तसाच आहे. त्याच्या आसवांची काही खूण नाही त्याच्यावर. सुकून गेल्यायत्‌ ती आसवं. सुकून गेलेल्या रक्ताचे काळे डाग मात्र तसेच आहेत. काळे. लाल नाहीत. ताजं रक्त जणू सुकून काळं पडलंय्‌. पाव शतकात मर्मांतिक तीव्र शोकाची धारपण तशीच बोथट होऊन गेल्याय्‌.

तरीदेखील हा रुमाल ज्या दिवशी ट्रंकेच्या तळातनं बाहेर काढून बघते, त्या दिवशी पंचवीस वर्षांच्या पलीकडून सत्तावीस वर्षांच्या त्या तरुणाचा आवाज मला अजून ऐकू येतो—

दो लफ्जो में पुशिदा
एक मेरी कहानी है

एक लफ्ज मोहब्बत है,
एक लफ्ज जवानी है ।

आँसू को मेरे ले कर
दामन पे जरा जाँचो

जम जाये तो खून है,
बह जाये तो पानी है,

## जबानी पहिली

## समाप्त

## ढोल, नौबती आणि डावपेच
पृष्ठ ७९ वरून

शिल्लक न ठेवता जर्मन राष्ट्रापुढे संपूर्ण मानहानिकारक शरणागती वा संपूर्ण पराभवापर्यंत लढाई एवढे दोनच पर्याय दोस्त राष्ट्रांनी ठेवले व अर्थातच स्वाभिमानी जर्मन राष्ट्राने दुसरा पर्याय स्वीकारला. इतके दूरचे कशाला, साध्या मांजरीलाही कोंडीत पकडले तर ती फिसकारून अंगावर येते हा आपला नेहमीचा अनुभव आहे.

हिटलर व त्याचा नाझी पक्ष यांना झुगारून द्या. तुम्हाला योग्य ते अभय देतो, असे आवाहन जर्मन जनतेला करून, रशियाच्या वाढत्या वळाला प्रतिशह म्हणून जर्मन राष्ट्राला शाबूत राखायचे, की जर्मनीच्या प्रबळ भूशक्तीची धूळधाण करून रशियाला युरोपात मोकळे रान सोडायचे, असा मोठा नाजुक प्रश्न दोस्त राष्ट्रांच्यासमोर होता आणि या प्रश्नात खरी मुत्सद्देगिरी पणास लागली होती. आगीतून फुफाटचाकडे चाललेली ही यात्रा चर्चिलने थोडीफार ओळखून दोस्तांची दुसरी आघाडी पूर्व युरोपात उघडायचा आग्रह धरला, पण भोळसट रुझवेल्ट बिलंदर स्तालीनच्या मोहपाशात फसला व खुद्द चर्चिल स्वतःच्या निर्णयाचा बंदी बनला. याचा परिणाम ! याचा परिणाम इतकाच झाला, की दुसऱ्या महायुद्धाच्या समुद्रमंथनातून साम्यवादी रशियाने अमृत-कुंभ पळवला व दोस्त राष्ट्रांच्या हाती उरले केवळ हलाहल !

पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मन राष्ट्रांवर लादलेल्या अवास्तव व मानहानिकारक शर्तातून हिटलरशाहीचे भूत उठले होते. व्हर्सायच्या तहाच्या सलामीकरता झडलेल्या तोफांचा विजयोन्माद, ही दुसऱ्या महायुद्धाच्या सलामीची नौबत ठरली आणि जर्मन सेनेतल्या एका साध्या कार्पोरलने केवळ बावीस वर्षांत त्याच व्हर्सायच्या राजवाड्यात पहिल्या युद्धातील जेत्या राष्ट्राच्या सेनापतीकडून शरणागती लिहून घेतली, ही इतिहासाची साक्ष आहे.

जनसंघाच्या महान् नेत्यांना या ताज्या इतिहासाची जाणीव नाही असे कसे समजता येईल ? की युद्धाच्या गर्जना ढोल-नौबतीच त्यांना समजतात आणि राजनीतीच्या पायातल्या चंचल आणि फसव्या घुंगुराचे बोल त्यांच्या बुद्धीच्या पलिकडचे आहेत ?

जनसंघाला पाहिजे तरी काय ? विजयोत्तम भारताने पाकिस्तानच्या जिंकलेल्या 'पाच-हजार चौरस मैल' प्रदेशात पाय रोवून एका हाताने पाकिस्तानची मुंडी आवळून धरून दुसऱ्या हाताने आपली रणमस्त तलवार त्याच्यावर उगारून धरावी अशी तर जनसंघाची रणगंभीर इच्छा नाही ना ? पण यातून आपले राष्ट्रहित साध्य होणार आहे काय ? एका त्रिनडोक लष्करी राजवटीकडून दुसऱ्या दिवाळखोर लष्करी राजवटीच्या जोखडाखाली जात असलेल्या पाक जनतेला परत युद्धखोर लष्करी राजवटीच्या सरधोपट

व्यावहारिकदृष्टया सामान्यात जमा होणारे हे चरित्र. पण या सामान्याने एका विशाल उद्दिष्टाच्या रथाशी स्वत:ला बांधून घेतले आणि रस्त्यावरच्या दगडधोंड्यांनी शरीर व मन घायाळ होत असतांही कधी सुखाचा निवारा शोधला नाही. जखमी होऊनही पराभूत न झालेल्या, प्रसादाच्या अपेक्षेवाचून पूजा करणाऱ्या, उजेडाच्या उपासनेसाठी काळोख विकत घेणाऱ्या माणसाची, एका विठू मास्तराची ही कहाणी. त्या कार्यकर्त्याच्या शब्दात थोडा बदल करून मी शेवटी म्हणेन, 'लॉंग लिव्ह विठू मास्तर !'

—कुसुमाग्रज

# कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

दहा रुपये

राजहंस प्रकाशन

जू खाली लोटून, पर्यायाने आपल्या पायावर धोंडा पाडून घ्यायचा, की पाक जनतेला लोकशाहीची थोडी मोकळी-ताजी हवा उपलब्ध करून घ्यायची संधी देऊन विचार करायला अवसर द्यायचा ? पाकिस्तानवर अपमानकारक अटी लादून, या उपखंडात सतत धुमसते वातावरण ठेऊन ज. टिक्काखानच्या लष्करशाहीची वाट मोकळी करायची की वेभानपणे बोलणाऱ्या, पण भान ठेऊन वागणाऱ्या भुत्तोमियांची चाल-बाजी ओळखून त्यांना पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणात योग्य ती संधी देऊन, आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडायचे ? राजकारणात आपल्या चाली रचताना, शत्रुपक्षाच्या चालीही हाणून पाडायच्या असतात. शत्रूपक्षावर आपली मजबूत पकड ठेऊनही माघारीचे थोडे-फार नाटक करायचे असते. साधा बोकड कापण्यापूर्वी त्याला दाणा-पाणी घालून मस्त पोसतात पण आपल्या सुऱ्याच्या धारदार पात्याबद्दल जोपर्यंत आपल्याला विश्वास असतो तोपर्यंत त्या मस्तवाल बोकडाच्या रोखलेल्या शिंगाचे आपल्याला भय नसते. समज-णारे समजतात, भोळे–भाबडे–भेकड 'घात झाला' 'घात झाला' म्हणून छाती बडवतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी-जपान या राष्ट्रात दोस्त राष्ट्रांनी ठेवलेल्या फौजफाटयाचा जनसंघ नेते उल्लेख करतात, पण त्याच देशांना सावरण्या-साठी अमेरिकेने ओतलेल्या अमाप संपत्तीचे स्मरण जनसंघाला होत नाही. रशिया-चीनला प्रतिशह देण्यासाठी जर्मनी जपानला आंजारून-गोंजारून खूष ठेवण्याचे अमेरिकेने केलेले प्रयत्न जनसंघाला आठवत नाहीत. इस्रायलने अरबांचा जिंकलेला मुलुख ताब्यात ठेवला आहे ही गोष्ट सत्य आहे, पण गोल्डा मायरनी 'इंच इंच' भूमी ताब्यात राखू अशी प्रतिज्ञा कधी खाल्ली नाही. ती तर अरबांना परस्पर वाटा-घाटीचे आवाहन करते आहे. पण अरबांच्या नशिबी धूर्त भुत्तोंच्याऐवजी हटवादी सादत आहे. याला ती तरी काय करणार ? आपल्या भूतकाळाचा आणि गर्जनांचा आजही सादत बंदी आहे, आणि त्या प्रकारच्या डरकाळ्यांचा बंदी असलेला भुत्तो, बदलती हवा ओळखून, शिताफीने आपल्याच कैदेतून बाहेर पडला व गांधींनी त्याला वाटा-घाटींच्या टेबलावर आणला, यात दोघां-नीही मुत्सद्देगिरीचे सुरेख कसब दाखवले.

आणि 'सिमला-कराराने' आपण गमावले तरी काय ? मोठा डांगोरा पिटण्यात आलेला पश्चिम सीमेवरील पाच हजार चौरस मैल प्रदेश आपण परत करणार ही गोष्ट खरी असली, तरी, संपूर्ण 'पूर्व-पाकिस्तानचे विभाजन आपण पचवले व जम्मू-काश्मीरमधली लष्करीदृष्ट्या अत्यंत मोक्याची ठाणी आपण घट्ट टाचेखाली दाबून धरली आहेत. ही गोष्ट जनसंघ नेते जनतेला का सांगत नाहीत ? पश्चिम सीमेवरील खुल्या प्रांगणातील प्रदेशाच्या बदल्यात साऱ्या जगात एक विजयी पण संयमी राष्ट्र म्हणून डावपेचांच्या दृष्टीने आपली

प्रतिमा आपण उजळवू शकलो ही गोष्ट खोटी आहे का? (१९६२ साली विजयी चीनने हीच चाल रचली नव्हती का?) जंग जंग पछाडूनही भुत्तोमियाँ पाक युद्धकैद्यांच्या 'हुकमाच्या एक्क्याला' हात घालू शकले नाहीत. याचे इंदिरा गांधींना श्रेय नाही काय? आपल्या मर्जीप्रमाणे जगाची आपसात वाटणी करून घेणाऱ्या दोन बड्या देशांना गांधींनी या वाटाघाटींपासून दूर ठेवले यात गांधींचा पराक्रम नव्हे काय? 'भारत-पाक' मध्ये समझोता झालेला बड्या राष्ट्रांना आवडेल, की दुही नांदून हस्तक्षेपाला संधी मिळालेली आवडेल, हे पण जनसंघाच्या राजकारण्यांना समजत नाही काय?

'सिमला-करारावर' डोळस टीका करून, पूर्वीच्या आंधळ्या 'भाई-भाई' प्रेमापासून सावध रहाण्याचा जनसंघाने जर इशारा दिला असता, तर ते त्याच्या सारख्या राष्ट्रव्यापी पक्षाला शोभले असते. पण जवानांच्या सांडलेल्या रक्ताचा गहिवर काढून व 'मॉस्कोचा फोन आला', 'अमक्याची आज्ञा झाली' इ. खुळचट कल्पना लढवून जनसंघाने आपली शोभा करून घेतली आहे. जनसंघाला खरोखरी देशभक्ती अभिप्रेत आहे, की जवानांच्या आठवणीच्या गहिवरावर त्यांना पक्षीय स्वार्थाच्या पोळ्या भाजायच्या आहेत? जनसंघासारखा त्यातल्या त्यात राष्ट्रीय व सुसंघटित पक्ष इतक्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पण पक्षनिरपेक्ष दृष्टीने पाहू शकत नाही का? आपल्या आजवरच्या इतिहासात आपले नुकसान 'कचखाऊ' प्रवृत्तीने केले आहे, तितकेच नुकसान, अंगी केवळ शूरत्व असलेल्या, पण राजकारणी डावपेचांचे ज्ञान नसलेल्या राजपूत, मराठे (शिवाजी महाराजांसारखे काही सन्माननीय अपवाद वगळता) इ. मंडळींनी केले आहे. तळहातावर शीर घेऊन ही मंडळी वीरश्रीने लढली, पण त्या शिरामध्ये डावपेच या नावाची चीज असती, तर ते शीर तळहातावर घेण्याची वेळच आली नसती ही गोष्ट ते विसरले!

आणि शेवटी युद्ध जिकण्याच्या आणि पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याच्या वल्गना कोणी फोडाव्यात? ज्या पक्षाला पंचवीस वर्षांत कॉंग्रेस पक्षाला नामोहरम करण्यांत व लोकसभेच्या पाच-पंचवीस जागा टिकवण्यातही यश आले नाही त्या पक्षाने? वाजपेयीमहाराज, हे 'येऱ्यागबाळ्याचे काम नोहे'! आम्ही सामान्यजनही ही बात पुरेपूर ओळखून आहोत. बस्स् करा तुमचा देशभक्तीचा 'मक्तेदारी व्यापार'! □

# एका पराभवाची कहाणी

लेखक
ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद
अनंत भावे

श्री. ग. माजगावकर

# नवे म्यूनिक ?

पाकिस्तानात लोकशाहीवादी शक्ती जेव्हा बंड करून उठण्याच्या अवस्थेत होत्या तेव्हाच नेमका सिमला करार करून आपण या लोकशाही शक्तींचा आवाज दडपून टाकलेला आहे. कारण आपण अशी समजूत करून घेतली, की जनतेच्या या स्वयंस्फूर्त उठावापेक्षा भुत्तो हे पाकिस्तानातील लोकशाहीचे अधिक विश्वासार्ह असे प्रतीक आहेत. भुत्तोंमुळे पाकिस्तानात लोकशाहीचे वारे वाहू लागणार आहेत. भुत्तो कोसळले तर पाकिस्तानात पुन्हा एखादी लष्करी राजवट अस्तित्वात येईल. या लष्करी राजवटीमुळे पुन्हा तणाव वाढतील, युद्ध भडकेल व भारतीय उपखंडातील स्थिरता व शांतता कायमची धोक्यात राहील.

भुत्तो हे लोकशाहीचे प्रतीक ठरू शकतात काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

नाही, असे या प्रश्नाचे उत्तर आहे. कारण भुत्तोंचे नेतृत्व हे लोकांच्या चळवळीतून पुढे आलेले नाही. लोकांच्या अंगाखांद्यावर ते वाढलेले नाही. भुत्तोंचा राजकीय जन्मच मुळी खलबतखान्यात झालेला आहे. महत्त्वाकांक्षा, भूलथापा, द्रोह, पडद्याआडच्या हालचाली, कपट-कारस्थाने यांची जाळी विणून या नेतृत्वाने सत्ता हस्तगत केलेली आहे. आपल्या देशाला लोकशाहीची राजवट देणारा नेता असा कधीही उदयास येत नाही, आजवर कोठेही आलेला नाही. भुत्तो भाषणातून काहीही बरळोत; लोकशाही त्यांच्या रक्तातच नाही. भुत्तोंना लोकशाहीवादी ठरवायचे तर मग हिटलरलाही हे विशेषण लावायला हरकत नसावी. कारण तोही निवडणूक जिंकून सत्तेवर आलेला होता व लोकशाहीची जपमाळ ओढण्याची त्यालाही थोडीफार सवय होती.

शिवाय या दोघांमध्ये आणखीही एक साम्य आहे. पराभवाच्या दारुण दुःखाच्या व सार्वत्रिक वैफल्याच्या पार्श्वभूमीवर दोघांनी सत्तासंपादन केले. पराभवाचा वचपा काढण्याचे, सूड उगविण्याचे ज्याक्षणी भुत्तो मनापासून

नाकारतील त्याक्षणी त्यांना सत्ताही सोडावी लागेल, त्यांचे नेतृत्वच निकालात निघेल.

असे नेतृत्व नेहमी कशाच्या तरी कडव्या द्वेषावर उभे असते. ज्यूद्वेष, कम्युनिझमचा द्वेष हे हिटलरी नेतृत्वाचे अविभाज्य अंग होते. हिंदूंचा द्वेष, भारत द्वेष हा भुत्तोमियांचा स्थायीभाव आहे. कधी हा द्वेष ते प्रकटपणे व्यक्त करतील, कधी मैत्रीचे नाटक वठवतील. पण हजार वर्षे भारताशी युद्ध खेळण्याची त्यांची भाषा संधी मिळताच खरी करून दाखवायला ते कचरणार नाहीत हे आपण पक्के ध्यानात ठेवायला हवे.

भुत्तो जराही लोकशाहीवादी असते तर सार्वत्रिक निवडणुकांचा कौल मानून त्यांनी शेख मुजिब यांचेबरोवर सत्तेतील भागीदारी पत्करली असती. याउलट त्यांनी याह्याखानला पूर्व पाकिस्तानात सैन्य पाठवायचा सल्ला दिला. या सैन्याने पूर्व-पाक जनतेवर केलेले अत्याचार हिटलरलाही लाजविणारे ठरले. या अत्याचारांबद्दल आता फक्त याह्याला जबाबदार धरले जाते. वास्तविक भुत्तोंचा या नरमेधातील वाटाही मोठा आहे. याह्याप्रमाणे भुत्तोंची जागाही एखादा तुरुंग हीच असायला हवी होती. पण याऐवजी त्यांचा शिरकाव झाला इस्लामाबादेतील सत्तास्थानावर व आपण प्रारंभी डळमळीत असलेले हे त्यांचे स्थान स्थिर करून त्यांना बढती मिळवून दिली, आशियाच्या राजकीय मंचावर त्यांची गाजावाजापूर्वक प्रतिष्ठापना केली.

म्युनिक कराराचे सर्वांत मोठे अपयश हे होते, की शांतताप्रेमी व लोकशाहीवादी राष्ट्रांनी हिटलरला हा करार करून युरोपात प्रतिष्ठा मिळवून दिली. हिटलरला जर्मनीत जागच्या जागी ठाणबंद करण्याची अखेरची संधी त्यांनी घालवली.


सिमला करार करून भुट्टोंच्या बाबतीत आपण नेमके हेच केलेले आहे.

□ □ □



# बावर्ची

## एक हरपले श्रेय




देवीदास बागूल

नका, ह्याला खोटा म्हणू नका. राउळाचे कळसाला लोटा कधी म्हणू नये. लग्नातल्या नारळाला श्रीफळ म्हणावे, नारळ म्हणू नये. नेहमीच्या कथेत अशक्य वाटणाऱ्या घटना जर कुठे शक्य होत असतील तर तिला परीकथा म्हणावे. म्हणून म्हणतो 'बावर्ची' ही परीकथाच नाही काय? परीकथेतली परी जशी सर्वगुणसंपन्न असते, अशक्य ते शक्य करून दाखवते, तसाच हा बावर्ची नाही काय? ह्या बावर्चीला कोणकोणची कामे करता येतात असे विचारण्याऐवजी कोणती येत नाहीत असेच विचारणे सोयीचे होईल. त्याला स्वयंपाक करता येतो हे सांगण्यात मतलब नाही, पण त्याला गाता येते, कविता करता येते, नृत्य येते, नृत्य शिकवता येते, आठ दिवसात नृत्य शिकवून स्पर्धेत शिष्येला प्रथम पारितोषिक मिळवून देता येते, घरातल्या माणसामाणसात प्रेम निर्माण करता येते, प्रेम!

खोटं वाटतं ना हे सगळं! पण मघाच सांगितलं ना, की ह्याला खोटं म्हणू नका, परीकथा म्हणा परीकथा! फार तर आधुनिक परीकथा म्हणा. परीकथा म्हटलं नाही तर मग बावर्चीच्या त्या गप्पागोष्टींचे सौंदर्यच आकलन होणार नाही...त्याला विचारावं, की तू संगीत कुठं शिकलास? तर म्हणतो, पं. ओंकारनाथ ठाकुरांकडे; कविता कुठं शिकलास? तर म्हणतो रवींद्रनाथांकडे...तो एक खरं बोलत नसेल तर नसू दे, पण तुम्ही तरी खरंखुरं पहा ना! असं खरंखुरं मनापासून पाह्यलं तर दिसेल, की हा बावर्ची इथला नाही, इथला म्हणजे या पृथ्वीवरचा, या मातीचा नाही. तो अद्‌भुत आहे...त्याचं बोलणं अद्‌भुत आहे...त्याचं फरशी घासणं अद्‌भुत आहे...बघा कशी दोन मिनिटात निसरडी फरशी तुरूतुरू घासून स्वच्छ केली...त्याचं भांडी घासणं अद्‌भुत आहे...कशी झरझर भांडी घासतो. काय,



परीकथेतली ही मंडळी

दृष्टीला कधी भोवळ येते नाही? कोण म्हणेल त्याला इथला, तुमच्याआमच्यातला. आपण कुठे आणि तो कुठे?

पण तरी तो आपल्यात यावा, कधीतरी यावा, क्षणभर तरी यावा, आणि सगळं वातावरण बदलून टाकावं; असं आपल्याला वाटतं की नाही? आपल्यातली धुसफूस, हेवेदावे, उंटावरून शेळ्या हाकणं, आळस आणि कुरकूर, स्वार्थ आणि भीती यांचा निचरा व्हावा आणि आपलं अंधारलेलं जीवन उजळून निघावं असं आपल्याला केव्हातरी वाटतं की नाही? तो क्षण काजव्यासारखा चमकून जातो, मात्र पकडता येत नाही. पण पकडता आला तर?

'बावर्ची'मध्ये तोच क्षण पकडला आहे, आणि मोठा करून दाखवला आहे. वातावरण वास्तव आहे, पण तो क्षण परीकथेचा आहे. तिसरी घंटा वाजते आणि त्या क्षणावरचा मखमली पडदा उलगडतो. आता तर्क थोडा वेळ बाजूला ठेवा, आणि थोडा वेळ निखळ स्वप्नरंजनात, तरल हलक्याफूल अनंत अवकाशात रममाण व्हा...रुचकर जेवण हवे का? घ्या ना, सुरणाची भाजी मटणासारखी नाही लागली तर म ग बोला तुमच्या दिवसभराच्या श्रमानंतर जर तुम्ही प्यायला बसलात आणि ह्या स्वप्नरंजनाने तुम्हाला नाही साथ दिली तर...तर मग बोला...नुसता स्वयंपाक तर कोणताही आचारी करील. मग त्याचा स्वयंपाक हा कुठल्याही खानावळीत विकत मिळेल, पण हा आचारी नुसता स्वयंपाक करत नाही, तर सगळाच संसार करतो : धुणी धुतो, लावालावी करण्याऐवजी शिफारसी करतो, टिंगल करण्याऐवजी संगीतात रस घेतो, .. जिकडे तिकडे प्रेमाचे मळे पिकवतो. पण कशात गुंतत नाही... माणसात गुंतणं हे मुळी 'परी'ला मानवतच नाही ना! म्हणून तर तो बावर्ची जसा प्रातःकाळी धुक्यातून येतो

तसा एका प्रातःकाळी धुक्यातून निघून जातो. जाताजाता चटका लावन जातो, दृष्टी बदलून टाकतो . बाकी सर्व गोष्टी जागच्या जागीच असतात. फक्त दृष्टी बदलते . भौतिक गोष्टी बदलणं हे मुळी त्याचं उद्दिष्टच नव्हतं. कदाचित् तो निघून गेल्यावर त्या कुटुंबात पुन्हा धुसपूस, कटकटी, स्वार्थ, गैरसमज यांची अवकळा येईल, कदाचित येणार नाही. तसं पाह्यलं तर कोण कोणाच्या आयुष्याला पुरणार आहे ? आयुष्यभराच्या सुखाची हमी द्यात्री नेहमीच्या कथा-कादंबऱ्यांनी,...आणि ते सुखात राहू लागले...ह्या अभिनव परीकथेचा स्वभावच जगावेगळा आहे...

आणि ही परीकथा जगावेगळी झालीही असती. पण ते भाग्य हृयावेळी तरी चुकले, हातातून निसटले, ओठापर्यंत आले, पण ओठाला न भिडताच सांडले. फार चुटपूट लागली ! वाटले, की का हो परीकथा ह्या दिग्दर्शकाने बिघडवून टाकली ? कथेच्या सुरुवातीला शिक्षकांच्या घोळक्यात वर्तमानपत्रातली बातमी वाचायला लावून ह्या परीकथेच्या बावर्चीला डिटेक्टिव्ह कथेतल्या चोराचे वास्तव रूप देण्याचा घेडगुजरी प्रकार कशाला केला ? घरमालकाच्या वास्तव जडजवाहिरावर ह्या तरल अद्भुत परीकथेच्या नायकाचा लोभी डोळा दाखवून जमत चाललेल्या स्वयंपाकात मिठाचा खडा कशाला टाकला ? आणि रवींद्रनाथ, ओंकारनाथ ते वसंतराव नाईक यांच्यापर्यंत अप्रतिहत वावरणाऱ्या तरल व्यक्तिरेखेला चित्रपटाच्या शेवटी प्राध्यापकाच्या वास्तव जीवनाचे मातीचे पाय कशाकरता लावले ? मनोमन वांछित अशी ती व्यक्तिरेखा जशी अचानक आली तशीच अचानक गेली असती तर हा चित्रपट जगातल्या सुंदर चित्रपटांच्या मालिकेत जाऊन बसला नसता का ? हा चित्रपट सुंदर म्हणण्यासाठी जीव अजूनही कसा आतुर होतो ! मोठ्या चुलतीने सकुंचितपणे पुतणीला बिस्किट न दिल्यावर धाकट्या चुलतीने पुतणीच्या तोंडात बिस्किटं देणं किती हृदयस्पर्शी वाटते ! . धाकट्या जावेने मोठ्या जावेच्या पायाला अमृतांजन चोळणे, पुतणीने दोन्ही चुलत्यांची क्षमा मागणे, पोरक्या नातीच्या नृत्याच्या वेळी आजोबांनी उचंबळून येऊन भरसभेत खुर्चीतून उठून वाहवा म्हणणे... आपली मुलगी नृत्याच्या पोषाखात दिसण्याऐवजी स्वयंपाकघरातून येताना दिसल्यावर पित्याला सुखद भोवळ येणे आणि पन्नाशीच्या चुलतीने लाजत लाजत का होईना मुलगी, पुतणी आणि जावेच्या जोडीने नृत्याचे पदविन्यास करणे... अहाहा ! असे क्षण जीवनात यावेत असे तुम्हाआम्हाला किती किती वाटते ! पण संकोचाचे साखळदंड आपल्या पायात कसे घट्टमुट्टपणे बांधले आहेत की नाही ! मनाला वाटणारी ही अनिवार ओढ अशा एखाद्या बावर्चीची फार वर्षांपासून वाट पाहते आहे. तो बावर्ची आज अशा रीतीने भेटल्यामुळे जणू काही एखादे हरपले श्रेयच भेटल्यासारखे वाटले ! अशा ह्या श्रेयाच्या उत्फुल्ल दर्शनासाठी तरी हा बावर्ची पुनःपुन्हा पाहृचला हवा. त्याच्या गुणदोषांसकट !

□ □ □

# डागळलेले ऑलिंपिक

मुकुंद मणूरकर

आल्हाददायक अशा बव्हेरीयन सूर्यप्रकाशात ऐंशी हजार प्रेक्षकांच्या साक्षीने गुंथर या जर्मन ॲथलेटने ऑलिंपिक क्रीडाज्योत प्रज्वलित केली आणि त्याचबरोबर पश्चिम जर्मनीच्या अध्यक्षांनी म्युनिच ऑलिंपिक सुरू झाल्याची घोषणा केली.

हे सामने भरविताना प. जर्मनीचा एक विशिष्ठ हेतू होता. छत्तीस वर्षापूर्वी जर्मनीतच, पण बर्लिनमध्ये ऑलिंपिक सामने झाले होते. पण तेव्हा मोकळे वातावरण नव्हते. हिटलरच्या भेदक नजरेचे सावट स्पर्धेवर पडले होते. हिटलरने अनेक देशांना, विशेषत: ' काळ्या ' देशांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. हा डाग धुवून काढायची संधी यंदा जर्मनीला साधायची होती. पण जर्मनीला हे समाधान मिळू द्यायची नियतीची इच्छा नसावी ! स्पर्धेच्या अकराव्या दिवशी, क्रीडाक्षेत्राला अपरिचित अशी घटना घडली. भल्या पहाटे अरब गनिमांनी इस्रायली खेळाडूंच्या छावणीवर हल्ला करून दोघांना ठार केले व नऊ जणांना ओलीस ठेवले. इस्रायलच्या ताब्यात असलेल्या दोनशे गनिमांच्या सुटकेसाठी त्यांनी हे साहस केले. यामुळे ऑलिंपिक स्पर्धा चोवीस तास स्थगित ठेवण्यात आली. दुसऱ्या दिवशी नऊही इस्रायली खेळाडू व पाच अरब गनिम यांची हत्या होऊन या प्रकरणाचा रक्तरंजित शेवट झाला. ऑलिंपिक सामने पुढे चालू झाले.

ऑलिंपिकमध्ये अनेक खेळांडूनी आपले कौशल्य दाखविले, पण चार-पाच खेळाडूंच्या कर्तृत्वाभोवतीच म्युनिच ऑलिंपिकची कहाणी गुंफली गेली आहे !


या स्पर्धेतील मानाच्या पानावर बसला अमेरीकेचा जलतरणपटु मार्क स्पिट्झ ! स्पिट्झने जलतरण स्पर्धेत सात सुवर्णपदके जिंकली. यापूर्वी कोणत्याही खेळाडूने सात सुवर्णपदके–आणि तीही एकाच प्रकारच्या खेळात–मिळविण्याचा पराक्रम केला नव्हता; पुढे कुणी करेल याची शक्यता नाही ! आणखी विशेष म्हणजे सातही सुवर्णपदके जिंकताना स्पिट्झने नवीन जागतिक उच्चांक

प्रस्थापित केले. १०० व २०० मीटर्स फ्रीस्टाईल आणि १०० व २०० मीटर्स बटरफ्लाय अशा चार वैयक्तीक स्पर्धेत तो विजयी झाला, तर ४ × १०० व ४ × २०० मीटर्स फ्रीस्टाईल रिले आणि ४०० मीटर्स मेडले रिले अशा तीन सांघिक स्पर्धेतील विजयात सिंहाचा वाटा उचलला ! स्पिट्झच्या या पराक्रमामागे दुर्दम्य इच्छाशक्ती होती ! चार वर्षांपूर्वी मेक्सिको ऑलिंपिकमध्ये सहा सुवर्णपदके मिळविण्याच्या इराद्याने त्याने भाग घेतला होता. पण प्रत्यक्षात त्याला मिळाली सांघिक स्पर्धेत दोन सुवर्ण पदके व वैयक्तीक स्पर्धेत एक सुवर्ण व एक ब्रॉंझपदक. पण तो निराश झाला नाही. म्युनिचमध्ये सात सुवर्ण-पदके मिळविण्याच्या जिद्दीने तो उत-रला; त्याने तसे बोलूनही दाखविले होते आणि कठोर परिश्रमांच्या सहा-य्याने त्याने आपली इच्छा फलद्रूप केली ! दंतवैद्यकीचा अभ्यास करणाऱ्या मार्क स्पिट्झने वयाच्या अवघ्या बावी-सव्या वर्षीच ऑलिंपिक निवृत्तिही जाहीर केली.

स्पिट्झप्रमाणेच कठोर परिश्रम करणारे दोन खेळाडू आहेत. ते म्हणजे केनियाचा किप किनो व युगांडाचा जॉन अकी बुआ.

बत्तीस वर्षाच्या किप किनोने आपल्या जिद्दीचे अभुतपूर्व प्रदर्शन या ऑलिंपिकमध्ये दाखविले. मागील ऑलिंपिकमध्ये त्याने १५०० व ५००० मीटर्स पळण्याच्या शर्यतीत अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक मिळविले होते. यंदा दोन्ही स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याच्या तयारीने तो उतरला. पण स्पर्धेच्या कार्यक्रमपत्रिकेने त्याच्या इच्छेवर बोळा फिरविला. वरील दोन्ही स्पर्धा केवळ एका तासाच्या अंतराने ठेवल्या होत्या. त्यामुळे ५००० मीटर्सच्या शर्यतीतून त्याने नाईलाजाने अंग काढून घेतले व त्याऐवजी ३००० मीटर्स स्टिपलचेसच्या शर्यतीत खेळण्याचे ठरविले. आश्चर्य म्हणजे स्टिपलचेसच्या शर्यतीत त्याने पूर्वी कधीही भाग घेतला नव्हता ! १५०० मीटर्सच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवून त्याने आपले श्रेष्ठत्व राखलेच, पण प्रथमच भाग घेऊन स्टिपलचेस-मध्येही सुवर्णपदक मिळविले. हा चम-त्कार नसून किनोच्या जिद्दीचा परिपाक होता !

जॉन अकी बुआही असाच परिश्रम करणारा खेळाडू ! ४०० मीटर्सची अडथळ्याची शर्यत जिंकून त्याने सुवर्ण-पदक मिळविले. मेक्सिको ऑलिंपिक-मध्ये ब्रिटनच्या डेव्हिड हेमेरीने ही स्पर्धा जिंकली तेव्हा अकीबुआ हा १८ वर्षाचा होता. तोपर्यंत त्याने अशी स्पर्धा पहिलीही नव्हती. हेमेरीने शेवटचा अडथळा ओलांडल्याचे छायाचित्र अकी बुआने पाहिले आणि ते चित्र त्याच्या मनावरच कोरले गेले. १९६९ पासून त्याने सरावाला सुरुवात केली. युगांडात पाऊस फार, म्हणून ओल्या मैदानावर त्याला सराव करावा लागे आणि सरावाच्या वेळी तो ४०० मीटर्स ऐवजी १५०० मीटर्सचा सराव करीत असे. असा सराव आठवड्यातून सहा वेळा चाले. शिवाय सरावाचे वेळी तो ३५ पौंड वजनाचे जाकीटही घाले. या



शेन गोल्ड – वय फक्त पंधरा

त्याच्या कष्टाचे चीज झाले. म्युनिचमध्ये त्याने ४०१ मीटर्स अडथळ्याची शर्यत ४७·८ सेकंदात जिंकून जागतिक विक्रम केला. विशेष म्हणजे स्पर्धा संपल्यावर इतर स्पर्धक दमलेले असताना हा ताजातवाना दिसत होता व उत्साहाच्या भरात अंतीम रेषेच्या पुढेही तो थोडासा पळाला !

पण या ऑलिंपिकमध्ये सर्वांचे कुतूहल आकर्षून घेतले ते ऑस्ट्रेलियाच्या शेन गोल्ड या पंधरा वर्षांच्या शाळकरी छोकरीने ! एका समीक्षकाने म्हटल्याप्रमाणे तिचे वय हे लॉलीपाप चोखण्याचे ! पण या वयातही तिने अभूतपूर्व पराक्रम केला. २०० मी. व ४०० मी. फ्रीस्टाईल आणि ४०० मीटर्स मेडले या तीन शर्यती तिने जागतिक विक्रम करून जिंकल्या व तीन सुवर्णपदके पटकावली. २०० मी. फ्रीस्टाईल शर्यतीच्या वेळी तिने जोरदार मुसंडी मारून इतरांपेक्षा इतकी आघाडी मिळविली की, फोटोवरून विजेता ठरविणाऱ्या तज्ज्ञांनी आपले कॅमेरे दुसऱ्या नंबरच्या स्पर्धकांवर केंद्रित केले ! १०० मी. फ्रीस्टाईलमध्येही तिने ब्राँझपदक मिळविले. या यशामुळे तिच्या क्रीडाशिक्षकांपुढे पेच निर्माण झाला आहे.

हे यश टिकवायचे म्हणजे तिला सक्त सराव करावा लागणार. आणि रोज तीन-चार तास सराव केल्यास तिची शारीरीक वाढ होईल पण बौद्धिक वाढीचे काय हा त्यांना पडलेला प्रश्न! काही असो, मध्यम उंचीच्या, रुंद खांद्याच्या व प्रत्येकाचे आपल्या शुभ्र दंतपंक्तीने स्वागत करणाऱ्या या सुंदर पोरीने ही ऑलिंपिक स्पर्धा गाजविली हे मात्र नक्की !

शंभर मीटर्स धावण्याची शर्यत

जिकणाऱ्यास ‘ जगातील सर्वांत वेगवान मानव ’ ही पदवी मिळते. अमेरीकेची या स्पर्धेतील मक्तेदारी यावेळी रशियाच्या व्हॅलरी बोरोझोव्ह याने संपविली. पण बोरोझोव्हचे प्रमुख विरोधक रे रॉबिन्सन व एडी हार्ट हे अमेरीकन निग्रो खेळाडू उपांत्य फेरीत भाग घेऊ शकले नाहीत. कारण त्यांना स्पर्धेची वेळच माहित नव्हती ! ही चूक सर्वस्वी अमेरीकन अधिकाऱ्यांची होती. रशियन पत्रांनी टीका केली की हे खेळाडू अपयशाच्या भीतीने मुद्दामच गैरहजर राहिले ! बोरोझोव्हच्या यशाला आलेला हा थोडासा कमीपणा त्याने २०० मीटर्सची शर्यत जिंकून मात्र फोल ठरवला.

१०० व २०० मीटर्सची शर्यत जिंकणारा बोरोझोव्ह हा एकमेव खेळाडू ! तसेच तो ५००० मीटर्सपेक्षा कमी अंतराची शर्यत जिंकणारा पहिलाच रशियन खेळाडू ठरला आहे.

या खेळाडूंच्या दैदिप्यमान पराक्रमापुढे भारतीय पथकाची कामगिरी अत्यंत लज्जास्पद ठरली आहे. भारताला एकमेव सुवर्णपदक मिळण्याची खात्री नव्हे आशा होती ती फक्त हॉकीत ! पण पाकिस्तानने तीही धुळीस मिळविली. या ऑलिंपिक स्पर्धेत पाच सहा देशांचा दर्जा बव्हंशी समान पातळीवर होता. त्यामुळे एखाद्या बलाढ्य संघाचा पराभव करायचा आणि तुलनेने कमी अशा दुसऱ्या संघाकडून पराभव पत्करायचा अशा गंमती साखळी सामन्यात झाल्या. आणि या गडबडीत भारताचा त्याच्या गटात पहिला क्रमांक लागला. दुसऱ्या गटात पाकिस्तानचा दुसरा नंबर लागला. त्यामुळे भारत पाकिस्तान यांची उपांत्य फेरीतच गाठ पडली. भारताचा खेळ पाकिस्तानपेक्षा निस्संशय सरस होता. पण नऊ पेनल्टी कॉर्नर मिळूनही, ऑलिंपिक दर्जाच्या खेळाडूंकडून त्यातील एकाचेही गोलात रुपांतर होऊ नये ही आश्चर्याची गोष्ट ! पाकिस्तानने मात्र मिळालेल्या संधीचा अचूक फायदा घेऊन भारताला ब्राँझ पदकाच्या लढतीत फेकले तिथे हॉलंडबरोबर शेवटच्या क्षणाला कसाबसा विजय मिळवून भारताने ब्राँझ पदक मिळविले. इकडे अंतिम फेरीत पश्चिम जर्मनीने पाकला हरवून सुवर्णपदक जिकले व हॉकीतील नव्या पर्वाला आरंभ केला. बक्षिस समारंभाच्यावेळी मात्र पाकिस्तानने आपला नेहमीचा रडीचा डाव खेळून समारंभाचा बेरंग केला.

भारतीय कुस्तीगीरांनीही थोडीफार आशा दाखविली होती. चंदगीराम, मुखत्यार, सत्पाल, जगरूप, बिराजदार व मारुती आडकर हे झटक्यात बाद झाले पण सुदेशकुमार व प्रेमनाथ या बंधूंनी आपापल्या गटात चौथा क्रमांक मिळविला.

बाकीच्या स्पर्धकांचा भाग म्हणजे केवळ विनोदच होता ! लागोपाठ चौथ्यांदा ऑलिंपिकवारी करणाऱ्या डॉ. करणीसिंगांचा नेमबाजीत ३४ वा क्रमांक लागला तर रणधीरसिंगचा ४४ वा ! स्मॉल बोअर रायफल झोनमध्ये परिमल चतर्जी व सुशील रॉय चौधरी हे १०१ स्पर्धकात अनुक्रमे ९५

प्रकाशित होत आहे

# फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू

राजहंस प्रकाशन

व ९९ वे आले ! यातील एकाने तर १७ वर्षापूर्वीची गंजलेली रायफल नेली होती ! मैदानी स्पर्धेत तर काही विचारायलाच नको ! सर्व धावपटू प्राथमिक फेरीतच बाद झाले. हातोडाफेकीत प्रवीण कुमारसारखा गाजलेला खेळाडू ऑलिंपिकची पात्रताही गाठू शकला नाही. मोहिंदरसिंग गिलने तर कमालच केली. म्युनिचमध्ये पत्रकारांना मुलाखत देऊन त्याने प्रौढी मारली की 'ट्रिपल जंप' मध्ये आपण सुवर्णपदक मिळविणार ! पण तिन्ही उड्या 'नो जंप्स्' ठरून तो प्राथमिक फेरीतच बाद झाला !

या बाबतीत कठोर निर्णय घेण्याची वेळ आता आली आहे. एवढा खर्च करून यांना ऑलिंपिकमध्ये पाठवायचे कशासाठी ? काहीजण म्हणतात की मोठ्या सामन्यांचा अनुभव यांना मिळाला पाहिजे. पण हे संपणार कधी ? आणि आशियाई किंवा राष्ट्रकूल सामने 'मोठे' नसतात का ? तिथे 'वासरात लंगडी गाय शहाणी' प्रमाणे शहाणे ठरणारे हे खेळाडू ऑलिंपिकमध्ये का गचकतात ? गंमत अशी की याबाबतीत सर्वांची सहानुभूती खेळाडूंना मिळते व टीकेचे आसूड ओढले जातात सरकारच्या पाठीवर ! पण भारतासारख्या खंडप्राय देशात आणि लोकशाही राजवटीत एखादे क्रीडाविषयक धोरण खालपासून वरपर्यंत सुसूत्र पद्धतीने राबविणे अशक्य आहे. त्यातूनही सरकारतर्फे क्रीडासंस्थाना व खेळाडूंना आर्थिक मदत दिली जाते. अगदी शालेय खेळाडूंनासुद्धा अशा शिष्यवृत्त्या मिळतात ! आणि आर्थिक दृष्टीचाच विचार करायचा झाल्यास भारतीय अॅथ्लेट्स हे सुस्थितीत आहेत. आघाडीचे सर्व अॅथलेट्स हे सेनादल, रेल्वे अशासारख्या सरकारी खात्यात किंवा खाजगी कंपन्यात मानाच्या जागेवर आहेत. एखादा अपवाद असेलही ! शिवाय यांना सरावासाठी अनेक सवलतीही दिल्या जातात. मग अडचण कशाची येते ? सर्व खापर सरकारवर फोडणे हा स्वतःचे दौर्बल्य झाकण्यांचा प्रकार आहे. प्रतिकूल परिस्थितीतही सक्त सराव करण्याची जॉन अकीबुआ सारखी ताकद कुणा भारतीय खेळाडूत आहे ? किंवा किप किनोसारखी, कारणांचा बागुलबुवा न करता, आयत्या वेळी नवीन स्पर्धेत भाग घेऊनही सुवर्णपदक मिळविण्याची धडाडी किती जण दाखवू शकतील ? एकलव्याचा वारसा असणाऱ्या या पंचावन्न कोटींच्या देशात, कुणावरही अवलंबून न रहाता, स्वतःच्या हिंमतीवर सुवर्णपदक मिळविणारा एकही खेळाडू निपजू नये हा दैवदुर्विलास आहे !

असो. इतर देशातील खेळाडू आता शहात्तरच्या ऑलिंपिकच्या तयारीला लागतील. आणि भारतात मात्र सुरू होईल, खेळाडू, संघटक व सरकार यांच्यात आरोप-प्रत्यारोपांचा व्हॉलीबॉलचा खेळ !!

भारतीय खेळाडूंची अशी पीछेहाट चालू असताना भारतीय अधिकारी मात्र ऑलिंपिक गाजवून राहिले होते. भारताची प्रतिमा आणखी डागळ-

विण्यास यांनी मोलाची मदत केली ! यांच्या एकेक लीला म्हणजे स्थानिक वृत्तपत्रांना खाद्यच होत्या ! तरी बरे, या पथकाचे नेतृत्व राजा भालिंदरसिंग नावाच्या चतुर माणसाकडे होते. त्यांनी जर्मन पत्रकारांना रोखठोक उत्तरे देऊन गप्प बसविले.

एक-दोन नमुने पहा–

एक आरोप असा केला गेला की, उद्घाटनाच्या वेळी संचलनात खेळाडू-ऐवजी भारतीय अधिकाऱ्यांनीच अनधिकृतरित्या भाग घेतला.

यावर भालिंदरसिंगांनी स्पष्टीकरण केले, 'आमच्या कुस्ती व हॉकी संघातील खेळाडूंना विश्रांतीची गरज होती. त्यामुळे त्यांना बाहेर बसविले. आणि त्यांच्याशिवाय भारतीय पथक अगदीच छोटे दिसले असते म्हणून अधिकाऱ्यांनी संचलनात भाग घेतला.'

–ए परफेक्ट चेकमेट !

दुसरा आरोप असा– भारतीय खेळाडूंच्या निवासस्थानात इतर अधिकाऱ्यांची इतकी गर्दी असते की काही खेळाडू व कुस्तीगीरांना बाहेर सज्जात फरशीवर झोपावे लागते.

भालिंदरसिंग उत्तरले, 'खेळाडूंच्या निवासस्थानी गर्दी असते, पण ती सकाळच्या वेळी. रात्रीच्या वेळी खेळाडूंव्यतिरिक्त कुणीही नसतो. आणि कुस्तीगीर फरशीवर निजतात ते त्यांना जागा नाही म्हणून नव्हे तर मालीशमुळे गाद्या खराब होऊ नयेत म्हणून !'

–अनदर चेकमेट !

'मग 'मालीशवाला तर आम्ही कधी बघितलाच नाही' या जर्मन पत्रकाराच्या म्हणण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते !

जाऊ द्या, मि. रिपोर्टर ! तुम्हाला हे नवीन असले तरी आम्हाला नाही !

हॉलंडबरोबरचा पहिला हॉकी सामना झाल्यानंतर एका ब्रिटीश समीक्षकाने असे अनुमान काढले की, 'भारतीय हॉकीपटूंचे नेम चांगले नाहीत !'–

सबंध स्पर्धेत एकाही भारतीय हॉकीपटूला, प्रतिपक्षीय खेळाडूंच्या पायांवर स्टीक मारल्याबद्दल बाहेर काढले नाही यावरूनच वरील विधानाला पुष्टी मिळते !

म्युनिच ऑलिंपिकच्या तयारीसाठी ७३० कोटी रुपयांचा अवाढव्य खर्च करण्यात आला.

–'हा खर्च स्थानिक करवाढीतूनच भरून काढणार.'–एक चिंतातूर जंतू !

–पण तसं नाही आहे. जवळ जवळ सर्व खर्च हा स्मरणिका तिकीटविक्री, लॉटरी यातून भरून निघेल. बोजा पडेल तो फक्त भुयारी रेल्वेसाठी केलेल्या खर्चाचा !

या ऑलिंपिक स्पर्धेत भारताचा एका बाबतीत प्रथम क्रमांक कुणीही हिरावून घेऊ शकले नाहीत. भारताचे 'वर्ल्ड रेकॉर्ड' अबाधित राहिले.

–कारण प्रचंड लोकसंख्येचा देश म्हणून भारताच्या जवळपासही कुणी पोचू शकले नाहीत.

–पुढील ऑलिंपिकमध्ये चीनने भाग घेतल्यास मात्र भारताचा हा एकुलता एक मान काढून घेतला जाईल !

□ □ □

## स्नेहांकिता

पृष्ठ ३२ वरून

भाळी नाही किंबहुना इतर बऱ्याच गोष्टी साध्य करण्यासाठी देवाने आपल्याला पृथ्वीतलावर पाठवले आहे याची मला खात्री पटली होती.

ज्ञानार्जनासाठी हपापलेल्या स्त्रीला मोकळे (पण स्वैर नव्हे) वातावरण आवश्यक असते. आम्ही बुद्धी आणि भावना यांची युती घेऊन जन्माला. आलेलो. तसाच तोलाचा पती मिळणे जवळ जवळ अशक्य. बुद्धिमान पुरुष सारेच दूरदर्शीपणाच्या दगडावर कसाला लावून बघतो. भावनाशील पुरुष (अपवादाला तरी असावेत) व्यवहारात लंगडा ठरतो. कुटुंबाचा कर्ता सवरता लंगडा असला तर संसाराचे गाडे कोलमडते. त्यासाठी मग पत्नीला तो बोजा आपल्या खांद्यावर घ्यावा लागतो. म्हणजेच ते लग्न खऱ्या अर्थाने यशस्वी होत नाही.

बुद्धिमान पुरुष भावनाशीलही असला तर काय, दुधात साखरच. पण असे पुरुष रस्तोरस्ती सापडत नाहीत. बुद्धिमान पुरुष साधारण बुद्धीच्या स्त्रीशी सुखाचा संसार साधू शकतो. कारण निसर्गाने आणि समाजाने त्याला भरपूर सूट दिलेली आहे. त्याची पत्नी संसार सांभाळून शय्ये पुरती सोबतीण असली तरी त्याचे समाधान होऊ शकते. त्याचा बराचसा वेळ घराबाहेरच जातो आणि त्यात तो आपल्याला आवडणाऱ्या स्त्री-पुरुषांपासून हवे ते सुख-समाधान मिळवू शकतो. त्याची पत्नी त्याची सोबतीण असते पण ' एकमेव ' सोबतीण नव्हे.

विवाहित स्त्रीला मात्र बौद्धिक आणि भावनिक समाधान सारे एकाच पुरुषाकडून, एकाच व्यक्तीकडून म्हणजे तिच्या पतीकडून मिळवायचे असते. त्या चाकोरीच्या बाहेर जाऊन तिने केवळ ज्ञानार्जनाच्या भुकेसाठी इतरत्र अगदी साधी जरी मैत्री केली तरी घरात आणि घराबाहेर रण माजते. कंडचांना ऊत येतो आणि वैवाहिक जीवनाचा विचका होतो.

बहुतेक स्त्रियांना विवाहामुळे मिळणारा सामाजिक दर्जा आणि स्वास्थ्य एवढे मिळाले, की त्या समाधानाने जगू शकतात. पण ज्ञानासाठी सदा हपापलेल्या स्त्रियांना (आणि त्या सुदैवाने मोजक्याच असतात एवढे बरीक बरे) तेवढेच नको असते. संसारात पडल्याने स्त्रीचे जीवन आकसते.

पुण्याला १९४२ साली येण्यापूर्वी मी किशोर साहूंशी लग्न केले होते. पण तो विवाह अयशस्वी ठरला. नंतर आम्ही घटस्फोट घेतला. एकदा पोळल्यानंतर पुन्हा भाजून घ्यायची मनाची तयारी होईना. चालले होते ते आयुष्य ठीक होते असे वाटत होते. बेबीमावशी कुठल्यातरी जन्माचे माझ्यावर वैर काढीत होत्या. अधूनमधून इतर नातलगांकडे जात होत्या. जमेल तेव्हा असलेल्या वस्तूंची विल्हेवाट लावीत होत्या. त्यावर उपाय नव्हता. पण निदान इतर त्रास तरी

नव्हता म्हणून मी मागणी घालणाऱ्या गृहस्थांना नकार दिला.

पण व्यवहारी उद्देश असला, की काही मंडळींची चिकाटी अनिवार असते. याच सुमारास मी एकदा मोरीत पाय घसरून पडले. बरंच लागलं. मानेच्या मणक्याला दुखापत झाली. त्यात बेबीमावशी नेहमीप्रमाणे कुठेतरी गेल्या होत्या. माझा एकाकीपणा त्या दिवशी मला फार जाणवला. पेसिकाकांच्या कुटुंबातील मंडळींनी मला 'लग्न कराच' असा आग्रह करायला सुरुवात केली. माझे मन तरीही तयार होत नव्हते पण एकाकीपणाही असह्य झाला होता. विनाश काले विपरीत बुद्धी म्हणतात ! एके दिवशी मी त्या गृहस्थांना 'हो' म्हटलं. त्यांना दोन बहिणी, दोन भाऊ, आई-वडील एवढी मंडळी होती. कौटुंबिक सुखाला आसुसलेल्या मला याचेच फार मोठे आकर्षण वाटले.

समाजाच्या चाकोरीत किंवा चाकोरीबाहेर राहणाऱ्या एकाकी स्त्रीला काय भोगावे लागते हे अनेक भगिनींना माहीत असेलच. पैशाने समृद्ध असलेल्याकडे माणसे धावतात आणि पैशाकडे पैसा हा जगाचा नियम. त्यातल्या त्यात एकाकी स्त्री जर कर्तबगार, समर्थ असली तर तिची एखादीच उणीव हेरून तिचा शब्दाने नाहीतर अपशब्दाने अपमान करण्याचा आसुरी आनंद अनेकांना पक्वान्नाप्रमाणे चमचमीत वाटतो.

पूर्वी मला वाटायचं, की मी एकाकीच नव्हे, तर अभिनेत्री आहे म्हणून मला ते जाणवते पण समपरिस्थितीतील बहुतेक स्त्रियांचा तोच अनुभव आहे. नवऱ्याकडून लाथा-बुक्क्या मिळत असल्या तरी मंगळसूत्राचे बुजगावणे जवळ बाळगून स्वतःचे इतरांच्यापासून संरक्षण करवून घ्यायला 'नवरा' फार उपयोगी पडणारा प्राणी आहे आणि म्हणूनच तो आंधळा, चकणा, लंगडा, लुळा कसाही का असेना पण मुलीला मंगळसूत्राचा धनी असावा यासाठी तिचे आईबाप वेळीच लग्न लावायला धडपडतात. संरक्षणाचा आभासदेखील पुष्कळदा फार उपयोगी पडतो.

पुरुषांना मात्र आपल्या ब्रह्मचारी (लग्न न केलेल्या) मित्रांचा हेवाच वाटतो. तसे स्त्रियांचे नसते. सुखाचा त्यांना फार लवकर कैफ चढतो. म्हणूनच आपल्याकडे सौभाग्यवतींनीच मंगलकार्यात भाग घ्यायचा, अमंगल पुढाऱ्यांची मंगलारती करायची वगैरे क्रूर प्रथा प्रचलित आहेत. खरे म्हणजे पतीच्या अस्तित्वाचे सुख कुणाही स्त्रीच्या हातातली गोष्ट नसते. तो तिचा पायगुणही नसतो. फक्त एक सुखकर अपघात असतो तो. पण दागिन्यांनी सजवून, त्याचे प्रदर्शन करण्यात ह्या दृष्टीने अभागी असलेल्या स्त्रियांचा एकप्रकारे आपण पाणउतारा करतो आहे हे त्यांच्या ध्यानीमनी असले तरी त्याची त्या जाणूनबुजून दखल घेत नाहीत. या अमानुष रीतीरिवाजांविरुद्ध बंड म्हणूनच मी बहुधा कुंकू लावत नाही किंवा बांगड्याही घालत नाही आणि ज्या

लग्नाबद्दल मी आता लिहिणार आहे, त्या वेळी मी क्लबरोडवरील माझ्या घरापुढे रांगोळी घालण्याचे कार्य माझ्या घरमालकिणीच्या विधवा जावेकडून करवून घेतले. माझे हेही लग्न अयशस्वी झाले त्यात तिचा तिळमात्रही हात नाही याची मला खात्री आहे. गावातल्या साऱ्या सौभाग्यवतींनी माझे घर सजवले असते तरी जे सुख माझ्या नशिबीच नव्हते ते त्यांच्या पायगुणानेही मला मिळाले नसते ही माझी बालंबाल खात्री आहे. ◻

रक्ताची मंडळी नसली तरी या लग्नाकरवी मला आईवडील, भाऊ-बहिणी मिळणार या नुसत्या विचारानेच मी फार सुखावले. एकदा घरातील मंडळींची मी भेट घेतली आणि माझा लग्न करायचा विचार पक्का झाला.

माणसांची अंतरंगे त्यांच्या चेहऱ्यावर उमटती तर! तर मला वाटते हे जग टिकलेच नसते. माणसांचे मन कोडे आहे म्हणूनच आपण आशेच्या आधारावर मनोरे बांधतो—जसा मी बांधला होता तसा!

या लग्नाबद्दल मी नात्यातील कुणालाच काही कळवले नाही. एक-दोन मैत्रिणींना पत्र लिहिले. त्यात, 'मी आता पोरकी राहणार नाही' याचा मोठ्या उत्साहाने उल्लेख केल्याचे मला स्मरते.

जनावरांना माणसाचे स्वरूप कळते म्हणे! माझा कुत्रा काळू कुणाला सलगी करू देत नसला तरी सर्वांशी चांगला असे. पण हे गृहस्थ आले न् आले, की तो भुंकायला सुरुवात करायचा आणि इतरही तऱ्हांनी आपली नापसंती स्पष्ट दाखवायचा. ज्या दिवशी मी लग्नाला होकार दिला त्या दिवशी तर तो किती तास बेपत्ता होता! एरवी माझ्यापासून तो जास्तीत जास्त पाच-दहा मिनिटे दूर जायचा. त्याचे नापत्ता होणे हा मला अपशकून वाटला पण ते मी हसण्यावारी नेले.

शेवटी करायला नको होता तो गाढवपणा मी केलाच. वैदिक पद्धतीने आमचा विवाह झाला. प्रसिद्ध सिने व्यंगचित्रकार (कार्टून फिल्म्स् निर्माता) श्री. गुप्ते यांनी आणि त्यांच्या पत्नीने माझ्यावतीने उभे राहून प्रसंग साजरा केला. कन्यादान त्यांनीच केले.

लग्न लागून पंधरा मिनिटेही झाली नाहीत तोच धाकट्या दिराने, 'भाभी, पिक्चर देखने जाना है, दस रुपये दो' म्हणून प्रेमाची मागणी केली!!

जेवणखाण आटोपल्यावर आम्ही दोघे लॉन्ड्रीत माझे बरेच कपडे पडले होते ते आणण्याकरता गेलो. लग्नाला अजून तीन-चार तासच झाले होते. आम्ही आत असताना मरीन ड्राईव्हवर माझ्या पतीच्या ओळखीचे जोडपे भेटले. 'मी घरी येतो, तू पुढे जा' असे म्हणून स्वारी खुशाल त्या जोडप्याबरोबर निघून गेली!

माझ्या मनःस्थितीची लांबलचक वर्णने मला द्यायची नाहीत. वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोडते ते. मी लॉन्ड्रीत पोहोचल्यावर मी तिथे बराच वेळ सुन्न होऊन उभी राहिले. तिथला माणूस माझ्याकडे येऊन म्हणाला, 'तुम्हाला बरं वाट नाही का ?'

मी भानावर येत म्हटले, 'नाही नाही, मला काही होत नाही. थँक्स. ही रसीद घ्या.'

कपड्यांचा ढीग उचलून मी टॅक्सी केली आणि सासरी आले. टॅक्सी आणि लाँड्रीचे पैसे द्यावे लागू नयेत म्हणून वापरलेली ही ट्रिक प्रशंसनीय होती.

मूर्खपणा करायची मी घाई केली नसली तरी शहाणपणा मात्र त्या एका क्षणात मी अनुभवला. माझे डोळे खाड्कन उघडले. मला पैशाची रास समजून सर्वांनी एकमताने मला मूर्खात काढले होते. खरे म्हणजे लग्नाच्या निमित्ताने मला शंभर रुपयात एक साडी, पोलके, परकराचे कापड देण्यात आले त्यावरूनच सारे मला कळायला पाहिजे होते ! 'स्नेह के पास तो सबकुछ होगा उसको कुछ देनेकी जरूरत नहीं' हे वेळोवेळी मला सांगितले जाई. त्यावरून तरी अक्कल यायला हवी होती. पण बुद्धी म्हणजे शहाणपणा नाही हे मी आधीच म्हटले आहे.

इतक्यावरच ही शोकांतिका संपती तर मी तिचा पुसटदेखील उच्चार केला नसता. पण गोष्ट गुंतागुंतीची व्हायला कारण झाले—मला दिवस गेले.

क्रॉनिक डिसेन्ट्रीमुळे मला अधून-मधून पोट दुखणे, अन्नावरची वासना जाणे वगैरे त्रास होत असे. त्यामुळे मला जेव्हा अधिक प्रमाणात तो त्रास झाला तेव्हा नेहमीप्रमाणेच असेल असे समजले मी ! पण जेव्हा वांत्यावर वांत्या होऊ लागल्या, अन्नाचा वाससुद्धा सहन होईना, तेव्हा मात्र मला संशय आला. शिवाय अगदी नियमितपणे येणारी पाळी चुकण्याचे दुसरे काय कारण असणार ?

कुणी तरी सल्ला घेण्याकरता डॉक्टर व्ही. एन्. शिरोडकरांचे नाव सुचवले. त्याप्रमाणे मी त्यांना फोन करून वेळ ठरवली.

मी आणि बेबीमावशी त्यांच्याकडे जायला निघणार इतक्यात, 'मिस् प्रधान इथंच राहातात का !' हे शब्द माझ्या कानावर पडले. तळमजल्याच्या दुसऱ्या भागाच्या दाराशी पांढरा बुश्शर्ट आणि पांढरी पँट घातलेली एक पाठमोरी आकृती मी पाहिली. युनिफॉर्म घातलेला शोफर असावा, पण कुणाचा असा विचार करीत मी घाईघाईने बाहेर आले ! त्याच क्षणी पाठमोऱ्या आकृतीने माझ्याकडे चेहरा वळवला. बुद्धीचे असामान्य तेज त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर सूर्यप्रकाशाप्रमाणे पसरले होते आणि त्या व्यक्तिमत्त्वात अवर्णनीय गोडवा होता.

'आपण कोण ?' मी विचारले.

'मी डॉक्टर शिरोडकर.'

काहीतरी समजुतीचा घोटाळा झाला असावा. खरे म्हणजे मी त्यांच्या कन्सलटेशन रूमसवर जायचे होते. त्याऐवजी तेच आमच्याकडे आले होते.

त्यांना घराकडे नेत मी अडखळत विचारले, 'आपण-आपणच ते सुप्रसिद्ध डॉक्टर शिरोडकर का?' माझा प्रश्न इतका पोरकट होता, की तो विचारल्यावर माझे मलाच हसू आले. डोळे किलकिले करून, मिस्किलपणाने हसत ते म्हणाले, 'हो, मला वाटतं मीच तो.'

मी माझी समस्या त्यांना थोडक्यात समजावून सांगितली. त्यांनी तपासून मला आलेली शंका खरी असल्याचा दुजोरा दिला. त्यांच्यासाठी मावशींना चहा बनवायला सांगितले. मला फारच त्रास होत असल्याचे मी सांगितल्यावर ते म्हणाले, की 'काही काही स्त्रियांना तसे होते. काहींना पूर्ण नऊ महिने जड जातात नाहीतर बहुधा तिसऱ्या महिन्यानंतर त्रास थांबतो.' मी मग त्यांना माझ्या वैवाहिक जीवनाची कल्पना दिली. सासरच्या मंडळींचा काय सूर होता हेही सांगितले. त्यांनी माझ्या पतीला दोन समजुतीचे शब्द सांगावेत अशी मी त्यांना विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी एके दिवशी मुद्दाम येऊन माझ्या प्रकृतीची कल्पना माझ्या पतीला दिली.

या सुमारास मी गुजराती 'लग्ननी वेडी', आणि 'ढोळा मखण' नावाच्या मारवाडी नाटकात, शिवाय नेहमीच्या मराठी नाटकात कामे करीत होते. काम जरी चोख झाले तरी सारखं मळमळण्यामुळे फार बेचैन वाटायचे. अधून-मधून सारखा सोडा पिऊन वेळ भागवून नेत असे.

'राणीचा बाग' या नाटकात बाल–विधवा 'विमल तिचा मित्र मनोहर याला म्हणते, 'मला अलिकडे बरं वाटत नाही. सकाळचं सारखं मळमळतं...ई!' त्याला अनुसरून मो. ग. रांगणेकर एकदा मला म्हणाले, 'अहो विमलला मळमळतंय् म्हणून तुम्ही कशाला वरचेवर सोडा पिता!'

एरवी हे विधान गुदगुल्या करून गेले असते पण उलट मला जास्तच वाईट वाटले. नाटकात काम करणे अधिकाधिक जड जाऊ लागले. घराच्या खर्चाचा बोजा एकट्या माझ्याच डोक्यावर असल्यामुळे मी विवंचनेत पडले होते. शेवटी एकदा मी या विषयावर बोलणे काढून सांगितले, 'आता तुम्हीच बोजा सांभाळा. अस्वस्थतेमुळे माझ्याकडून होणार नाही.'

यावर उत्तर आले, 'गर्भपात करून घे.' त्या क्षणालाच आमच्यातील नाते संपले. अधून मधून तरी मी सासरी जात असे पण तेही मी बंद केले. यांनाही क्लब रोडवरील घरात न येण्याची विनंती केली.

जुगार, दारू, इतर स्त्रियांबरोबरील शृंगाराची किळसवाणी वर्णने हे सारे मी डोळ्याआड केले होते, पण 'गर्भपात करून घे' हे ऐकल्यानंतर मात्र माझ्या सहनशक्तीची परिसीमा गाठली गेली. आमचे पति-पत्नी हे नाते त्या क्षणालाच मी संपवले.

गर्भारपण, बाळंतपण इत्यादी विषयांवर साग्र माहिती आणि मार्गदर्शन देणारी एक दोन पुस्तके मी अभ्यासासाठी आणली होती. पण माझे मन भयंकर खचले. जगात येणाऱ्या अर्भ-

काला कोणत्या वातावरणात लहानाचे मोठे व्हावे लागणार हा प्रश्न सारखा मला भेडसावू लागला. ऐषआराम आणि पक्वान्नांनी मुलांचे चारित्र्य घडत नाही. त्याचा सर्वांगीण आणि सुंदर विकास होण्यासाठी घरात खेळीमेळीचे वातावरण असावे लागते.

सावत्र भावंडांमुळे माझ्या आई-वडिलांनी अलग राहण्याचा निर्णय घेतला असला तरी त्यांनी एकमेकांतील घर्षणाचा आणि मतभेदाचा माझ्यावर कधीही बोजा टाकला नाही. कुठल्याही प्रसंगी एकमेकांविरुद्ध माझ्यावर त्यांनी गाऱ्हाणी लादली नाहीत. सुसंस्कृत माणसांप्रमाणे ती वागली. इथे तीही आशा नव्हती. येणाऱ्या अर्भकाची चांगलीच रस्सीखेच होणार हे स्पष्ट होते. माझ्या पैशाच्या आशेने चढवलेले मुखवटे साऱ्यांच्या चेहऱ्यावरून एका-नंतर एक गळून पडू लागले होते. आई-वडील, भाऊ-बहीण, सखा-संरक्षक कुणीच राहिले नव्हते मला.

नाटकाचे दौरे करणे आवश्यक होते. 'राणीचा बाग' आणि 'लग्नाची बेडी' या दोन्ही नाटकात मला बरेच नाचावे बागडावे लागले. काही प्रयोगा-नंतर अवेळी रक्तस्राव सुरू झाला. मी मुंबईला परतल्याबरोबर डॉ. शिरोड-करांना माझी प्रकृती दाखवली. क्युरेटिंग करायचे ठरले. त्यासाठी यांची लेखी परवानगी घेतली. ◘

पण एक गोष्ट मात्र इथे स्पष्ट करावीशी वाटते. माझ्या उदरातून जन्माला आलेल्या मुलाची मी माता झाले नसेन पण मला मातृत्वाचे सुख अनेक प्रकारे मिळते. या बिल्डिंगच्या कंपाउंडमध्ये खेळत वरीचशी मुले एका आवाजात मला जेव्हा 'आन्टी' म्हणून घेराव करतात, माझ्या कुत्र्याशी खेळतात किंवा आपापसातील गाऱ्हाणी मला सांगतात तेव्हा एकदा नव्हे अनेक वेळा मला मातृत्वाचा अनुभव येतो.

भावनांचा सुदृढ विकास होऊ दिला तर त्यांची तृप्ती अनेक प्रकारांनी होऊ शकते. संसाराच्या आकुंचित क्षेत्रात वावरण्यासाठी माझा जन्म नाही हे मला आता पूर्णपणे कळून चुकले आहे. माझे जग सारे विश्व आहे. इतर स्त्रियांच्या भरलेल्या ओटीने मी सुखावते, मना-पासून सुखावते. नवीन बाळासाठी पाळणा जात असताना त्याला आरोग्य चारित्र्य आणि उदंडायुष्य दे देवा अशी उत्स्फूर्त प्रार्थना माझ्या ओठावर येते. सुखी जोडपी, खेळीमेळीने नांदणारी भांवडे आणि कुणाचे आईवडील, आजी आजोबा मी पाहिले की मला स्वास्थ्य मिळते. फक्त एकच गोष्ट मला जाणवते. पैशाच्या अहंकाराप्रमाणे बहुतेक माण-सांना सुखाचा देखील अहंकार असतो. त्यांना माझी एकच विनंती आहे. जगात एकाकी असणाऱ्या लोकांना आपल्या सुखात सामील करा. आपण आखलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमात आपण कितीदा अशा व्यक्तींना आग्रहाने आमं-त्रण दिले आहे एवढेच नव्हे तर त्यांचे कितीदा अगत्याने आगत-स्वागत केले

आहे, याची यादी प्रत्येक कुटुंबवत्सल व्यक्ती करील तर त्यांना आपल्यात असलेल्या मानवतेचा अभाव प्रकर्षाने जाणवेल. घरातसुद्धा विधवा किंवा वयस्क स्त्रियांना क्वचितच मालवाहू प्राण्यापेक्षा जास्त किमत देण्यात येते. साऱ्यांच्या फराळाची तयारी करायची आणि ती गेल्यानंतर घर सांभाळायचे हेच जणू त्यांचे युगानुयुगे ठरलेले कर्तव्य !

'आम्ही आमच्यात मिसळायला सांगतो तीच मंडळी तयार नसतात' असा आरोप करून कोणी आपल्या वागणुकीचे समर्थन करतील. पण दिलेले आमंत्रण किती मनापासून होते बरे ? शिवाय मिसळायला बोलवायचे म्हणजे एका खुर्चीवर त्यांना स्थानापन्न करून आपल्या बरोबरीच्याच मंडळींशीच थट्टा मस्करी करायची असा का त्याचा अर्थ होतो ? वैधव्यामुळे, एकटेपणामुळे किंवा वयामुळे मिंधे होऊन त्या मंडळींना स्वाभिमान आणि संवेदनाहीन व्हावे लागावे हे रास्त आहे का ?

मंगळसूत्राचा, सुखाचा, संपत्तीचा आणि आरोग्याचा गर्व कुणीही कधी करू नये. नशिबी केव्हा या बाबतीत दैन्य येईल हे आपल्याला माहीत नसते. आईवडिलांच्याकडून मिळालेल्या आध्यात्मिक विचारसरणीमुळे मी कमवू लागले तेव्हाही नोकराचाकरांनी मलाच फक्त मान देणे, माझ्या पुढे पुढे करणे मी कधी मान्य केले नाही. घरातील लहान मोठ्या व्यक्तींना माझ्या इतकाच मान दिला पाहिजे याची मी सदा दक्षता घेत आले आहे.

काय गंमत आहे पहा ! स्त्रियांना स्त्रियाच किती क्रूर वागणूक देतात ! पुरुष बिनलग्नाचा, एकटा असला तर त्याचा चहा करून दे, मुद्दाम गोड-धोड त्याला पाठव, वेळी त्याचे घरही साफ-सूफ करून दे असे अनेक प्रकारे स्त्रिया त्यांचे लाड करतात. पण एकट्या स्त्री बद्दल मात्र त्यांना फक्त कीव वाटते, सहानुभूती नव्हे. याला अपवाद आहेत पण अपवादानं नियम अधिकच सिद्ध होतात.

बाकी आधुनिक जगात स्वतःच्या जन्मदात्यांना धोंड मानणाऱ्या व्यक्ति-कडून काय अपेक्षा करायची म्हणा !

ही वृत्ती तरुण-तरुणींपुरतीच असती तर 'आधुनिक वैगुण्य' इतकेच म्हणून त्याला पचवता आले असते. पण चाळीशी, पन्नाशीला पोहोचलेल्या मंडळींतही माणुसकीचा अभाव फार, फार आढळतो. बऱ्या परिस्थितीतील लोकांत तर 'कामा पुरता' मामा या वृत्तीचेच वर्चस्व आढळते ! एखाद्या घरात चार दिवस प्रेत कुजत पडले तरी दुर्गंधी आल्याशिवाय त्याचा त्यांना पत्ता लागणार नाही.

वरच्या वर्गात आढळणारा कुर्रा आणि मानवतेचा अभाव याचे प्रमाण कित्ती थरापर्यंत पोहोचले आहे याचा अनुभव नुकत्याच झालेल्या धरणीकंपात मला चांगलाच आला. आपआपला जीव घेऊन वेड्यासारखे धावत जाणाऱ्या लोकांना अंधारात पडायला होऊ नये म्हणून माझ्यासारख्या एकट्या स्त्रीने

मजल्या मजल्यावर मेणबत्त्या पेटवल्या, पण इतक्या मानव समूहातील एकालाही माझ्या सुरक्षिततेची काळजी वाटली नाही–नव्हे विचारच आला [नाही, माझ्या संरक्षणासाठी आशीर्वादाचे छत्र घेऊन सदैव उभ्या राहिलेल्या परमेश्वराने मला त्या वेळेस अमाप धैर्य दिले. पण माणसांनी काय केले ? त्या पेक्षा चाळीत राहाणाऱ्यांमध्ये अधिक एकता आणि मानवता आढळली.

धनदौलतीत मशगूल होऊन जीवन जगणाऱ्यांची मुले तर त्यांना जवळ जवळ दुरावलीच आहेत पण पुढे तर शेवटचा पाण्याचा घोटही देण्याइतकी माणुसकी राहाणार नाही याची त्यांनी वेळीच दखल घेतली नाही तर मोठा बाका प्रसंग येणार आहे. असो. ◻

क्यूरेटिंगनंतर नर्सिंग होम सोडताना मी डॉक्टर शिरोडकरांचे आभार मानताना, 'या कधी घरी चहाला' असे आमंत्रण दिले तेव्हा मी अठरा वर्षांच्या मैत्रीचा भरभक्कम पाया उभारते आहे याची मला पुसटशीही कल्पना नव्हती.

येता जाता अनेकांना आपण असे आमंत्रण देतो पण एका बिल्डिंगमध्ये राहूनसुद्धा क्वचितच त्या आमंत्रणाला भेटीची साद देतो.

एकदोन दिवसांनंतरच डॉक्टरांनी माझ्याकडे फेरी मारली. माझ्या घरात तेव्हा मी चार वस्तू जेमतेम नव्याने जमवल्या होत्या पण डॉक्टरांना माझी 'अवस्था' पाहून आश्चर्य वाटले असले तरी त्याची मला त्यांनी जाणीव होऊ दिली नाही.

डॉक येणार म्हणून मी स्वतःला कधी नटवले नाही, सजवले नाही. त्या काळात मी घरात बहुतेक वेळ शर्ट, पायजम्यात असे. माझ्या परिस्थितीबद्दल मी त्यांना कधी खुलासाही केला नाही. त्यांनीही मला कधी काही विचारले नाही.

दिवसामागून दिवस जात होते. डॉक पुढे पुढे केव्हाही वेळ मिळाला, की माझ्याकडे फेरी करीत. बसणे मात्र फार वेळ नसे. सदा धावपळ.

माझ्यावर नुकत्याच गुदरलेल्या दुःखद प्रसंगामुळे डॉकच्या वडिलकीने मला फार बरे वाटे. आम्हा दोघांना विविध विषयात समरस आहे हे आमच्या बोलण्यावरून आम्हाला कळून चुकले होते. कधी कधी येता जाता डॉक दोन तीनदा येऊन जात. कित्येकदा सकाळी पाचला ऑपरेशन सुरू करण्यापूर्वीचा चहा घ्यायला ते माझ्याकडे येत. घरी लहानपणापासूनच पहाटे उठण्याची सवय असल्यामुळे माझी त्याने गैरसोय होत नसे. उलट उत्साहाने दिवस सुरू व्हायचा.

डॉकच्या खाजगी जीवनाबद्दल मला सुतराम् माहिती नव्हती. तशी माहिती काढण्याचेही माझ्या मनात कधी आले नाही. ते माझ्याकडे येतात याची घरात माहिती असावी असे मी साहजिकपणेच गृहीत धरले.

याच सुमारास वेस्ट एन्डचे प्रकरण चिडीला पोहोचले होते आणि मला

टाचेची धमकी देण्यात आली होती. टाच आलीच तर त्याने माझे काही विशेष नुकसान होणार नव्हते हे खरे पण त्यामुळे पेसिकाका घर सोडायला लावतील की काय, याची मला भीती वाटू लागली. याही अनुभवाची चव घ्यायची अशी मी मनाची तयारी केली होती तरी पण अधूनमधून माझे मन उदास होई. सारे काही असताना मी भिकारी झाले होते.

माझी मन:स्थिती नेहमीप्रमाणे नाही हे डॉकच्या लक्षात आस्ते आस्ते आले.

'का ग बेटा, अलीकडे चिंताग्रस्त दिसतेस तू ?' त्यांनी म्हटले.

'चिंताग्रस्त ? छे कुठे ? काही कारण नाही तसं.' अशी मी उडवाउडवीची उत्तरे दिली. पुन्हा एकदा वेस्ट एंड वाल्यांची भेट घेतली पण आता मात्र ते सबूर दाखवायला तयार होईनात.

माझी बेचैनी मला फार दिवस लपवणे शक्य झाले नाही. डॉक्टरांनी आग्रह करताच मी त्यांना सारे सांगितले.

'अरे बेटा, मग मला नाही का सांगायचं ?'

'डॉक, येऊच द्या टाच ! बघू या तरी काय वाटतं ते !'

'छे छे, मूर्ख कुठली. मी उद्या पैसे आणतो. तावडतोब त्यांचं बिल चुकतं कर.'

'नको डॉक, मला तुमचे पैसे फेडायला वेळ लागेल. होऊ दे काय व्हायचं ते.'

'शहाणी आहेस ! अग बेटा, लोकांना तमाशा बघायला मिळेल. दुसरं काही नाही आणि या भानगडीमुळे हे घरही जाईल हातचं.'

डॉकचा जिव्हाळा पाहून मला गहिवरून आले. मग मी त्यांना माझ्या एकंदर आयुष्याची कल्पना दिली. निरनिराळ्या चित्रपटनिर्मात्यांनी कसे गंडवले, त्यात नवयुगकडून मला केवढा मोठा फटका मिळाला हेही त्यांना सांगितले. माझ्याजवळ पडलेल्या काही हुंड्या आणि पोस्ट डेटेड चेक्स दाखवले. उदाहरणार्थ–

हुंडी रु. ५०००/– १३ एप्रिल १९४७
हुंडी रु. ५०००/– २९ मार्च १९४७
हुंडी रु. ५०००/– २८ एप्रिल १९४७
हुंडी रु. ५०,०००/– १८ मार्च १९४७

पोस्ट डेटेड चेक्स–

रु. ९५२३/१३ १६ सप्टेंबर १९४६
रु. १०,४७६/३ १६ सप्टेंबर १९४६
रु. ९५२३/१३ १६ ऑक्टोबर १९४६
रु. १०,४७६/३ १७ ऑक्टोबर १९४६

दोन हुंड्यांची एकच तारीख आणि दोन चेक्सची एकच तारीख ही साधीही लबाडी माझ्या लक्षात येऊ नये यावरून मी किती हुषार आहे हे वाचकांच्या लक्षात येईलच. शिवाय हुंड्यांवर लावलेली तिकिटेही अपुरी होती.

१९४७ मध्ये मी (आईच्या मृत्यूनंतर) इंग्लंडला गेले. जाताना मी विमानाने गेले पण येताना आगबोटीने आले. बोट किनाऱ्यावर लागते तोच नवयुगचे मालक पिअरलेस डिस्ट्रिब्यूटसंचे पी. पी. सामंत यांनी 'दिवाळे' काढले, अशी थरारक बातमी मला मिळाली. इंग्लंडला मी गेले ते त्यांच्या शब्दावर

सर्वस्वी विसंबून ! मी तुम्हाला 'ट्रॅव्हलर्स चेक' पाठवीन असे त्यांनी मला वचन दिले पण प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. त्यामुळे माझे एक दोन महाग दागिने इंग्लंडमध्येच मिळतील त्या किंमतीला विकून परत येणे भाग पडले.

'क्रेगी, ब्लंट अॅन्ड कॅरो' या फर्मच्या ताब्यात मी माझा पैशाचा कारभार सोपवला होता. माझ्या बुद्धिमत्तेबद्दल त्यांनी बरेचसे ऐकले होते. पण माझा अव्यवहारीपणा पाहून ते थक्क झाले. कर्जदाराजवळ काही मालमत्ता नव्हती. उलट होती ती मालमत्ता अनेक ठिकाणी एकाच वेळेला गहाण ठेवली होती, असे त्यांनी मला समजावले.

'केस करून फार तर या खोट्या हुंड्यांच्या आणि चेक्सच्या जोरावर तुम्ही कर्जदारांना कैदेत डांबू शकता पण तुम्हाला एक कपर्दीकही मिळण्याची शक्यता नाही' असे त्यांनी मला स्पष्ट सांगितले.

ही रक्कम तर फक्त एकाच कंपनी-कडून यायची होती. त्याशिवाय आणखी बरीच रक्कम इतर एक दोन कंपन्या-कडून वसूल व्हायची होती पण त्याचीही शक्यता नव्हती !

मला एकही व्यसन नव्हते हे खरे नव्हे. फाजील दयाळू स्वभाव हेही व्यसनाच्या यादीत मांडण्यासारखे आहे. प्रत्येक चित्रपट संपला, कीं स्टुडिओच्या कर्मचारी मंडळींना सप्रेम काही ना काही भेट माझ्याकडून दिली जाई. आई घटका मोजत असताना महद्प्रयासांनी हातात आलेली १०,०००/– ची रक्कम नवयुग स्टुडिओच्या ३००–४०० कर्म-चाऱ्यांचे सहा-सात महिने चाललेले हाल बघवेनात म्हणून मी त्यांच्यात वाटले होते. मोबदल्यात कुणाकडूनही मी दोन आण्याचेसुद्धा कधी काम करवून घेतले नाही. या विधानाला नवयुगच्या मामुली नोकरापासून तो वरच्या थरातील कुणाही कर्मचाऱ्याचा दुजोरा सहज मिळेल याची मला खात्री आहे.

एकदा मी बंगलोरला गेले होते. प्रसिद्ध नृत्यकार राम गोपाल यांच्याकडे उतरले होते. त्यांची चाळिशीला पोहो-चलेली बहीण स्वभावाने फारच चांगली होती. कलाकाराचे घर असल्यामुळे तिथे इतर कलाकारांची सारखी वर्दळ असायची. विविध देशातील, विविध प्रांतांतील. त्यातील एकाचे नाव होते लम्बकीन. हा फार चांगला व्हायलीन वाजवे. त्याच्या एका कार्यक्रमाला राम गोपाल आम्हाला घेऊन गेला. त्याच्या कलेचा माझ्यावर चांगलाच प्रभाव पडला. कार्यक्रमानंतर त्याच्याशी माझी ओळख करून देण्यात आली. गप्पा मारीत असताना मी सहज त्याला विचारले, 'तुम्ही भारतभर दौरा का नाही काढीत ?'

'पैशाची अडचण.'

'किती लागतील दौऱ्याला ?'

'दहा हजार.'

'ठीक आहे. मी ड्राफ्ट पाठवीन मुंबईला गेल्यावर.'

या जमान्यात माझ्याकडे चार पैसे होते. तरीपण अनोळखी माणसाला एकाच भेटीत निस्पृहपणे इतकी मोठी

रक्कम कबूल केल्याप्रमाणे दिली. पण परत करायच्या तोंडी बोलीने. लेखी काहीच नव्हते.

'केली का ती परत त्यानं ?' डॉकने विचारले. मी नुसतीच नकारार्थ मान हलवली.

'अशी कशी ग वेडपट तू! अग बावळट, माणूस जेव्हा पन्नास मागतो तेव्हा त्याला खरे हवे असतात पाच आणि तू आपलं १०,०००/– म्हटल्या-बरोबर लगेच दहा हजार काढून दिलेस ? तुझ्या मदतीला धावलं का कुणी त्यातलं ?'

मी पुन्हा मान हलवली. डॉक म्हणाले, 'आता तरी शहाणपणा शीक. गुडनेस् नेव्हर बिगेट्स गुडनेस !'

'मला नाही तुमचं म्हणणं पटत डॉक. मला घर हवं होतं, फेमसची नोकरी निमित्तमात्र होऊन मला पगडी न देता वाजवी भाड्यात क्लबरोडला हे घर मिळालं, आज तुम्ही मदतीचा हात पुढे करता आहात. मग गुडनेस इज नॉट बिगेट गुडनेस असं कसं म्हणता ? तुमच्या रूपानं देवच नाही का प्रगट होत ? माझ्यातील मूर्खपणा म्हणा, बावळटपणा म्हणा किंवा चांगुल-पणा म्हणा ! मला तो गमवायचा नाही.'

'यू आर टू गुड टु बी ट्रू. बरं उद्या ते ३०००/– रुपये भरून टाक.–'

'पण डॉक–'

'नो मोअर आरग्यूमेंटस. लहानांनी मोठ्यांचं ऐकावं.' डॉक गंभीर चेहरा करून म्हणाले. मला त्यांच्या अभिनयाचे खूप हसू आले. त्यांच्यामुळे मला परमे-श्वराचा साक्षात्कार झाला असं आजही मी मानते.

दुसऱ्या दिवशी मी वेस्ट एंडमध्ये गेले. हिशोबाची फेर तपासणी केल्यावर बिलाचे पैसे फक्त दीड हजार रुपये निघाले. राहिलेले दीड हजार रुपये मी डॉकला परत आणून दिले. एक आग-ळ्याच समाधानाचा अनुभव आल्या-प्रमाणे डॉकनी माझ्याकडे पाहिले. समृद्ध माणसांना लुबाडणारे भेटणे नित्याचेच आहे, पण स्वतःची अडचण असतानाही राहिलेला पैसा इमानेइतबारे देणारे अपवादालाच भेटतात म्हणून कदाचित डॉक्टर सुखावले असतील.

खरे म्हणजे जे दुसऱ्याचे आहे ते त्याचे त्याला परत करणे हा काही खास गुण समजला जाऊ नये. आपल्याकडे कुणी पाच-पन्नास रुपये ज्याचे त्याला परत केले की लगेच सत्कार समारंभ होतात, हारतुरे गळ्यात पडतात आणि काळ्या बाजारातील लाखो रुपयांच्या थैलीतून कोणीतरी शंभर पाचशे रुपये त्याला इनाम देतात आणि मोठ्या मथळ्याखाली त्यांचे फोटो छापून येतात ! या पद्धतीच्या सत्कार समा-रंभांनी आम्ही खरेपणा हा दुर्मिळ गुण आहे हे आम्ही सिद्ध करतो. इतकेच नव्हे तर मुलांना, 'मोबदला, इनाम या शिवाय सत्य न वागण्याचा' धडा घालून देतो. काळाबाजारवाल्यांच्या हातून खरे वागणाऱ्यांचा गौरव करून आम्ही आमचा दुतोंडीपणाही उघडकीस आणतो आणि म्हणूनच हा सारा गोंधळ, हे डावपेच तरुण पिढीला चुकीच्या

मार्गाकडे पाठवीत आहेत. आई-बाप, शिक्षक, समाज आणि राज्यकर्ते, चोहीं-कडे हेच गिरवले जात असल्यामुळे वडिलमंडळींबद्दल आजच्या पिढीत आदर सापडत नाही यात नवल ते काय?

डॉक माझ्या आयुष्यात आले आणि माझ्या जीवनात हास्य आले, प्रकाश आला, लहानपण आले. त्यांच्या 'बेटा' या हाकेने मी खरोखरच नावाप्रमाणे 'बेबी' बनले. डॉक आले की १२–१३ वर्षांच्या मुलीप्रमाणे मी उत्साहाने उज-ळून निघे. त्यांना कुठे ठेऊ अन् कुठे नाही असे होऊन जाई मला. एक नवीन शक्ती, नवीन प्रेरणा, नवीन धडाडी माझ्यात वास करू लागली. एका आगळ्या आनंदाने मी अंतर्बाह्य न्हाऊन निघाले. डॉकलाही आमची मैत्री एक नवीनच अनुभव असावा. शारीरिक सलगीचा लवलेश नसतानाही सर्वथैव सुखावणारी, समाधान देणारी, उल्हसित करणारी आमची मैत्री त्यांच्याही जीवनाचा केंद्र-बिंदू बनली.

आणि आमच्या सुखाला जणू आमचीच दृष्ट लागली. दिवसातून अनेक वेळा येणारे डॉक एकेदिवशी घाई घाईने भेट घेऊन जाऊ लागले. मी त्यांच्या मागोमाग मोटरीपर्यंत गेले. खिडकीच्या पट्टीवर हात ठेवून मी विचारले, 'काय झालं डॉक?'

स्टार्टर दाबत डॉक म्हणाले, 'उद्या-पासून मी पूर्वीप्रमाणे वरचेवर येऊ शकणार नाही'

'का डॉक?'

'या पुण्याहून परतल्यात!'

'म्हणजे?'

'अग पुण्यात आमचा बंगला बांधला जात होता त्यामुळे त्या तिथे रहात होत्या. ते काम आता जवळ जवळ संपले आहे आणि त्या मुंबईतच राहातील'

'म्हणजे आपल्या मैत्रीबद्दल त्यांना आतापर्यंत माहीत नव्हतं'

'नाही'


शुभेच्छा

लक्ष्मण दगडू वांजळे
स. नं. ४६।६ एरंडवणे,
पुणे ४

डबर, खडा, इत्यादी
बिल्डिंग मटेरियल
सप्लायर्स
व ट्रॅन्स्पोर्ट कॉन्ट्रॅक्टर्स्

मग आता सांगा ना तुम्ही! त्यांना घेऊनच या एकदा बरोबर.'

"छं, छे, वादळ उठेल! दुसरं काही नाही.'

'मला नाही वाटत. आपल्या भेटीगाठीत वावगं काही घडत नाही. त्या आल्या म्हणजे त्यांची खात्री पटेल आणि त्यांची आणि माझीही मैत्री होईल.'

'पोर आहेस तू! जातो मी. त्यातल्या त्यात वेळ काढून एकदा तरी येऊन जाईन.' असे म्हणून त्यांनी ॲक्सिलरेटर दाबला. ब्रेक सोडला, गाडी गियरमध्ये टाकली आणि डॉक निघून गेले.

चाके फिरत होती पण ती गाडीची नव्हे तर माझ्या नशिबाची! तोपर्यंत निरभ्र तेजोमय असणाऱ्या आमच्या मैत्रीला त्यांनी उडवलेल्या धुरळ्याने घेरून टाकले. मला वाटले जणू फारा वर्षांनी मला पुन: प्राप्त झालेले बालपण त्या गाडीच्या चाकाखाली चेंगरून गत-प्राण झाले.

मानलेली नाती प्रिय असली तरी क्षणार्धात मातीमोल होतात ते त्या दिवशी मला कळले. रक्ताचे, नात्याचे हक्क कुजले, नासले तरी त्यांना सामाजिक आणि कायद्याचे हक्क असतात. हेही मला त्याच दिवशी कळले.

प्रेमाच्या नात्याला मालकीची फक्त एकच गोष्ट असते—झुरणे! त्याला खत-पाणी मिळते ते स्वत:च्याच अश्रूंचे आणि भावनांचे! दुसऱ्यासाठी मरण्यातच त्याचे जगणे असते.

आमच्यासारख्या स्नेहाला सार्वजनिक मानाचे स्थान मिळते ते फक्त कथा कादंबऱ्यातच!

दु:खाचा आवंढा गिळत मी जड पावलांनी घराच्या पायऱ्या चढले.

□ □ □

लवकरच
पुस्तक
रूपात
प्रसिद्ध
होत
आहे

स्नेहांकिता

स्नेहप्रभा प्रधान

पॉप्युलर प्रकाशन
मुंबई

या
छोट्या
दिवाळी
अंकानंतर
थाटामाटात
येत
आहे

माणूस

मोठा
दिवाळी
अंक

प्रमुख
आकर्षण
?

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd No. MH 649


# माणूस

दोन वर्षांची ४५ रुपये वर्गणी
१५ ऑक्टोबरपूर्वी पाठविणारास

# स्नेहांकिता

स्नेहप्रभा प्रधान : किंमत सुमारे २५ रुपये
हे एक पुस्तक

किंवा

# कोठे आणि कधी तरी

डॉ. सुधीर फडके : किंमत १० रुपये

# रातराणी

विजय तेंडुलकर : किंमत १२ रुपये

## ही
## दोन पुस्तके
## विनामूल्य
## भेट

चालू डिसेंबरात : ट. ख. वर्गणीदारांचा